
लागीर
डॉ. सौ. नलिनी महाडीक

प्रकाशक :
आबासाहेब महाडीक
रविंद्र प्रकाशन
३८१, सोमवार पेठ,
सातारा–४१५ ००२

मुद्रक :
मिलिंद महाडीक
जयश्री प्रिंटिंग प्रेस,
३८१, सोमवार पेठ,
सातारा–४१५ ००२

(C) प्रा. डॉ. सौ. नलिनी महाडीक

प्रथम आवृत्ती :
१५ ऑगस्ट १९९१

मुखपृष्ठ :
मनोज वाघुलकर

किंमत : ४० रुपये

डॉ. श्री. साहेबराव महाडीक ( नाना )
व
सौ. कुसुम महाडीक
(न्यूयार्क)
यांना
सविनय सादर

रवींद्र प्रकाशन
सातारा

## लागीरबद्दल थोडेसे

रसिक वाचक,

'लागीर' हा माझा दुसरा कथासंग्रह तुमच्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. वास्तविक माझ्या 'रानवारा' या पहिल्या कथासंग्रहानंतर लवकरच 'लागीर' प्रसिद्ध व्हायला हवा होता. 'रानवारा'च्या प्रकाशनाच्या वेळीच मी तसे जाहीर केले होते. परंतु संकल्प आणि सिद्धी यात जसे अंतर असते तसेच निर्मिती आणि प्रसिद्धी यातही असते. असा अनुभव मला 'लागीर' च्या बाबतीत आला. विलंबाची खंत काळानुसार वाढत गेली. ही अनुभूती असह्य आणि उदास करणारी होती.

'लागीर' राहूनच जाणार या निराशाजनक जाणीवेतून तब्बल आठ वर्षानंतर नकारात्मक उर्मीतून 'लागीर'च्या छपाईची सिद्धता केली गेली. आणि सर्वप्रथम ही गोष्ट लक्षात आली की, या कथासंग्रहाचे शीर्षक पूर्वीच जाहीर केल्याने ते बदलता येणार नव्हते. 'रानवारा' मध्येच समाविष्ट व्हाव्यात असे वाटूनही ज्या कथा त्यातून वगळल्या गेल्या त्या काही कथा आणि नंतरच्या काही अशा दहा कथांचा समावेश मी 'लागीर' मध्ये केला.

लागीर, आक्रित आणि वळणावरुनी या तीन कथा माझ्या लिखाणाच्या अगदी सुरुवातीच्या काळातील आहेत. 'लागीर' ही शीर्षक कथा भूतपिशाच्च कल्पनेवर आधारीत आहे. त्याच कल्पनेवर आधारीत अशा 'बाधा' आणि 'झुटिंग' या दोन कथाही मी या संग्रहात जाणीवपूर्वक सामाविष्ट केल्या. १९७४ ते १९८८ पर्यंतच्या निवड न करता फक्त सुव्यवस्थित लिहिलेल्या व पूर्वप्रसिद्धी मिळालेल्या कथा मी या संग्रहात समाविष्ट केल्या. त्यावरुन माझ्या कथाविकासाचा

आलेख काढता येईल. काही कथामध्ये कथेचे तंत्र सांभाळण्याचा प्रयत्न पहिलेपणाची जाणीव देतो. परंतु 'बाधा' आणि 'आक्रित' या कथातील काल्पनिकता सोडली तर बाकी सर्व कथा 'हकीकती' आहेत. स्वतः ऐकलेल्या, अनुभवलेल्या किंवा पाहिलेल्या त्या 'हकीकती' आहेत. म्हणूनच त्या वरवरच्या व केवळ काल्पनिक नाहीत.'केवळ योगायोग'चे पांघरुन घालून मी या मानवीजीवनातील सत्याचे अवमूल्यन करु इच्छित नाही. शद्व, शैली, आणि तंत्र यांची सफाई (काँक्रीट) फक्त माझे. त्यातील जे गुणदोष असतील त्यासाठी माझा पदर तुमच्यापुढे पसरलेला आहे. सहृदय वाचक तुम्ही माझ्या या कथा संग्रहास योग्य न्याय व दाद द्याल याचा मला विश्वास आहे.

या कथा संग्रहातील कथा वैशिष्टचे म्हणून काही असतील; परंतु कथासंग्रह आकारला आल्यानंतर मला जाणवलेलं वैशिष्टच हे की, एक-दोन कथा सोडल्या तर या संग्रहातील बहुतेक कथात चिरंतन सत्य उमलून यावे त्याप्रमाणे स्त्रीचे स्त्रीपण उमलून आलेले आहे. माझ्याही नकळत हा आकाराला आलेला हा कलानुभव आहे. जो मला 'लागीर'च्या स्वरुपात जाणवला

रसिकवाचक, आपल्याही अभ्यास-आस्वाद-अभिरुचीनुसार आपणास या कथासंग्रहात काही गुण-दोष जाणवतील त्याचे पडसाद समजून घेण्यास मी उत्सुक आहे.

सौ. नलिनी महाडीक

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| बाधा | १ |
| वळणावरुनी | २० |
| आक्रित | ३० |
| व्हॉट मम्मी | ४१ |
| बारुद | ५१ |
| लागीर | ६४ |
| वस्ती | ७० |
| वळख | ९२ |
| झुटिंग | १०० |
| वांझ मरण | ११८ |

# बाधा

दिवेलागणीची वेळ. घराकडे वळलेल्या गाई-गुरांची चाहूल येतेय, मालती माहेरला गेलीय. घर गुहेसारखं वाटतंय. एकाकी–भय–सूचक–शांत. दोरीवर मालतीचं जुनेर मंद हेलकावे घेतंय. मनात अनामिक भीतीची पाऊलं वाजतायत. मी उभाच आहे अजून. सशाचे कान नि माकडाची नजर जणु मला लाभलीय,

'कर्र ऽऽऽ र्र र्र खट्! '

अं? - - - खिडकीचं दार वाजलं. दरवाजा लावायला हवा.

खिडकी लावल्यावर मी कोनाडे न्याहाळतो. मनातील भीतीचे कोनाडे सैल होतायत. टेबलावरची पुस्तकं जुळवून व्यवस्थित लावून झालीत. टेबल पुसून झालाय. आता काय बरं करीत बसावं? जावं का कुठतरी ? छे! परत यावंच लागेल. मग? दरवाज्याचं दार कुरकुरलं विव्हळल्यासारखं. पुन्हा मनात भीतीचा विषारी फणा! एवढा भित्रेपणा नसावा. नाही का? त्यात पुरुष मी, कीव येते माझी तुम्हाला? माझी मलाही कीव करावी वाटते. करणार काय? मी अनुभवलं ते कुणी इतरानं अनुभवलं असतं, तर माझ्या वागण्यात त्याला काही गैर वाटलं नसतंच. घडलंच तसं, मालतीसुद्धा मला हसते, तुच्छतेने. कधी कधी चिडतेसुद्धा!

कॅलेंडरची पाने फडफडतायत. आज - - - आज तारीख वारा - - - बाप रे - - - अमावस्या!

मी झटकन् दरवाजा लावून घेतो. कडीत उलथाणे घालतो. आता थोडं सुरक्षित वाटतं; पण तरीही एकटेपणाचं भय घेऊन मी कॉटवर

अंग टाकतो. भूक नाहीच. छताला एक कोळ्याचं जाळं दिसतंय. दोन कोळी दिसतायत त्यात. जिवंत असतील तर सोबत वाटेल. मी सिगारेटचे थोटूक फेकून पाहतो. कोळी जागा बदलतात; पण सिगारेट लोंबतेय राक्षसाच्या जिभेसारखी नि ते कोळी - - - भयानक दोन डोळ्या-सारखे! राक्षस व भुताच्या बाह्यस्वरुपात काहीच फरक नसावा - - - नाही का?

दारावर टक् टक्!

कोण असावं? नसावंच कोणी. भास व्हायचा, आपण दार उघडायचे आणि काही भलतंच - -! -?

आता जोरात टक् टक्, धडका देतात की काय?

'बाबू ऽ ! अरे ए ऽ बाबू, लेका झोपलास की काय रे? '

'कोण आहे? '

'अरे, मी श्री – श्रीकांत '

स्वप्न तर नाही ना? मी खसखसून डोळे चोळतोय.

'अरे बाबू, दार उघड ना ऽ ऽ ऽ'

किती मोठ्याने ओरडतोय हा. हातांना कंप सुटलाय माझ्या. मी कडी काढतो. श्रीकांत हसतच आत आलाय. मी पण हसतो. (खरे तर तसे दाखवतो.) तो उत्साहातच म्हणतो - - -

'दुपारपासून तीन वेळा आलो. पत्ता कुठंय तुझा? '

मी नुसता त्याच्याकडे पाहतोय. तो माझ्या खांद्यावर थाप टाकतो. श्रीकांत आता पहिल्यापेक्षाही बलदंड वाटतोय मला. मी त्याचे पाय पाहतो. उलटे नसतात. हायसे वाटते. मी त्याच्या नजरेला नजर मिळवून खरे हसतो.

'प्रकृती बरी नाही का रे तुझी? '

'त - - - तसं ठीक आहे की. म - - - मालती गावाला गेलीय.'

'ओह! आय सी. वहिनी गावाला गेल्यात - - - तरीच, ' तो डोळे मिचकावतो; पण मी आखडल्यासारखाच. काय बोलावं?

'वहिनी भांडून तर नाहीत ना गेल्या? '

'अं? - - - छे. छे! नाही तसं काहीच नाही. '

'मग तू एवढा अस्वस्थ का वाटतोस ? - - - - बाबू, किती वर्षांनी भेटतोय आपण?'

'होय ना.'

'मला तर केव्हा एकदा तुला भेटेन असे झाले होते, वाटत होते तुला एकदम मी कडकडून मिठीच मारेन - - - पण - - - पण - - '

'काय?'

'तसा तू - - - फार - - - फारच थंड वाटलास–मग मीच थंड पडलो नकळत'

'उगीच गैरसमज झाला तुझा. मालती गेलीय, त्यामुळे घर खायला उठतंय - - - '

'तुझं खाणं झालं का?'

'अं? - - - हं म्हणजे जेवण - - - नकोच आहे मला, भूकच नाही.'

'तसं कसं. आज आमचेकडे जेवणाचे निमंत्रण आहे तुला. तेच मी सांगायला आलोय.'

'नको रे. खरंच मला जेवण नको. भूक नाही मला.'

'महाराजा! तुझी तहान-भूक हरायला घडलं तरी काय? - - अं? तू फक्त चल माझ्याबरोबर. माधवीनं अस्सा मस्त मेनू केलाय की - - - लेका वाटेल कुठून जेवण नको म्हणालो होतो.'

'तुला कसं पटवू रे?'

'तू काय पटवतोस मला? तू स्वतः आगत, स्वागत केले नाहीसच त्यामुळे माझ्या निमंत्रणाचा स्वीकार करायला तू संकोचला असशील.'

'तसं नाही रे.'

'बरं ते कसंही असू दे. तू बदललास, मी बदललो नाही. तू माझा अगदी भ्रमनिरास केलास. त्या वेळचा तू - - - बाबू तुला काहीच आठवत नाही का रे?

'सारं – – सारंच आठवतं! – – विसरेन कसा?'

'बाबा ऽ, तुझी प्रकृती ठीक आहे ना? मला तुझा स्वर कापरा वाटतोय घाबरल्यासारखा.'

'कोण? मी - - मी कुठं घाबरतोय? छे छे! मला वाटलं - -

--- - तसं काही नाही. .खरंच काही नाही.'

'बाबू, तू काय बोलतोस ते तुझं तुला तरी समजतं का?

'न - - नाही म्हणजे त्याचं काय आहे – – म - - मला तुझी पूर्वीची आठवण होतेय.'

हे ऐकून श्री किती मोठ्याने हसतोय.

'त्यावेळच्या नुसत्या आठवणीनं तू इतका घाबरतोस? कम्माल आहे. त्यावेळी तूच तर मला सोबत केलीस, नि आता - –'

'त्यावेळी मला काहीच कल्पना नव्हती. ते फारच भयानक होतं.'

'पण भिण्यासारखं काहीच नव्हतं'

'तू असंच बोलणार श्री तुला कशाचीच जाणीव नव्हती म्हणून तुझे ते विचार तसेच - - आत्मनिर्भर.'

'फार सुंदर शब्द वापरतोस; पण जुनाट विचारांनी लडबडलेले - - -'

'जुने–नवे मुळात नसतेच रे. तू भुताने झपाटल्यावर कोणत्या दिव्यातून जात होतास, त्याची कल्पना तुला नव्हती व नंतर कोणीच दिली नसावी.'

तो पुन्हा हसतो.

'मी एका प्रयोगातून जात होतो. दिव्य बिव्य काही नव्हते ते. आणि त्या आठवणीने तू घाबरावंस असं मुळीच काही नव्हतं.'

'- - - - - -'

'अरे बोल की, पहातोस काय असा? माझ्यावर विश्वास ठेव. मी सांगेन सारं तुला, मी पटकन घरुन जाऊन येतो. मग बोलू आपण यावर.'

तो उत्साहाने निघून गेला. जाताना त्याने लोटलेला दरवाजा पुन्हा कुरकुरतो विव्हळल्यासारखा! मला अंधारातून त्याची रुंद खांद्याची मर्दानी आकृती दूर दूर सरकत जात असलेली दिसते.

खाडकन् दरवाजा ढकलून कडी लावलीय. दाराला पाठ टेकून मी तसाच उभा आहे; पण आठवणींची दारं लावता येत असती तर

## लागीर ५

ही हकीकत चार वर्षांपूर्वीची आहे. श्रीकांत उमाकाकूंचा एकुलता एक मुलगा. बालपणातच पितृछत्र हरपलेला. मामांच्याकडे पुण्याला शिकला सवरला. तेथे त्याचं एका कॉलेजकन्येवर प्रेम बसलं. भावाच्या मर्जीनुसार व मुलाच्या हट्टापायी उमाकाकूंनी लग्नाला सम्मती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार देण्या घेण्याचे व्यवहार ठरले. गंभीर चेहऱ्याच्या काकूंच्या मनाचा ठाव लागत नव्हता. मानी स्वभावाच्या व्यवहारचतुर काकूं नात्याचे रेशमी बंध असे सहजासहजी तोडणाऱ्या नव्हत्या.

इनामदार घराण्याच्या प्रतिष्ठेला शोभेल असा विवाहसोहळा थाटात पार पडला. नववधूस घेऊन वऱ्हाड निघालं आणि एकाएकी तुफान वादळवारा सुटावा तस घडलं. काकूंनी रुद्रावतारच धारण केला होता. सारे गोंधळून गेले होते. एकमेकात कुजबुज वाढली. दोन्ही बाजूचे लोक जमले. वातावरण गंभीर झाले. काकूंचा आवाज चढला होता. एक दोघे वयस्क त्यांची समजूत मऊ शब्दात घालण्याचा प्रयत्न करत होते. जाणत्या बायकासुद्धा टवकारुन पाहात होत्या. काकूंच्या वाऱ्याला उभे राहण्याचे धैर्य एकीच्यातही दिसत नव्हते. काही छोटया घटनां-वरुन चाणाक्ष बुद्धीच्या काकूंनी ओळखले होते की, लग्नाचा सारा खर्च त्यांच्या बंधूनी केला होता. ती गोष्ट त्यांच्या मानी स्वभावाला रुचणारी नव्हती. त्या डिवचल्या गेल्या. नागिणी समान खवळून उठल्या. एकुलत्या एक मुलाच्या लग्नात अशी लपवाछपव, उसना डामडौल, म्हणजे त्यांना आपल्या प्रतिष्ठेची विटबंना वाटली. त्यांच्या आकांड तांडवात सारे थिजल्यासारखे चिडीचिप झाले. मामांना तिथे येण्याचे धैर्यच झाले नाही. त्यांचे दोन तिन मित्र काकूंचा राग शांत करण्याचा प्रयत्न, करीत होते; पण त्या शांत झाल्या नाहीत. त्यांनी गाडीत बसलेल्या नववधूचा हात धरुन खाली उतरविले. सारा सूरच बिघडला. एक वयोवृद्ध गृहस्थ पुढे होऊन म्हणाले, ' ताई, असा त्रागा करु नका. देवा-ब्राह्मणाच्या साक्षीने ते जन्माचे जोडीदार झाले. ते सुखी, तर आपण सुखी. देण्याघेण्यात काय सुख? खर्च कोणीही केला असला, तरी स्वेच्छेने केला आहे. कोणी कोणावर जुलुम--जबरदस्ती केलेली नाही. गृहलक्ष्मी आज आनंदानं घरी येतेय, तिला आनंदानंच घरी घेऊन जा. एका

परमेश्वराची आपण सारी लेकरं. एक जातीची पाखरं कधी एकमेकांना टोचून घायाळ - - - '

'अहो, पाखरं नाहीत ही, गिधाडं! वास काढून मांस खाणारी स्वार्थसाधू! '

त्या वाक्यासरसी तेथे हरणासारखी बावरुन शालीनतेनं उभी असलेली नववधू विजेसारखी निघून गेली. तिचा संताप व स्वाभिमान तिच्या हालचालीतून ओसंडत होता. सारे सुन्न झाले. श्री गाडीत असून नसल्यासारखा थिजून गेला होता. तो मुका-बहिरा असल्याप्रमाणे निर्जीवपणे पहात होता. शहाण्या समंजस माणसांना नववधूचं एकच निर्वाणीचं उत्तर मिळालं होतं – 'मी सुद्धा दुसऱ्याच्या रक्तमांसाची अभिलाषा धरणाऱ्या गिधाडांना 'पाखरं' समजून त्यांच्यात मिसळणार नाही. मामांनी दिलेले दाग-दागिने आणि पैसा माझ्या वडिलांनी घेतला नाही. त्यांच्या-त्यांच्यात त्यांनी त्यांच्याच खोटया प्रतिष्ठेसाठी आरत्या ओवाळल्या. खोटी दूषणे मी ऐकून घेणार नाही. त्यांच्या मुलाची मी धर्मपत्नी आहे. काहीही सहन करुन घ्यायला मी गुलाम नाही, हे त्या विसरल्यात, मी विसरले नाही. विसरणार नाही. '

दोन्ही बाजूनी आगीत तेलच ओतले गेले. मध्यस्थांची स्थिती डमरुसारखी झाली. देण्या-घेण्याचा कर्ता-करविता मामा तेथे नसल्याने सारे दृढमूढ झालेले. मामांना शोधून आणण्यास सारे असमर्थ ठरलेले. शोधून सापडण्यासाठी ते गेलेलेच नव्हते, याची जाणीव सर्वांना झाली होती. शेवटी हतबल होऊन, नववधू तेथेच ठेवून, ओके बोके वऱ्हाड सुतकी चेहऱ्याने परत फिरले.

दबक्या आवाजात गावभर चर्चा चालत होती. कोणी काकूंना दोष देई, कोणी मामांना, तर कोणी नववधूला, तर कोणी नववधूच्या पित्याला दोष देऊन मोकळे होत होते. काहींनी श्रीकांतला डरपोक आणि छचोर ठरवला.

काकू वाड्याबाहेर पडत नव्हत्या. श्रीकांतने तर घर धरले होते, आठ-दहा दिवस असेच गेले. एखाद्या साथीच्या दुखण्यातून उठल्याप्रमाणें सारे उदास होते. श्रीकांतकडे माझे जाणे-येणें असे; पण त्या लग्न–

विघ्नापासून मी तिकडे फिरकलोच नाही. एक दिवस काकूंनी मला हाक मारुन विचारले, 'बाबूऽ का रे आतासा येत नाहीस? आमच्या श्रीला करमत नाही. फिरायला नेत जा त्याला.'

माझे मन तर श्रीकडे ओढ घेत होते. काकूंची जरब अशी की, त्या धाकाने मी तिकडे फिरकलोच नव्हतो. आता आज्ञा झाली होती. त्या दिवसापासून मी श्रीला कधी मळ्यात तर कधी नदीकाठावर बरोबर नेत होतो. श्रीकांत अबोल झाला होता. 'त्या' अप्रिय प्रसंगाचे ओझे मनावर असल्याने काय बोलावे, कोणता मिषय काढावा हेच सुचत नसे. बराचसा वेळ काहीही न बोलता जाई; पण आमचे फिरणे नियमितपणें सुरु झाले.

दिवस वैशाखातील होते. ऊन रणरणत होते. आम्ही दोघे आंब्याच्या दाट सावलीत बसलो होतो. त्याच दिवशी त्याची गप्पात लहर लागली होती. कैऱ्या खाता खाता तो कॉलेजातील गमती सांगत होता. प्रोफेसरांच्या सवयी, निवडणुका, कॉलेजातील खटयाळ विद्यार्थ्यांचे उद्योग वगैरे विषयावर तो बोलत होता. नंतर गॅदरिंगचा विषय ओघाने आला असे वाटले, पण गप्पात रंगलेला श्री बोलता बोलता हळवा झाला. त्याचा स्वर जड झाला. त्यानं त्याचं बोलणं आवरतं घेतलं. त्याच्या चेहऱ्यावर उदासीनता झाकोळली. डोळ्यात पाणी साकळले. ते लपविण्याचा तो प्रयत्न करीत होता. मी त्याच्या हालचाली निरखीत होतो. त्याचे असे वागणे मला थोडे थोडे परिचयाचे झाले होते, त्याच्या दुःखी मनःस्थितीची मला जाणीव होती. प्रेमविवाह करुन त्याला फक्त दुःख आणि विरह याशिवाय काही मिळाले नाही. त्यावेळी रुमालाने चेहरा पुसत तो मला म्हणाला, 'बाबू, माधवीची ओळख गॅदरिंगच्यावेळी झाली. तिचा स्वाभिमानी स्वभाव आवडला होता; पण त्याचा शेवट असा झाला. सर्वांनाच माझ्यामुळं दुःख सोसावं लागतंय, मी काय करु रे बाबूऽ?'

तो गहिवरलाच मी सुन्न होऊन झऱ्याच्या काठावर असलेल्या पाणपक्षाकडे पहात राहिलो. त्याचा दुःखावेग ओसरल्यावर तो मला म्हणाला, 'चल, झऱ्यावर जाऊन, तोंड धुऊन पाणी पिऊन येऊ.'

'नको. तो हडळीचा झरा आहे.'

'म्हणजे तो झरा हडळीने तयार केलाय की विकत घेतला?'

'श्री चेष्टा नको. ती लागीराची जागा आहे. तुझं हळदीचं अंग आहे, म्हणून म्हणतोय.'

"हळदीचं अंग तिला आवडत असेल, तर तिला तरी वापडीला पाहू द्यावं. काय हरकत आहे?"

'श्री चेष्टा करु नकोस. फार वाईट हडळ आहे ती.'

'कमाऽल आहे, तुम्हा लोकांची; अरे, जनावरे तेथील पाणी पितात. पक्षी तर दिवसभर ठाण मांडून असतात. त्यांना हडळ काही का करत नाही? विनबुडाच्या ऐकीव गोष्टींचे पीक या खेड्यातील अडाणी लोकांना फार पिकवायची सवय असते, पण तू एवढा सुशिक्षित तरीही विश्वास ठेवतोस?,

'कित्येकांचे अनुभव आहेत, बाबा. उगा का विषाची परीक्षा पहायची?'

'दुसऱ्याचे अनुभव दुसऱ्याच्या श्वासोच्छवासा इतकेच आपणास निरुपयोगी असतात. आता मला तहान लागलीय, झऱ्यावरुन येऊन तुझ्याशी बोलतो.'

'थांब श्री - - पाणीच प्यायचंय ना, तर विहिरीवर जा. झऱ्यावर जाऊ नकोस.'

तो हसून म्हणाला, 'जशी तुझी मर्जी.'

लांब लांब टांगा टाकत तो गेला. मी झाडावरच्या कैऱ्यांचे घोस निरखित बसलो. थोडया वेळाने सहजच माझी नजर झऱ्याकडे गेली. बाप रे! श्री झऱ्यावर अगदी मजेत हातपाय धूत होता. मी ओरडलोच.

'श्री ऽ ऽ अरे काय करतोस तू? प्लीज, तू इकडे लवकर ये. ए ऽ श्री ऽ ऽ!'

साऱ्या शिवारभर माझा आवाज घुमला. झाडावरचे पक्षी उडाले. माझ्या अंगावर काटा आला. मला श्रीच्या धाडसाचे कौतुक वाटण्यापेक्षा भीतीच फार वाटली. पण त्याच्या विचारसरणीच्या अगदी दुसऱ्या टोकाचे विचार मी त्याला बोलून दाखविण्याच्या भरीस पडलो नाही.

त्याच्याबरोबर थोडे नाराजीनेच मी घरी परतलो. रस्त्याने मी काही बोललो नाही. तोही गप्पच होता.

त्यादिवसानंतर चार-सहा दिवस तो माझ्याबरोबर फिरायला आला नाही. तुटक बोलून त्याने मला वाटेला लावले. याची चीड माझ्या मनात घर करु लागली; मग मीही त्याच्याकडे फिरकलो नाही.

एका रात्री गाढ झोपेतून आईने मला हाका मारुन उठविले. डोळ्यावरची झोपेची धुंदी उतरत नव्हती व आई मला गदगदा हलवून भयसूचक स्वरांत सांगत होती,

'अरे, बाबू ऊठ. कसली काळझोप लागलीय तुला? जागा हो. काकूंच्या घरात केवढा गोंधळ चाललाय. श्री कसासाच करतोय - - -'

ते ऐकताच धावतच मी काकूंच्या वाड्यात पोहोचलो आणि समोरचं दृश्य पाहून सुन्न झालो.

तांबारलेल्या डोळ्यांचा, केस विस्कटलेला, खांबाला बांधलेला श्री घुमत होता. झऱ्यावरच्या हडळीनं त्याला झपाटलं होतं. त्याच्यापुढे देवऋषी अंगारे-धुपारे करीत होता, मंत्र पुटपुटत होता. काही-बाही विचारुन श्रीला वेताच्या काठीने मारीत होता 'झाडं'. बोलतं करण्यासाठी त्याचा आटापिटा चालला होता. ते दृश्य फार भयावह होतं. अखेर चेष्टा अंगावर आली होती. श्रीनं जणु विषाची परीक्षा घेतली. मी नको म्हणत असताना झऱ्यावर गेला नि - - -

मी मनाशी ठरवलं झऱ्यावर जाण्याचा प्रसंग कोणाला सांगायचा नाही. या प्रसंगाशी मीच मला अपराधी वाटू लागलो. त्यानं हडळीच्या लोकभ्रमाची टर उडविली व त्याचे भयंकर प्रायःश्चित तो भोगत होता.

श्रीला लागीर झाल्याची बातमी चोहोकडे पसरली आणि त्याच्या सासऱ्याच्या कानावरही वृतांत गेला. प्रसंग मोठा बाका होता. त्यांनी श्रीला पहायला येताना बरोबर एका माणसास आणले. भुताखेताचे लागीर तो घालवीत होता. विशेष म्हणजे तो मारहाण करणारा मांत्रिक नव्हता. तेवढ्या एकाच गोष्टीबद्दल काकूंना कितीतरी समाधान वाटले होते. त्यांनी व्याह्याशी बोलणे केले नाही; पण विरोधही दाखविला नाही; त्या प्रसंगाने अगतिक झाल्या होत्या; तरी शद्बाने अगर कृतीने

नमत नव्हत्या. दुसऱ्या दिवशी श्रीचे सासरे बरोबरच्या मांत्रिकास घेऊन परत गेले आणि श्रीचे मामा भेटीस आले. त्यावेळी मात्र काकूंचा दुःखाचा बांध फुटला. मामा आजपर्यंत ज्या गोष्टी ऐकून ' वेडगळ ' समजत होते; त्या अघोरी भयानक गोष्टी ते डोळ्यांनी पहात होते. ते धास्तावले बेचैन झाले.पण त्यांना कोणताच मार्ग सुचविता येईना.त्यांच्या जबाबदारीच्या नोकरीमुळे त्यांना लवकरच परत जावे लागले. जाताना त्यांनी काकूंना श्रीच्या बायकोला मदती-सोबतीसाठी घरी आणण्याचे सुचविले. काकू मौन राहिल्या. मौनातील होकार समजून त्यांनी तसा निरोप श्रीच्या सासरवाडीस कळवला.

श्रीवर देवऋषाचे अघोरी उपचार चालू होते. तोच रानटी मारहाणीचा उपचार! उतारा, देणी, अंगारे-धुपारे, उडीद-लिंबे, मंत्र-तंत्र आणि वेताचा मार. श्रीचे अन्नपाणी तुटले होते. तो खूप अशक्त झाला होता, त्याच्या चेहऱ्यावर प्रेतकळा पसरली होती. अंगावर वेताच्या माराचे निळे काळे व्रण उमटले होते. काही ठिकाणी जखमा होऊन त्या चिघळल्या होत्या. बाह्य जगाशी त्याचा संबंध तुटला होता. तो कोणाशी बोलत नव्हता. अंगात लागीराचे वारे आले की तो धावत सुटे. कोणालाच आवरेनासा होई. चार-पाच माणसे त्याला पकडून खांबाला बांधत. तो भेसूर हसे किंवा रडे. अगम्य हातवारे करी तर कधी अमानुष किंकाळ्या फोडीं. जणु त्याचे माणूसपण संपले होते. एवढ्या धीराच्या काकू पण त्या खचल्या. त्याचा पोलादी स्वभाव अखेर नमला. त्यांचे एककल्ली व्यक्तिमत्व निमाले. मामांतर्फे व्याह्याला तातडीचा निरोप गेला. मुलीला आणि एका सुज्ञ जाणकारास सोबत घेऊन व्याही लगेच आले.

देवऋषाचे उपचार बंद झाले आणि त्या नवीन आलेल्या माणसाचे उपचार सुरु झाले. त्या माणसाचे नाव श्रीधर नामजोशी. ते मितभाषी होते. स्वभावाने अतिशय शांत होते. मंत्रजप करुन ते श्रीशी एखाद-दुसरा शब्द बोलत. त्यामुळे एक गूढ, पण विश्वासजन्य शांतता वाड्यात निर्माण झाली होती. श्रीचे उन्मादात धावणें बंद झाले होते. किंकाळ्या बंद झाल्या होत्या. काकू जरा निर्धास्त झाल्या होत्या. नव्या

सूनबाईमुळे घरात काही पहावे लागत नव्हते. रात्रीची जाग्रणें बंद झाली होती. एका भयानक स्वप्नातून जाग येत असल्याप्रमाणे त्या सुखावल्या होत्या; पण भीतीतून–संकटातून त्या मुक्त झाल्या नव्हत्या.

श्रीची प्रकृती आता बरी होती. तो थोडेफार अन्न घेत होता. पण लागीराने त्याच्या शरीराचा तावा सोडला नव्हता, नामजोशी शिवाय तो कुणाशी बोलत नव्हताच. त्याचे डोळे पूर्वीसारखे लालसर दिसत होते. विशेष म्हणजे झपाटल्यापासून एकदाही श्रीने माझ्याकडे ओळखीच्या नजरेने पाहिले नव्हते. स्वतःचे अस्तित्व तो विसरुन बसला होता. नामजोशींच्या उपचाराने तो बराच सावरला होता. बिचारी श्रीची बायको, नव्या नवतीच्या नव्हाळीत तिच्या नशिबी हे काय आले होते? तिचे एक नामी यंत्र झाले होते.

एके दिवशी श्रीकडे गेलो असता, नामजोशी मला म्हणाले, ‘ श्री चे तुम्ही जिवलग मित्र ना? ’

‘ हो ’ मला ‘ जिवलग ’ शब्द वेडावण दाखवत होता; पण मी उघड आत्मविश्वासने बोलत होतो. नामजोशी माझ्यावर खूष झालेले दिसले. त्यांनी मोठ्या विश्वासाने माझ्यावर एक मोठी जबाबदारी टाकली. ते आठ दिवस अत्यंत जरुरीच्या कामासाठी गावी जाणार होते आणि ते येईपर्यंत श्रीची संपूर्ण देखभाल मी करायची होती. त्यांच्या अनुपस्थितीत काही गडबड होण्याची शक्यता होती, म्हणून सर्व काही बंदोबस्त त्यांनी आधीच मला सांगून ठेवला होता. काही सूचना व विशेष प्रसंगी करावयाचे उपाय त्यांनी मला नीट समजावून सांगितले होते. मी मनातून पूर्ण ढासळलो होतो; परंतु तसे त्यांना जाणवू देणें, हा माझा कमीपणा होता. धाडसी तरुण आणि जिवलग मित्र म्हणून मी माझी प्रतिमा लखलखीत करु पहात होतो. मला माघार घेणे शक्यच नव्हते. नामजोशींनी सांगितलेल्या सर्व जबाबदाऱ्या मी स्वतःवर घेऊन त्यांना उसन्या धैर्याने निरोप दिला आणि माझे उसने धैर्य कसोटीला लागले.

रात्री वाडयात एका बाजूच्या खोलीत श्री व मी झोपत होतो. दिवसाही आम्ही तेथेच असायचो. तो तिथे मी, असा नियम ठरलेला होता. मला एक प्रकारे तो तुरुंग वाटत होता. एका अनामिक भयाखाली

मी गुदमरतोय असे मला वाटायचे. श्री अनावर झालाच तर त्या खोली-स बाहेरुन कुलुप लावून त्याच्या हालचालीवर लक्ष ठेवायचे, असे नाम-जोशींनी मला सांगितले होते; पण तो सुन्न बसे. मी त्याला कारणा-विना कुलुपबंद करु शकत नव्हतो. एक एक दिवस मी मोजत होतो. दिवसापेक्षा रात्री मी अधिक धास्तावत असे. त्यामुळे मी सावध झोपत असे. श्री जरी माझ्याशी बोलत नव्हता, तरी तो पूर्वीसारखा उग्र-भया-वह दिसत नव्हता. तो विचारमग्न, शांत वाटे. कधी उदास वाटे. खरे तर ते माझ्याच मनाचे भास असावेत. रात्री अनेकदा मी दचकून उठत असे व श्रीला जवळ झोपलेला पाहून मला हायसे वाटे. श्री आतासा त्या महापीडेतून सुटतोय; पण जर का आपल्या गवाळेपणामुळे काही विपरीत घडले, तर त्यास सर्वस्वी आपण जबाबदार ठरु. काकूंचा व त्या नव्या वहिनींचा दोष माझ्यावर राहिल; म्हणून मी दक्ष होतो. रात्रभर एका भीतीच्या सावटाखाली मी जागाच असे. पहाटे चिमण्या चिवचिवू लागल्या की, मला हायसे वाटे. मग शांत झोप लागे. चारपाच रात्री अशाच गेल्या. काहीही घडले नाही. माझ्या मनातील भीती कमी झाली होती. निवांतपणे मी झोपू शकेन, असा विश्वास माझ्यात आला आणि मी झोपी गेलो. कसे काय कोण जाणे; पण रात्री जागा झालो, तर श्री माझ्याजवळ नव्हता. माझ्या काळजात धस्स् झाले. लटपटतच मी कॉट वरुन उठलो. बॅटरी घेऊन दाराकडे गेलो. टॉर्चच्या प्रकाशाबरोबर पाव-लांचा आवाज झाला. मला कोणीतरी पळाल्यासारखे जाणवले. मी दाराबाहेर आलो. श्री खांबाला टेकून उभा होता.

'श्री बाहेर का उभा? आत चल ना.'

कळसूत्री बाहुलीसारखा तो खोलीत शिरला. मी बॅटरीने सभोवती पाहिले. सर्वत्र भयाण व शांत काळोख दाटून होता. सारे स्तब्ध व मूक होते. मला काहीच शंकास्पद दिसले नाही. मी खोलीकडे वळलो तेव्हा पायाला काहीतरी टोचलं. प्रकाशात पाहिलं तर एक अडीच इंच लांबी-ची, करंगळीसारखी जाड, पांढरी चपटी पट्टी होती. तशी वस्तू मी तत्पूर्वी पाहिली नव्हती. एका बाजूला गोलाकार दुसऱ्या बाजूस तीक्ष्ण अशी ती वस्तू मी चटकन् उचलून खिशात घातली. मनातल्या विचारा

सरशी अंगावर काटा आला आणि मला दरदरुन घाम फुटला. लागीर झाडाला (झपाटलेल्या व्यक्तीस) भेटून जाते म्हणतात. मघाचा पावलांचा आवाज कोणाचा असेल? ही वस्तू म्हणजे त्या हडळीचे नख किंवा दात तर नसेल? त्या विचारासरशी मी धाडकन् दार लावून घेतले. कॉटवर येऊन झोपलो तेव्हा श्री कॉटवर पडून होता. त्याने डोळे मिटले असले तरी त्याचा श्वास एका लयीत नव्हता. तो जागाच होता. त्याला काही विचारणें, म्हणजे संकटाला आमंत्रण देण्यासारखेच; म्हणून मी गप्पच राहिलो. त्यावेळी तो सरळपणे खोलीत आला, हेच नशीब असे मला वाटले. त्या रात्रीची घटना मी कोणास सांगितली नाही, तसेच श्रीला शद्बानेही हटकले नाही. मला दुहेरी भीती होती. श्री बिथरु नये, असे मला मनोमन वाटत होते. रात्रीची घटना इतरांना सांगितली तर सारेच घाबरुन जातील. एका रात्रीसाठी आपली असमर्थता उघडी पाडणे माझ्या मनाला पटत नव्हते. आता फक्त एक रात्र श्री सोबत काढली की, मी मोकळा होणार होतो. काकू, वहिनी व नामजोशी यांच्या मर्जीला पात्र ठरणार होतो. आपण मित्रासाठी एका दिव्यातून जात आहोत ही भावना मनाला समाधान देत होती. एकीकडे रात्रीचा तो प्रसंग आठवत होता; पण आता मी सावधपणें त्यावर विचार केला होता. नामजोशींनी सांगितलेले उपाय माझेजवळ होते. रात्री घाबरुन गेल्याने मला काही सुचले नव्हते. आता मात्र तसे घडणार नव्हते. मी मनात फार धैर्य आणले होते आणि पुन्हा तसे काही घडेलच असेही नव्हते. मात्र त्यादिवशी श्री लागीर झाल्यानंतर प्रथमच माझ्याशी परीक्षेबद्दल बोलला, कारण त्याच्या परीक्षेचा निकाल चार-दोन दिवसात लागणार होता. त्याच्याबोलण्यावरुन तो फारच चांगला झाला होता. आदल्या रात्रीचा प्रसंग फारसा गंभीर नसावा; पण आपल्या काल्पनिक भीतीमुळे तसा भासला असावा असेही मला वाटले.

रात्रीचे जेवण झाल्यानंतर मी खोली आतून बंद केली.

वादळवारे सुटले होते व वळवाचा पाऊस पडत होता. हवेत गारठा पडला होता. श्री थोडा वेळ गप्प होता. नंतर तो मला म्हणाला,

'मला झोप येत नाही. काहीतरी वाचतो.'

## लागीर १४

तो कॉलेजचे जुने मॅगेझिन वाचत बसला. माझ्या मनात नामजोशीं चे विचार येत होते. त्यांच्या ज्ञानाबद्दल माझा आदर वाढला होता.

'बाबू, मी झोपतो आता. मोठा लाईट बंद करतो. तूही झोप आता.'

मोठा लाईट बंद करुन श्री झोपला. तो त्या दिवशी माझ्याशी बोलू लागला होता; तरीही त्याच्याशी अधिक बोलण्याचे धाडस मी केले नाही. न जाणो लागीराचे वारे आले नि तो माझ्यावर च धावला तर? - - - मला निर्विघ्नपणे फक्त तेवढी रात्र, एकच रात्र काढायची होती. दिवसभर आळसावलो होतो. लवकरच मी झोपेच्या आधीन गेलो. मात्र श्रीच्या संभाव्य धोक्याचा बंदोबस्त मी केला होता.

सुप्त मनात दडलेल्या भीतीमुळे असेल, पण त्या रात्रीही मी अचानक जागा झालो. श्री कॉटवर नव्हता! बाहेर पाऊस कोसळत होता. घड्याळात एक वाजून गेला होता. कालचा प्रसंग ध्यानी धरुन मी आतूनच बाहेरचा कानोसा घेतला. कोणीतरी कुजबुजत होते. न-कळत माझा हात खिशात गेला. नामजोशींनी दिलेले रुद्राक्ष, लिंबू, अंगारा मला धीर देत होता; तरीही विलक्षण भीतीने माझा तावा घेतला. मला बाहेर जाण्याचे धैर्य झाले नाही. बंद खिडकीच्या तावदा-नातून पहावे, अशा विचाराने खिडकीच्या कठड्यावर चढून जे पाहिले त्यामुळे माझ्या शरीराला कंप सुटला. फारच भयावह दृश्य! दोन पाया-वर उभ्या असलेल्या अस्वलासारख्या प्राण्याजवळ रुंद खांद्याचा श्री उभा होता. पण कुजबुज? - - - भुतांची भाषा मला तरी काय समजणार? मी काचेच्या तावदानाला कान लावून ऐकण्याचा प्रयत्न केला पण काहीच बोध होईना. मी पुन्हा बाहेर पाहिले बापरे! श्री त्या अस्वली प्राण्यास चक्क गोंजारीत होता.

भीतीने गर्भगळीत झालेला मी, लटपटत्या शरीराने कॉटकडे धावलो. माझ्या धक्क्याने खिडकीतील तेलाची बाटली पडून फुटली. आवाज झाला.देहभानाशिवाय सारेच विसरलेला मी, स्वतःच्या बचावा-साठी ब्लँकेट गुरफटून पडलो. तोंडाने आठवत असलेला मंत्र म्हणत होतो. रामनाम म्हणत होतो. मुठीत रुद्राक्ष आवळून धरले होते. पाव-

लांचा आवाज झाला, तरी तसाच पडून राहिलो. काळजाचे पाणी झाले होते. बहुतेक श्रीच असावा; पण माझ्यात कोणतेच धैर्य नव्हते. स्वतः-च्या जीवापेक्षा मला काहीच प्रिय नव्हते. मित्रप्रेम, धैर्य, निष्ठा सारे व्यर्थ ठरले होते. माझी जबाबदारी मला आत्मघातकी व मृत्यूशी झुंज घेणारी वाटली. मी नामजोशींनी दिलेल्या वस्तूंचा व मंत्राचा माझ्या संरक्षणार्थ वापर केला. त्या क्षणी मला ती बेइमानी वाटली नाही. फक्त अगतिकता वाटली. त्यानंतरची रात्र मी धडधडत्या काळजाने कशी काढली ते मलाच माहित.

चिमण्यांचा किलबिलाट ऐकून उठलो. श्री अजून झोपला होता. मला बेडशीटवर रक्त दिसलं. घाबरुन मी इकडे तिकडे पाहिले. श्रीच्या पायाला जखम झाली होती. रक्तस्राव सुकून गेला होता. बाटलीची काच त्याला लागली होती. मी त्याला जागे करुन विचारले, तर तो म्हणाला,

'रात्रीं थोडा उठलो होतो, तेव्हा काच लागली. रात्रीच्या वादळा-ने बाटली पडून फुटलेली दिसलीच नाही.'

ते ऐकून मी मनात त्याचे आभार मानले. त्याला माझा संशय आला नव्हता. काळजीच्या सुरात मी म्हटले,

'अरे, पण काच लागली तर मला जागे का केले नाहीस? पट्टी केली असती.' माझा साळसूदपणा.

'छे रे, एवढी जखमच नाही. थोडेसे टोचल्यासारखे झाले. मात्र रक्त जरा जादाच गेल्याचे दिसतेय. मला नव्हती कल्पना.'

श्री वाह्यांगी सुखरुप होता याचे मला समाधान वाटत होते.

'आज नामजोशी येणार. जीवावरचं मोठं ओझं खाली होणार.' या खूषीत मी होतो. झालेही तसेच. नामजोशी आले. त्यांनी माझे आभार मानले. काकू म्हणाल्या,

'बाबू होता म्हणून सारे निभावले. आम्हा सासू-सुनांना आधार वाटला त्याचा.'

मनातून मी खजील झालो, लज्जीत झालो; पण उघड काही दाखविले नाही. त्याच दिवशी श्री नामजोशींबुवांबरोबर औदुंबरास

गेला. माझ्याकडे दिलेले रुद्राक्ष वगैरे तसेच राहिले. श्री तिकडून परत येण्या अगोदरच मी पुण्याला कोर्ससाठी गेलो. त्यानंतर आलो तेव्हा श्री नागपूरला नोकरीनिमित्त सपत्नीक गेल्याचे समजले. त्या प्रसंगातील वस्तूरुप आठवणी मात्र अजूनही माझ्या संग्रही होत्या. ती पांढरी लांवट वस्तू आणि रुद्राक्ष. त्यानंतर आज कितीतरी दिवसांनी श्री मला भेटतोय. तो दोन मुलांचा बाप झालाय. मी ही संसारी गृहस्थ झालोय; पण काळाच्या ओघातही त्या भयानक स्मृती दडपू शकल्या नव्हत्या. मी अगदी आत्ताच अनुभवल्याप्रमाणे सांगू शकतोय. ती भीती मनाचा कब्जा घेतेय.

दरवाजाची कडी वाजते. त्या पाठोपाठ श्रीचा आवाज. मी दार उघडतो.

'अगदी कडी लावूनच बसलायस. झोपला होतास की काय?'

'नाही रे. उगाच बसलो होतो.'

'मुन्ना हट्ट करीत होता, म्हणून मलाही थोडा उशीरच झाला. तुला वाट पाहावी लागली ना?'

'तसं काही नाही; पण प्रसन्नच वाटत नाही बघ.'

'खरे आहे. बायको माहेरी गेली की असंच होतं. कोणाला बोलूनही दाखवता येत नाही. कसे?' असे म्हणत तो डोळे मिचकावून हसला.

'तुला माझ्यापेक्षा अधिक अनुभव आहे ना!'

'होय तर! माझ्यासारखा अनुभव फार विरळा. अमानुष अनुभव. त्या नवेपणात तुम्ही लोकांनी किती हाल केले रे माझे. आठवलं की वाटतं शत्रूवरही तसा प्रसंग येऊ नये.'

'अरे, तूच तर स्वतःवर तो प्रसंग ओढवून घेतलास. त्यात लोकांचा काय दोष? तू त्या हडळीच्या डोहावर पाणी प्यायला गेला नसतास तर - - -'

तो खो खो हसत सुटला. त्यावेळसारखाच नि माझ्या अंगावर सरसरुन काटा आला.

'आज अमावस्या आहे श्री!' मी दरडावून बोललो.

'बाबूऽ तू अजून विश्वास ठेवतोस? त्यावेळचेच धुके अजून आहे

डोळ्यावर? अरे, ते सारे खोटे होते रे. खऽरेच खोटे होते. आज पर्यंत योगच आला नाही. मला तुला सारे सांगायचे होते की, ते सारे झूट होते-खोटे होते म्हणून.'

'नाही श्री. मी तुझ्या तत्वज्ञानाला फसणार नाही. सर्वांपेक्षा जास्त मी तुला ओळखतो. त्या प्रसंगीसुद्धा मी तुझ्या अधिक सहवासात होतो आणि कोणालाच माहिती नसलेल्या गोष्टी तुझ्या संदर्भात मी स्वतः अनुभवल्यात - - - अगदी नामजोशींना सुद्धा माहिती नसलेल्या.'

मी एका एका शद्बावर दाब देऊन अगदी आत्मविश्वासाने बोललो पण श्रीवर त्याचा परिणाम दिसला नाही.

तो मलाच उलट समजून देण्याच्या आविर्भावात सांगू लागला.

'ऐकून तर घे. त्यावेळी मी फार पेचात सापडलो होतो. आई व माधवी यांच्यात कसा समझोता करावा. हेच मला कळत नव्हते. मी तुला याबाबतीत विचारलंही होतं तू दम धरण्याचा उपदेश केलास. प्रेमविवाहाच्या माणसास असला धीर कुठे सापडायचा? विचाराच्या ताणाने मी भ्रमिष्ट होईन, अशी भीती मला वाटू लागली. तो सारा प्रकारच माझ्या सहनशीलतेच्या बाहेर होता. आईचं मन लाथाडून मी माधवीकडे जाऊ शकत नव्हतो.आणि माधवीस विसरुन मी आईजवळ सुखी राहू शकत नव्हतो. चोहोबाजूंनी माझा कोंडमाराच झाला होता--'

'थांब! श्री, तू हे तुझ्या त्यावेळच्या मनःस्थितीचं सांगतोस. गुदरलेल्या प्रसंगाचे भान तुला झपाटलेल्या अवस्थेत कुठं होतं? तुझ्या त्या स्थितीला सारा गाव साक्षी आहे आणि त्या नामजोशींना तरी काही मानतोस का? महाराजा.'

'हो तर. अगदी जरुर; पण माझे पुरे ऐकून घे. मग विचार तुझ्या शंका. हं. तर काय, तुझ्यावरोबर फिरायला गेल्याने आणि हडळीच्या झऱ्याविषयीच्या अडाणी समजूती ऐकून, मला एक कल्पना सुचली. अंगचा अभिनय असा वापरात आणण्यासाठी मी झपाटल्याचे ढोंग केले - - -'

'श्री?'

'होय बाबू. बालपणापासून कधीच नव्हे इतका वेताने मार

खाल्ला. प्रेमासाठी मला त्या दिव्यातून जावं लागलं. किती तळमळलो रे! सोसवत नव्हते मला; पण त्याशिवाय मला दुसरा मार्गच दिसत नव्हता. या बाबतीत फक्त माधवी सोडून सर्वांना अंधारात ठेवलं; मात्र तुला हे मी सांगणारच होतो. तो योग आज आला. अरे पहातोस काय? वेंधळ्या, खरं नाही वाटतं? '

निर्धाराने मी म्हणालो ' नाही! '

पुन्हा एकदा तो हसला. माझ्या खांद्यावर हात ठेवून नजरेत नजर मिळविण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला,

' बाबूऽ तू एवढा कसा रे, अंधश्रद्धाळू? अरे मी-श्री सांगतोय ते सारं नाटक होतं, म्हणून तरी तुझा विश्वास बसत नाही? - - - सांग कोणाची शपथ घेऊ? '

' वहिनींची? '

' ठीक आहे. माधवी - - '

' थांब! श्री, तू तुझ्या बेडरवृत्तीने एकदा स्वतः धोक्यात गेलास. आता शपथ घेऊन कुटुंब उद्ध्वस्त करु नकोस. निदान शपथ घेण्यापूर्वी मी तुला एका प्रसंगाची आठवण देतो. एक वस्तू दाखवतो. बघ तुला काय वाटतंय? '

' आण. आण पाहू काय ते. ' तो उत्सुकतेने म्हणाला.

मी टेबलाच्या खणातून ती वस्तू काढली. ती त्याला दाखविण्यापूर्वी त्या दोन रात्रीचे प्रसंग त्यास सांगितले. ते सर्व ऐकताना त्याचे गोरे गाल गुलाबी झाले होते. नजर चमकत होती. तो गालात हसत होता. तरीही तो आवाक होईल, अशी ती वस्तू मी त्याच्या हातावर मोठ्या आत्मविश्वासाने ठेवली. एखादे रत्न सापडल्यासारखा तो हरखून गेला.

' बाबू थँक्स! मेनी मेनी थँक्स! ! हा केस बांधायच्या चापाचा फासा आहे - - - हस्तीदंती. '

' कसले केस बांधायचा? - - - कोणाचा? '

' आणखी कोणाचा असणार? त्या अस्वलीचा. तुझ्या वहिनीचा! बाबू, तू आमची चोरी पाहिली होतीस हं. अरे, किती दिवस विरहात

काढणार आम्ही? तुम्ही कोणी त्याची जाणीव तरी ठेवली का? बाधा झाली होती, मलाही मान्य; पण भुताची नव्हे. शाल पांघरुन येणाऱ्या अस्वलीची! '

हरीपूर (सांगली) साहित्य संमेलन
प्रथम क्रमांक व ढाल ५ जून १९८३

# वळणावरुनी

बाहेरच्या खोलीत दिनकर सुपारी चघळत, पेपर चाळत होता. नुकतंच त्याचं जेवण झालं होतं. आतल्या खोलीत त्याची आई व बायको जेवायला बसल्या होत्या. दिनकरच लक्ष पेपरकडं नव्हतचं. अलिकडं रोजच घडणाऱ्या गोष्टीमुळं तो आतल्या आत धुमसत होता. तेवढ्यात त्याला बायकोच्या ओकारीचा आवाज आला. बसल्या जागेवरुन त्याला मोरी दिसत होती. वाकून ओकारी देणाऱ्या बायकोचा त्याला संताप आला होता.

तोंड धुऊन ती उभी राहिली, तरी दिनकर तिच्याकडं पहातच होता. तिचं नाक-डोळं लाल झालं होतं. गेला आठवडाभर हे असंच चाललंय. जेवायला बसलं की चार घास पोटात जातातन् जातात तोच ओकारी यायची. जेवण अर्ध्यावरच रहायचं. तिच्यामुळं सासूबाईही जेवणाचं ताट बाजूला सारायच्या आणि आईसाठी दिनकरच्या अंगाचा तिळपापड व्हायचा. आईला त्यानं कितीदा सांगून पाहिलं की, 'तू माझ्याबरोबरच जेवण करत जा.' पण ती ऐकायची नाही. म्हणायची

'नमा येकली मागं ऱ्हायली तर मला शेजारी-पाजारी काय म्हंत्याल? '

खरं तर शेजाऱ्यांना असल्या गोष्टी कोण सांगणार? पण तिचा मात्र असा रोख असायचा की नमा अशा खाजगी गोष्टी बाहेर सांगते, नमाला इकडं आड नि तिकडं विहीर अशी स्थिती प्राप्त झालेली. दिवस गेल्याचं कौतुक बाजूला राहून डोहाळ्याच्या त्रासाला ढोंगाचा आरोप लावला होता. नमाला वाईट वाटायचं याचं की, दिनकरलाही त्याच्या

आईचा आरोप मान्य होता. ती मुद्दाम ढोंग करुन ओकारी काढते असं त्याचं ठाम मत बनलं होतं.

रोजच्या रोज येणाऱ्या संतापानं आज मर्यादा ओलांडली. नमापुढं जाऊन तो रागानं म्हणाला,

'कितीदा तुला ताकीद करायची गं?'

'म - -- मी काही मुद्दाम करते का?'

'ऐक बाबा, ऐक! दिना. कसं उलट उत्तर करतीऽ तुझी बायकू! सोत्ताच्या नवऱ्याला डाफरुन बोलतीया. परमेसरानं ह्ये ऐकायला मला मागं ठेवलीया व्हयं?'

'आई, तू गप गं. मी बघतो तिच्याकडं. पक्की मानभावी आहे ती. तुला ताटावरुन उठवण्यासाठी तिनं डोहाळ्याचं प्रस्थ माजवायचं धरलंय मला कळत नाहीत का ढोंगं?'

'ओकारी आल्याशिवाय होते का?'

'ओकारी घातल्यावर होईलच. तुला आईच्या जेवणाचा विचका करायचा असतो. चार दिवस इथं आलीय, तर तिला तू सुखानं दोन घास खाऊ देत नाहीस.'

'मी त्यांना जेऊ नका म्हणते का?'

'एवढी खुळी नाहीस तू. डोहाळ्याचं निमित्त करुन ओकारी काढायची, म्हणजे ती ताटावरुन उठतेच. किती दिवस ती अशी अर्ध-पोटी रहाणार?'

'माझ्या पोटात अन्नाचा कण ठरत नाही त्याचं - - -'

'म्हणून तिला ही शिक्षा काय?'

'तसं नाही मी म्हणत; पण एकदा दवाखान्यातून जाऊन येऊ म्हणते तर - - -'

'हंऽ! समजतात तुझी नाटकं दिवस गेले की औषध-पाणी घ्याय-ची नसतात, असं आई म्हणते ते तुला पटत नाही. तिच्या अनुभवाच्या चार गोष्टी ऐकण्याची नम्रता तुझ्याकडं आहे कुठं?'

'मला इतका त्रास होतो, त्याचं काहीच वाटत नाही तुम्हाला. जग इतकं सुधारलं तरी तुम्ही अडाणी मतांचा–'

'हं, ही घे! ' म्हणून त्यानं तिच्या खाड्कन मुस्काटात मारली. तिचा कान पिरगाळीत तो म्हणाला,

'कोण अडाणी? मी? की माझी आई? '

तिच्या कानाला कळा लागल्या होत्या. सासूबाई गालावर मूठ देऊन पाटावर बसून होत्या. आपल्या गुस्स्यातच त्या म्हणाल्या,

'दिना, मला उद्या सक्काळच्या गाडीला बसवून पाठीव माघारी. माझं मला नवऱ्याचं घर हाय. तुझ्या दारात मी पडून ऱ्हायाला आल्ले नाय. '

'अन् हे घर काय हिच्या बापाचं आहे? नालायक साली. '

त्याच्या हातातला आपला कान नमानं कळवळून सोडवून घेतला. ती तोंड ओंजळीत लपवून खाली बसली, तेव्हा तिच्या पाठीतही दोन रट्टे बसले. ती आवाज कोंडून डोळे पुसत राहिली. तो मात्र पायात चपला सरकावून दारातून बाहेर पडला होता.

अजुनही नमा दुःखाचे उसासे सोडत बसून होती. तिची उदास नजर अधून-मधून आसवांनी चिंब होत होती. एखादा चुकार थेंब गालाखाली ओघळत येता येता सुकून जात होता. दुसऱ्या खोलीत तिची सासू भाजक्या शेंगा खात निवांत बसली होती. एका घरात रहात असूनही धर्मशाळेतल्या प्रवासिनीसारख्या त्या वावरत होत्या. खोली रुक्षपणानं भरुन राहिली होती. दोन वृक्षांच्या फांद्या एकमेकीत मिसळतात. वाऱ्याच्या झोतावरोबर एकमेकींना घासत रहातात. तिथं प्रेम नसतं, रक्ताचं नसानसात खेळणारं-वसणारं नातं नसतं; असतो फक्त ठायी ठायी संघर्ष. वणव्याची अपेक्षा करणारा!

दारावर टक्टक् झाली. भिंतीला डोकं टेकून विचार तंद्रीत ध्यानस्थ झालेली नमा चटकन् उभी राहिली.

'पवार इथंच रहातात ना? '

'हं होय. कोण आहे?'

तिन दार उघडलं.

'तात्या ऽ! ' ती अत्यानंदानं म्हणाली आणि त्यांच्या हातातील जड पिशवी तिनं आपल्या हातात घेतली.

ताल्या आत आले. खोलीत फक्त नमाची सासू पाहून ते म्हणाले,

'पाव्हणं कुठं गेलं?'

'बाहेर गेल्येत. येतीलच आता. ताल्या, तिथं नका वसू, कॉटवर वसा ना.'

'असू दे, कुठंतरी बसायचंच हाय ना. हतं काय अन् ततं काय धाड भरतीय व्हय?'

त्यांनी चटईवर बैठक मारली. नमाच्या सासूबाईकडं हसत पहात त्यांनी विचारलं,

'तुमी हकडं कवासा आला? आमाला ठावं नव्हतं.'

'तुमालाकळवायचं काईच कारण पडत नाय, नि ठाव असतं तरी तुमी काय करणार हुता वो?'

ताल्या मिशातच हसलं म्हणालं,

'ठावं आसतं तरी काईच करणार नव्हतो म्हणा; पण ठावं नव्हतं एवढाच बोलण्याचा मतलब.'

'माझ्या लेकाचं घर हाय, हतं याला कुणाच्या बापाला मी भिणार हाय का?'

'छः! छः! भ्या कशाबद्दल? पोराजवळ चार दिस -हायला काय बी भ्या नाय.'

'चारच दिसाचं काय सांगता- मला पाक वरचं बोलावणं येईस्त-वर मी मोपल्या लेकाजवळ -हाईन. कुणाच्या बापाला भेणार नाय.'

'आक्षी बराबर बगा, आवो चार-सा म्हैन्यानं मांडीवर नातुंड खेळंल, आनंदानं -हाता येणार हाय तुमास्नी.'

'आवो, पोरं संबळायला मी चाकरीची गडी नाय. मला ग्वाड बोलून घोळात घिऊ नगा-खुळी नाय मी. माझा एकटा जीव सदाशिव! नवरा-बायकू, पोरं, ज्याचं त्यानं बगावं. मला कुण्णाची पोरं बगाय नको नि काय नको.'

'चहा घ्या. आत्या, तुम्हीही घ्या.'

'मला नग, रग्गड झालाय मघाशी.'

'अहो घ्या. असं काय करता? घ्या घ्या, घ्याकी.'

अवघडून उभ्या राहिलेल्या नमाच्या हातातील कपवशी नाकडोळे मुरडीत सासूबाईंनी घेतली.

चहापानंतर काही बोलणं निघेल असं तात्यांना वाटलं; पण नमाच्या सासूबाई ढिम्म बसून होत्या. त्यांना फारंच अवघडल्यासारखं वाटलं पण परक्या गावात परक्या माणसात ते पराधीनासारखं फक्त बसून राहाण्याशिवाय काय करणार? आत नमानं तात्यांची पिशवी उघडली होती. डब्यात रव्याचे लाडू होते, पुडाच्या वड्या होत्या, लोणचं-कुरड्या, आणखी काहीवाही थोडं थोडं बांधून दिलेलं पाहून तिला आतल्या आत कढ येत होते. आईची माया! रात्री जागली असेल. पहाटे खोकत खोकत उठली असेल. अधू डोळ्यांनी पहात चाचपडत एक-एक उरकलं असेल. तेही हुरुपानं कौतुकानं! तिच्या डोळ्यापुढ आई दिसू लागली. आसवांचे दाट पडदे पापण्यांवर सरकू लागले. पण मनाला आवर घालायला आता ती शिकू लागली होती.

तात्या तिला न्यायला आले होते. उद्या तर ती जाणार! पहिल्या संक्रांतीच्या सणाला. तिळगुळ वाटायला. गोड गोड बोलायला, गोड काही सांगायला. उद्याच तर जायचं पण आईनं लाडू-वड्या कितीतरी दिल्या होत्या. लाडकी लेक माहेराला येणार असली; तरी लाडका जावई इथं थांबणार म्हणून त्याचंही कौतुकच. ही माणसं लेकीसाठी जावयावर सहजच प्रेम करतात. तसं सासरच्या माणसांनी लेकासाठी सुनेवर - - छे! कसलं प्रेम? लग्नातील देण्याघेण्यावरुन, मान-पानावरुन अजूनही कुरबुर. कधी कधी मारहाणही चालते. आईला तात्यांना हे काही माहिती नाही. त्यांना वाटतंय लेक सुखी आहे. आपण करायचं ते खूप केलंय. होय; पण ते त्यांच्या समाधानाला पुरेस नव्हतं. लेक दुःखी आहे, हे त्यांना नकोच कळायला. अधू डोळ्यांना आणखी आसवांचं श्रम, श्रमानंच थकली. आता तरी नको.

विचाराबरोबर तिनं आपला ओठ दाताखाली दाबला. आलेली कळ दुःख समजून तिनं सोसली.

दिनकर बाहेरुन आल्यावर तात्यांशी त्याची पाऊस पाण्यावरुन निमित्तमात्र चर्चा झाली. ऑफीसला जाताना त्यानं आईला जेवायला

पुन्हा वाढ असं नमाला बजावलं.

रात्री अगदी जेवण वेळेलाच दिनकर घरी आला. तात्या त्याची पाच वाजल्यापासून वाट पहात होते. त्यांनी तसं जावयाला पहाताच हसत हसत बोलूनही दाखवलं. मात्र त्यानं न ऐकल्यासारखं करुन,

'आई दुपारी जेवली का?' हे नमाला विचारुन घेतलं.

जेवताना सासऱ्याच्या बोलण्यामध्ये तो फक्त अधूनमधून हुंकार भरत होता. त्याला त्यांच्या बोलण्यात रस वाटतच नव्हता.

जेवण झाल्यानंतर बाहेरच्या खोलीत पान खातानाही दिनकरचं तात्यांच्या बोलण्याकडं लक्ष नव्हतं. आतल्या खोलीकडं त्यानं कान टवकारलेलं होतं. सासू-सुना जेवायला बसल्या होत्या. हळु हळू चाललेली धूसफुस त्याच्या कानांनी टिपली होती. तो आत गेला तेव्हा त्याची आई आपल्या ताटात सूनेच्या माहेरचं काही घ्यायला तयार नव्हती. नमाने बळेबळेच ताटात वाढलेला रव्याचा लाडू तिनं सुनेकडं भिरकावला. तिच्या खांद्याच्या हाडावर तो फुटला. दिनकरने हुकुमी, पण हळू आवाजात नमाला बजावले,

'तिला हवं तेच वाढ. जादा शहाणपणा करु नकोस.' नमाला रात्रीच्या जेवणाला ओकारी येत नव्हती, म्हणून तो जरा थंडच होता; पण त्याचमुळं त्याला सकाळी जेवणावेळी ओकारी येणं म्हणजे ढोंग वाटत होतं. आईचं म्हणणं त्यालाही पूर्ण पटलं होतं.

तो बाहेर आल्यानंतर तोंडापुढे मासिक धरुन त्यातील चित्रे व मथळे न्याहाळीत राहिला. त्याला सासऱ्याशी बोलणें नको होते. मासिक चाळता चाळता तो कॉटवर ऐसपैस पसरला. कॉटवर बसलेले तात्या सरकून अगदी कोपऱ्यावर बसले. थोड्याच वेळात त्यांना जावयाचं घोरणं ऐकू येऊ लागलं. त्यांच्या बिछान्याचीं सोय होईपर्यंत त्यांना तिथंच बसावं लागणार होतं.

नमानं कॉटच्या शेजारी बिछाना घातला. त्यावर ते झोपले. तिने दिनकरच्या अंगावर अलगद शाल पांघरली. त्यावरुन गरम रग घातला, तात्यांना तो घेताना कराव्या लागलेल्या पैशाच्या गोळाबेरजेची आठवण झाली, आणि मग सारं नमाचं लग्नच आठवत राहिलं. हुंडा कपडे मान-

पान देणं घेणं, कर्ज वाढत गेलेलं व्याज. त्यांची झोप उडाली होती.

पहाटेपासून नमा आवरा-आवर करीत होती. तात्या रात्रभर जागे होते. त्यामुळं तिच्या हालचालीची चाहूल त्यांना आपोआपच लागत होती. आठवत होतं, ती पहाटे कधीच उठत नव्हती. तिला ते जमत नव्हतं.तिची आई म्हणायची, 'लेकीच्या जातीला सारं जमायला पाहिजे.' त्यावेळी जे पटलं नाही ते तात्यांना आज पटलं होतं.

नमाची आंघोळ झाल्यावर तिनं तात्यांना आंघोळीस पाणी दिलं. त्यानंतर तिच्या सासूचं व दिनकरचं आटोपलं. दिनकर जरा चिडल्या-सारखा बोलत होता. तात्या मनातच म्हणत होते,

'सकाळच्यापारी एखाद्याला चिडल्यावाणी हुतं. जावायबापू त्यातलंच हैत.'

चहा-नाष्टा उरकला निघण्याची तयारी झाली. भरलेली बॅग नमानंच उचलली तेव्हा तात्यांनी ती आपल्या हातात घेतली. स्टँडवर जाताना दिनकर नमाशी बोलत चालला होता. म्हणून तात्या अतंर राखून चालले होते.

गाडी लागली. खिडकीजवळ नमा बसली. शेजारी तात्या बसले. जावईबापूंचा निरोप घेताना त्यांनी विचारलं,

'चार दिसांनी माघारी धाडलं तर चाललं न्हवं?'

त्यावर दिनकर हसला. म्हणाला,

'ते सारं ती सांगेल. तिला कल्पना दिलीय मी.'

त्यानं नमाकडं पाहिलं तेव्हा ती आणखीच रडू लागली. तात्या खुशीत होते. दिनकरला हात हलवून तीन-तीनदा

'बराय येऊ चा-सा दिसानं परत.' असं म्हणत होतं.

गाडी सुरु झाली, तेव्हा नमानं डोळ्यांचा पदर काढला. ती पुढे-मागे झुकून बाहेर पाहू लागली; पण दिनकर कुठेच दिसला नाही. तात्या तिची अस्वस्थता पहात होते. तिचे डोळे पुन्हा आसवांच्या पागोळ्या गाळू लागले. परमेश्वराच्या अगाध लिलेचं तात्यांना कौतुक वाटत होतं. लग्न बंधनानं एकत्र येणारे जीव एकमेकासाठी किती जीव टाकतात ते पाहून अचंबा वाटत होता. त्यांची लेक माहेरी येताना

सासरी निघाल्या सारखी रडत होती. सारखे डोळे पुसीत होती. तात्यांचं मन मात्र श्रावणसरीत नहात होतं.

गाडीनं वळण घेतलं आणि नमाला आठवलं तिनं शाळेच्या मेळ्यात म्हटलेलं गाणं,

'वळणावरुनी वळली गाडी
आज सोडला गाव ॥
तुझ्याच आई अश्रूसंगे
पुसीले पहिले नाव ॥
नव-नावाचं लेवुनी कुंकू
जाते मी माझ्या घरा ॥
आशीर्वाद लाभो आई
या पोटच्या पाखरा ॥

पहिल्यांदा मुंडावळ्या बांधून नांदायला येतानाही हे गाणं तिला आठवलं होतं. पण आज तिला ते अधिक घायाळ करीत होतं. भावनांचे मोती डोळ्यांच्या शिंपल्यात भरीत होतं. अनमोल मोती टपाटप खाली ओघळत होतं.

नमा देवळाच्या कोपऱ्यावर दिसली तेव्हाच तिची आई गडबडीनं आत गेली. भाकरीचा तुकडा व पाण्याचा तांब्या घेऊन बाहेर आली. नमावरुन भाकरीचा तुकडा ओवाळून टाकला, पाणी ओतलं. तिच्या तोंडावरुन मायेनं हात फिरवून अला-बला घेतली. शेजाराच्या आया-बाया जमल्या होत्या. घटकेत घर मोहरुन आल्यासारखं झालं. तात्यांना अंगावर फुलं पडावीत असंच वाटत होतं. शेजारणी नवऱ्याची ख्याली खुशाली विचारण्यात-चेष्टाविनोद करण्यात रंगल्या. तात्या तरंगल्या-सारखेच कधी परड्यात पोहचले, ते त्यांचं त्यांनाच कळलं नाही.

रात्रीचं जेवण झालं होतं. नमा अंथरुणावर पडली होती. झोप येत नव्हती. दिनकरचे शब्द तिच्या कानावर आदळल्यासारखे तिला भासत होते. तिच्या साऱ्या प्रयत्नावर पाणी पडले होते. दिनकरवर त्याचा काही परीणाम झाला नव्हता, तो आपल्या विचाराशी ठाम होता.

नमा या कुशीवरुन त्या कुशीवर वळत होती. आतल्या खोलीत

आई तात्यांशी बोलत होती. ते स्पष्ट ऐकू येत होते. विषय तिचाच होता, म्हणून तीही कान देऊन ऐकत होती.

'दिस गेल्याती पोरीला. चार दिस ऱ्हायाची परवानगी तरी पाव्हण्यानं दिलीय का?'

'पाव्हण्याच्या हातात काय ग हाय?'

'मंजीऽत्येनी काईचं सांगितलं नाय तुमास्नी?'

'ते काय सांगणार? चार दिस ठिवून घ्या म्हणून?'

'आता मी इचारु तुमास्नीऽका तुमीच मला कोडं घालता वो? मला सपष्ट सांगा की.'

'आता सपष्ट आणिक काय सांगू? तुझ्याच वळणावर गेलीया तुझी लेक. जावईबापू आक्षी मुठीत!'

'ऱ्हाऊं द्या तुमची चेष्टा.'

'आता आणिक चेष्टा कसली ह्यात? अग त्येनी समदं तिच्यावरच्च सोपीवलया.'

'मंग बरं झालं. जरा चवीधवीचं खाईल. धा-पंधरा रोज आनंदात काढील. माझ्याबी जीवाला वाईच - - -'

'छट्! नग मनात मांडं खाऊस. लई दिस ऱ्हाण्याची वातच सोड. ती दोघं एकमेकाला सोडाया धजत नव्हती. साऱ्या इष्टीलनं तूझी लेक सासरी नांदाय निघाल्यावाणी रडत हुती. इष्टी हालोस्तवर त्यांचं गुटुर घू सरलं नव्हतं. मग बोल कशी ठिवून घेवावी लई दिस?'

'खरंच म्हंता?'

'खोटं वाटतंय व्हय तुला; चार शेजारणी म्होरं हासल्यावाणी केलं! पण त्या गेल्यापस्न कशी उदास उदास दिसतीया.'

'व्हय तुमचीबी लेकीवर बारीक नजर हाय की'

'मग काय सांगतो तर! तू जास्त काय फॅड काढू नगस, दोन दिस काय कोड कौतुक करायचं ते करुन घे. मी तिला मंगळवारी पोचती करुन येतो.'

'इतक्या घाईनं?'

'तुला घाई वाटतीया; पण ती दोन ठिकाणी दोघं अशा नव्हा-

ळीच्या दिसात माशावाणी तडफडत ठेवणं बरं हाय का? '

आणि खरोखरच हे सारं ऐकता ऐकता नमा माशासारखी तडफडत होती. आतून कढ येत होतं. कंठात रुतत होतं. अंथरुणात ती उमाळून मुक्यामुक्यानं रडत होती. खिडकीजवळ येऊन दिनकरनं पुन्हा बजावून दिलेला निरोप तिला अजूनही ऐकू येत होता,

'दहा हजार येताना घेऊन ये. मी स्कूटर घेणाराय, लक्षात ठेव. मोकळी आलीस, तर घराबाहेर काढीन. पोटातलं मूल माझं नाहीच म्हणून सांगेन. पहा, तुझं तू ठरव. मी सारं तुझ्यावर सोपवलंय! '

दोन जीवाची नमा अंथरुणावर तळमळत होती. आई-तात्या केव्हाच झोपी गेले होते. नमाला मेळ्यातलं गाणं आठवत होतं

'वळणावरुनी वळली गाडी
आज सोडला - - - -

# ३. आक्रित

'- - - - -'

'आरं एऽ सखा, आल्यापास्न बोलत का न्हाइस?'

'काय बोलू?'

'मंजी रं?'

'बोलण्यासारखं काय आहे ग?'

'काय झालं?'

'काय राहिलंय?'

'आसा तिढ्यात बोलू नगंस बाबा. धंद्यात खोट आली म्हणून जीवाला घोर लावून घेतोस व्हय रं?'

'धंद्यात खोट आली म्हणून खचणारा मी नाही; पण रक्ताच्या नात्यातच खोट आलीय. त्याला मी काय करु ते सांग?

'रक्ताच्या नात्यात - - - तू - - - मला तू काय बोलतूस, त्यातलं कायबी कळत नाय. लेकरा!'

'तुला ते कसं कळणार? लेकीच्या मायाजाळानं आंधळी झालीस तू - - - मोठ्या आशेनं सहा-सात महिन्यानं गावाकडं आलो - - - - दरिद्री अवतारातली बायको पाहिली, पोरं पाहिली - - - झकपक लुगड्यातली, पाहुणीसारखी आई पाहिली - - -'

'सखा - - - आरं मला तरी कुठलं लुगडं मिळायला; पण यमुनीनं घेतलं म्हणून - - -'

'आई! बस्स झाला आता तुझा लंपडाव. माझ्या डोक्यात चांगला प्रकाश पडलाय. शहाणा झालो आता. मी विश्वासानं पाण्या-

वाचनालय व ग्रंथालय ACC NO-५३०

सारखा पैसा तुला पाठवत राहिलो, तू त्याची वाट लावलीस - - - त्या यमीचं माझ्या घरात यापुढं नावसुद्धा काढायचं नाही, समजलं! '

'पोरा, असा कसा विसरलास रं? समदा पैसा तुझ्या बायकूजवळ ठिवत हुते. पोरास्नी काही लागलं-सवरलं, तिला काय पायजे आसलं तरी तिची ती सोतंत्रच हुती. मी तिला कशाची बंदी केली का? '

'बंदी! चांगली नाकेबंदी केलीस. माझ्या आयुष्याची! पैसे हातात आले, की यमीकडं पळायचीस तू. साऱ्या पैशाची वाट लावून सुनेच्या स्वातंत्र्याचा गप्पा तूच मला ऐकवतेस काय? '

'आक्रित बोलू नगस सखा! राजीबाईच मला किराणामाल आणायला साताऱ्याला धाडायची. यमुनीकडं मी हौसंन नव्हते जात. राजीबाई बाजार सांगायची. पैसं द्याची. मी बाजार आणायची. आरं हिशोबाच्या पावत्या, ऱ्हायल्याल पैसं सारं मी तिच्याजवळ आणून देत हुते. तिनंबी कदी काय पैशाचा घोळ झाला, आसं म्हणलं नाय. कसली कुरकुर केली नाय - - -

'ती कशी कुरकुर करणार? तू तिची सासू! मी इथं नाही. एवढ्या-तेवढ्या कारणावरुन जर आकांडतांडव सुरु झालं असतं, तर लोकांनी तिला नावं ठेवली असती; शिवाय लाडकी लेक आईची बाजू घ्यायला धावत आली असती. '

'त्या पोरीवर अदावत घेऊ नगं. ती सासुरवाशीण - - - '

'का तुला एवढं तिचं वाटावं? चोळी लुगडं मिळत म्हणून? मला कळत का नाही तुमचं हे साटं-लोटं? तू तिला पैसे द्यायचे, तिनं तुला चोळी लुगडं घ्यायचं - - - हे ओघानच येणार. '

'लेकरा, मायभणीवर आसं आक्रित घेऊ नाय. मी कुणाची आण घेऊन सांगू? - - - सांग. '

'आणखी कोणाची! माझीच घे खोटी शपथ. मला मरणाच्या दाढेत घालून - - - '

'नग, नग पोरा, आसं इपरीत बोलू नगस. यमुनीचा संशव घेऊ नगंस, तिच्या नवऱ्यानं आपल्या लई नडी भागवल्याती. तिच्यावर आस आक्रित बोलू नगंस - - - सखा! '

'व्वा! गाढव कण्हण्याऐवजी गोणच कुंथायला लागली म्हणायची!
'पोरा डोक्यात राख नगं घालून घेऊस. शांत मनानं इचार कर. इश्वास ठेव माझ्यावर. मी तुझा पैसा देवाच्यानं इमानानं वापरला. पर पुरा पडना, म्हणून माझी वजरटीकबी मोडली.'

'मोडली नाही! दिली म्हण - - - यमीला!'

'त्वांड संभाळून बोल सख्याऽ,तुला तुझ्या बापाची शप्पत हाय - -'

'मला शपथ घालतेस तू; पण तुला आई म्हणायची मला लाज वाटते.'

'का? मी लिवणारी नाय म्हणूनच व्हय? मी लिवणारी आसते तर समदं लिवून तुझ्या म्होरं दिलं आसतं. कायबी काळबेरं झालं नसतं. तूबी दिल्याघरच्या मायभणीवर अदावत घेतली नसतीस. आता तुला माझी लाज वाटतीय, तर त्येला मी काय करु?'

'यमुनीकडं जा. लई गरजा भागवल्या नव्हं तिनं? मग एवढी गरज भागव म्हणावं! पैसा ठेवून घेतला. आता तीं तुला ठेवून घेते का बघ.'

'यमीकडं जा म्हणतोस? - - - पोरा, तुला जन्म दिला तसा तिलाबी. ती मला संभाळील; पण अंगी डाग घेऊन सोयऱ्याच्या दारात कशी जाऊ? तेबी लेकीला माझ्यासाठी बोल लावून.'

'तू जा. म्हणजे खरे काय ते तरी कळेल मला, ती येऊ दे इथं भांडायला. मग पाहतो सारं. तू मात्र इथं थांबू नकोस. मी धंद्यात बुडालोय. वेड लागायची पाळी आलीय. त्यात तुम्हा माय-लेकीच्या कारस्थानात कुटुंब देऊन फसलो. तू यमुनीकडं जा. ती तुला साठलेला पैसा देईल; निदान तुला थारा तरी देईल. माझ्यातून न निघणारा तुझा जीव तिच्याजवळ कसा राहातोय, ते तरी मला पहाता येईल.'

'लेकरा खुळा झालास तू! तुलां कुणी सांगितलं आसं? तुझा इश्वास तरी कसा बसला?'

'बास झाली तुझी ती नाटकं! राजश्री श्रीमंताची लेक आहे. तिच्यासमोर तू ही चोरटी नाटकं केलीस. त्यानंच माझी मान खाली गेलीय आता आणखी तमाशा नको. मला लाजवू नकोस आई! शक्य

तितक्या लवकर तू इथून निघून जा. उद्या बाबासाहेब येतील, त्यांच्या प्रश्नाला मला उत्तर द्यावं लागणार आहे. त्यांच्या मुलीचं, नातवंडांचं दर्शन त्यांना दुःख देणार आहे. ते सारं पाहून-ऐकून संतापतील. अशा वेळी तू इथं नकोस, आई! पिंडीवर बसलेल्या विंचवाची गय करता येत नाही. आई असलीस, तरी या गुन्ह्याला क्षमा नाही. मी अगदी चक्रव्यूहात सापडलोय. बाबासाहेबांनी भांडवल म्हणून मोठी रक्कम मला दिली होती. मी तर साफ बुडालो - - - वाटलं होतं तुझ्याकडं शिल्लक असलेली रक्कम देऊन मी मोकळा होईन. विनधास्त राहिलो; पण रात्री राजश्रीनं सांगितलं, नि ब्रम्हांड आठवलं-तुझ्यामुळं! जा, जा आई आता तुझ्या मायाजाळात मला अडकवू नकोस!'

'पोरा तुला सोडून कुठं जाऊ? कशी जाऊ? तू सांगतोस तरी कसं? तू माझी दुनिया हायेस. तूच जा म्हणतोस. इथच मी मेले आता! इथंन जाईल ते माझं भूतच जाईल. तू माझ्या काळजातच मेख मारलीस - - - माझं आईपन अपेशी ठरलं - - - तुझ्या बापाच्या माघारी माझं आसं - - -'

म्हातारीला पुढंच बोलवत नव्हतं. पदरानं डोळे पुशीत ती तिथं आशेनं घुटमळली; पण सखारामचं मन विरघळलं नाही. तो दूरवर नजर लावून खांबाला टेकून उभाच होता.

एका डागाळल्या-मळकट पिशवीत एक जुनेर कोंबून म्हातारी सखारामपुढं आली. आता तरी तो मायेनं कोसळेल, असं तिला वाटलं; पण त्यानं तोंड फिरवलं, तेवढ्यात नातवाने तिच्या पायाला मिठी मारली.

'आजी! मी येणाल तुझ्याबलोबल.'

'नको बाळा, मी डाक्तरच्या दवाखान्यात चालले.'

त्यानं मिठी सोडली. म्हातारीनं त्याला जवळ घेतलं कुरवाळलं. मायेनं त्याचं मुकं घेतलं. तिचं मन भरुन अलं. आषाढसरीसारखी आसवं ओघळू लागली. आतून हा सारा प्रकार पहात राजश्री उभी होती. बाहेर सखाराम तोंड फिरवून उभा होता.

'तू इथं घरातच थांब, मी येताना खाऊ आणीन तुला.'

'पेलू नि जांभलं आणं,'

'- - - - - - -'

'पिंकू इकडं ये बरं तू. त्या सगळंच काहीही आणायला निघाल्यात. जाऊ दे त्याना.'
आतून राजश्रीचे शब्द फणकारले. पिंकू आत गेला. म्हातारी सखारामाकडं बघत खांबाला धरुन पायऱ्या उतरली. न राहावून तिनं पुन्हा एकदा सखाकडं पाहिलं. एक उसासा टाकला. वैधव्याचं एक पर्व संपलं होतं. दुसऱ्या पर्वाला सुरुवात करताना ती थकल्या पायात बळ आणून कमरेत वाकून चालत होती. विन शिडाच्या होडीसारखी दिशाहीन! कळाहीन!! संकेतहीन!!!

टेकडीवरच्या लिंबाआड म्हातारी दिसेनाशी झाली. सखा ओसरीवर आला. टेकडीकडं त्यानं न्याहाळून पाहिलं. क्षणभर त्याच्या डोळ्यापुढं अंधारलं. जणु त्याच्या डोळ्यांच्या बाहुल्याच हरवल्या. मोठ्या आजारातून उठल्यासारखा त्याला स्वतःत निर्जीवपणा जाणवला.

समोरच्या भिंतीवर नानांचा हार घातलेला फोटो लटकत होता. नको वाटत असतानाच अंथरुणाला खिळलेल्या नानांचे शब्द त्याला आठवू लागले. ते आईला म्हणाले, 'सावित्री! तू रडू नकोस. आपला ह्यो सखा दहाला भारी हाय. तू त्येच्या जीवावर दुनिया बघशील.'

अन् आज त्यानं तिला दुनिया दाखविली होती. किती वेगळ्या तऱ्हेची! दुःखानं त्याचा चेहरा पांढराफटक पडला. ओंजळीत तोंड लपवून त्यानं हुंदका दिला. राजश्री केव्हाची चौकटीत येऊन उभी होती, ती चटकन् पुढं झाली.

'अहो, आत चला तुम्ही. जगाला तमाशा नको. मुलांनी व मी किती हाल काढले; पण जग काय म्हणेल, याची भीती होती, म्हणून सारं आतल्या आत सहन केलं - - - चला पुरुषासारखे पुरुष आणि बायकासारखं रडणं बरं दिसतं का?'

'बरं दिसण्यासाठीच का गं दुनिया सारं काही करते? मी आईला घराबाहेर काढलं ते बरं दिसण्यासाठी? - - - या माझ्या आईनं माझ्यासाठी काय केलं नाही बरं? - - - सारं काही केलं ते माझ्यासाठीचं. मी

उन्हात जाऊ नये, झाडावर चढू नये, नदीला पोहायला जाऊ नये म्हणून शपथा घालायची - - - ती माझी आई आज माझ्या शद्वासाठी उन्हातून गेली. - - - घर सोडून गेली. - - - माझ्या डोळ्या देखत गेली. - - - लटपटत-खुरडत - - - न जेवता गेली. मी पण किती क्रूर! तिला जाणं भाग पाडलं. - - - माळावरुन जाताना पाठीत वाकलेली ती एखाद्या बेवारशी मरतुकडया मांजरीसारखी दिसत होती. - - - मी मख्खपणें पहात होतो. ती गेल्याची खात्री वरुन घेत होतो माझे डोळे फुटले का नाहीत? माझ्या हातून हे काय घडलं? याचा शेवट काय होईल? - - - मला काही सुचेनासं झालंय; पण राजश्री, आज मीं आई असूनही तिला घालवून करंटा झालोय - - - हे मी कसं विसरु - - न? कसं सहन करु? '

'तेच म्हणतेय मी. असा त्रागा करुन घ्याल; तर प्रकृती खंगून जाईल. एवढं झालं तरी त्यांचा ज़ीव तुमच्यासाठी अडखळला का? एखाद्या आईनं पदर पसरुन विनवलं असतं, 'मला जा म्हणू नकोस' म्हणून; पण लेकीचा ओढा फार! त्यात निमित्त मिळालं. पैसा नि लाडकी लेक तिथं. इथं आता काय आहे? धंद्यात बुडालेला मुलगा नि त्याची नको असलेली वायको पोरं! त्या कशा इथं राहातील? त्या गेल्या म्हणून तुम्ही काहीतरी भावडे विचार मनात आणून हळवे बनू नका. उगाच हाल-वैताग करुन प्रकृतीवर परिणाम होईल. पैसे घेऊन येतील किंवा त्या पैशावरच तिकडे चैनीत राहतील. तुम्ही का दुःख करता. चला, जेवण करुन घ्या. '

'मला भूक नाही. तुम्ही जेवण करुन घ्या. मी जरा बाहेर जाऊन येतो. '

सखाराम घराबाहेर पडला. त्याचे दोन-तीन दिवस विचित्र मनःस्थितीत गेले. एकीकडे बायको, आईच्या वागण्याच्य तऱ्हा आणि पैशाची दडपशाही सांगायची; तर एकीकडे त्याला आजपर्यंतच्या आयुष्यातील आईच्या कष्टमय जीवनाचे व प्रेमाचे क्षण आठवायचे. एक जीवघेणा संघर्ष त्याच्या मनात थैमान घालत होता. धंद्यातील अपयश आणि आई-बायकोचा बेबनाव या दैवदुर्विलासाने त्याचे मन

आक्रंदून उठायचे. दोन-तीन दिवसांनीही आई आली नाही. तेव्हा ती यमुनीकडं मजेत राहिली असावी, या विचाराने तो मनात धुमसत राहिला. त्याची बायको राजश्रीं तर उघडपणे म्हातारीवर लबाड, चोरटी, स्वार्थी, भोंदू वगैरे शद्बांची उधळण करु लागली. सखारामही सुन्नपणानं ते सारं ऐकत होता.

यमुनी अचानक घरी आलेली पाहताच सखाराम व त्याची बायको दोघेही चपापली. म्हातारी जाऊन आठदहा दिवस झाले होते. यमुनीला ती बातमी कुणाकडून तरी मिळाली होती, खरे-खोटे काय ते जाणण्यासाठी ती आली होती. आई येथून जाण्यापूर्वी घरात भांडण झाले होते व ती कोठे गेली हे कोणालाच माहिती नाही, हे कळल्यावर ती धाय मोलून रडू लागली. तिला राजश्री म्हणाली,

'हे पहा असा कांगावा बरा नव्हे. भरल्या घरात असा हा अभद्रपणा करु नका. आमच्यावर थोडी संकटे कोसळीत का? '

'माझंच चुकलं नाही का? आई मेली असं समजून मीच इथं यायला नको होतं.'

'आता तुम्हाला आई जगली काय नि मेली काय, व्हायचा तो लाभ तर झालाच आहे; शिवाय मायेचं नाटकही तुम्ही झक्कास वठवलंत. तुमचं चुकलं असं कोण म्हणेल? जा! मिळालेल्या डबोल्यावर चैन करा, जा.'

'तोंड संभाळून बोल वहिनी! तुमचा पैसा मला हवा तरी कशाला? कसलं डबोल नि कोणी कोणास दिलं? स्पष्ट बोल! आईपेक्षा पैशाचं महात्म्य तुम्हांला अधिक वाटत होतं, तर मला सांगायचं होतं. मी गप्प होते, 'पैशानं आई विकत घेता येत नाही, ' म्हणून; पण तुम्ही तर तिला पैशासाठी हाकलीत. मला असं माहित असतं, तर मागाल ती रक्कम देऊन मी माझ्या आईला घेऊन गेले असते. तुमच्या नजरेला तिचं नखही दिसलं नसतं. तुमचं मन पापी नि डोळेही पापी.'

'नुसता बोलण्याचा दिमाख नका दाखवू. तुम्ही जर पुण्यवान आहात आणि दौलतीचा तुम्हाला एवढा दिमाख आहे; तर आईसाठी आणलेली दौलत तरी काढा की पुढं! '

' राजश्री, तू बोलू नकोस वरं.'

इतका वेळ मुकस्तंभासारखा उभा असलेला सखा म्हणाला; तेव्हा आपली भाल्यासारखी तेज नजर क्षणभर भावावर रोखून, भावजयीवर तुच्छेतेचा कटाक्ष टाकून यमुनी त्याचवेळी निघून गेली.

यमुनी गेल्यानंतर सखाराम फारच अस्वस्थ झाला. आई कुठं भलतीकडंच गेली, हे त्यास कळून चुकलं. विचारानं त्याचं मनं सैरभैर झालं. त्याची अन्नावरची वासना उडाली. झोप येईनाशी झाली आणि कशीतरी झोप लागलीच तर–

' सखा, हे आक्रित हाय! '

या आईच्या शब्दानं त्याची झोप विच्छिन्न होऊन जाई. अशाच एका क्षणी तो जागा झाला. तेव्हा त्याला राजश्री टेबलाजवळ पत्र वाचत उभी असलेली दिसली. त्याला संशयही आला. झोपेच सोंग करुन तो पडून राहिला. सकाळी त्यानं राजश्रीची नजर चूकवून ड्रॉवरमधील ते पत्र शोधून काढून वाचले. त्याला आता सर्व गोष्टींचा उलगडा झाला होता; पण वेळ निघून गेली होती.

दोन-तीन दिवस तो आईच्या नातेवाईकांकडे काही तपास लागतो का म्हणून फिरत राहिला. वर्तमानपत्रात ' हरवलेल्याचा शोध ' अशी त्यानं बातमीही दिली. त्याला चुकलेल्या वासरासारखा सैरभैरपणा आला होता; पण तो वरुन शांत होता. राजश्रीलाही तो काही बोलला नव्हता. असाच तो एका दूरच्या नातेवाईवाकडून गावी परतला. त्याची छोटी मुलगीं हातात पत्र घेऊन पोष्टाच्या पेटीत टाकायला चालली होती. त्यानं तिलां हाक मारली. तिच्या हातातील पत्र पाहिलं. त्याच्या मेव्हण्याचा त्यावर पत्ता होता. त्यानं ते पत्र उघडून वाचलं व तो ते पत्र घेऊन तडक घराकडे आला. राजश्री स्वेटर विणत बसली होती.

' आनंदात आहेस ना? '

नवऱ्याचा प्रश्न ऐकून ती केवढ्यांदा तरी दचकली. त्याच्या चेहऱ्याकडं पाहताच ती हादरली. पत्र टाकायला गेलेली पिंकी जवळच उभी. तिला शंका आली. भग्न नजरेनं तिनं त्याच्याकडं पाहिलं. त्याची नजर क्रूर श्वापदासारखी झाली होती. त्यानं आपल्या खिशातून ते पत्र

काढलं. त्या आधीचंही त्याच्या मेव्हण्यानं लिहिलेलं राजश्रीनं रात्रीचं वाचलेलं पत्र काढलं. आणि दोन्ही पत्र तिच्यासमोर धरुन तो चवताळून ओरडला,

'चांडाळणी! काय केलंस हे? भावाला चोरट्या धंद्यासाठी पैसे देऊन मला माझ्या आईपासून पोरकं केलस? तिला बेवारशी बनवून बेघर केलंस? बोल, का केलंस हे पाप? - - - बोल . - - बोल! '

रागाच्या भरात त्यानं थडाथड कानशीलात ठेवून दिल्या आणि ती पत्रे तशीच भिरकावून तो बेभानपणे बाहेर पडला.

घर सोडून आज सोळा दिवस झाले होते. वर्तमानपत्रातील बातम्यानुसार सखाराम बेवारशी प्रेत पाहायला गेला होता. तीनही ठिकाणी ती दुसऱ्या कोणाच्या म्हातारीची होती. मात्र प्रत्यक्ष पाहिपर्यंत त्याच्या छातीत वेगाने धडधड होई. या अशा तऱ्हेने फिरत फिरत तो नाशिकपर्यंत पोहोचला होता. परत घरी जाण्याची त्याला इच्छा नव्हती. आई भेटल्याशिवाय परत जायचे नाही, असा त्याने निश्चय केला होता. पण खिशातले पैसे संपले होते. प्रवासात, गर्दीत, देवळात घाटावरच्या गर्दीत प्रत्येक वृद्ध स्त्री तो न्याहाळून पहात होता. आपली आई शोधत होता!

आज दोन दिवस पोटात अन्नाचा कण नव्हता. अंगावरचे कपडे मळून भिकार दिसत होते. आता पुढे काय? हा प्रश्न त्यास वेडावत होता.

'आपली आई कुठं असेल? एकही पैसा जवळ न घेता ती कुठं गेली असेल? कशी रहात असेल? आई असेल ना कुठंतरी? की देवाला-ही ती आपल्यासारखी आवडली असेल? या विचारासरशी तो दचक-ला. उपासमार सोसणारी आपली आई हात पसरुन भीक मागत असेल का? त्याच्या नजरेपुढे एक सुरकुतलेला, थरथरणारा हात पसरला गेला आणि तो दचकून जागा झाला. बाकड्यावर सावरुन बसला. रात्रीचे बारा वाजून गेले होते. त्याला सिगारेट ओढण्याची इच्छा झाली; पण खिशांत पैसे नव्हते. बाकड्याखाली सिगारेटची थोटकं पडली होती - - - अनिवार तल्लफ - - - काडीपेटी नव्हतीं जवळ,

नाहीतर तीही थोटकं ओढली असती! आता एक-पस्तीसची सुपर एक्सप्रेस येईल. हे हमाल झोप धुडकावून उठतील. हमालीसाठी पळतील. त्यांना पैसे मिळतील. प्रतिष्ठा नाही, पण पैसे तरी मिळतात. पोटापुरते, नशेपुरते! प्रतिष्ठेला काय कराचंय? आपल्या प्रतिष्ठेनं काय केलं? काय मिळवलं? आई तेवढी गमावली! आई! कधी भेटेल? तोपर्यंत असंच भटकायचं. त्यासाठी जगायला हवं. त्यासाठी काहीतरी खायला हवं. कुठून आणायचे पैसे? - - - हमाली केली तर? - - - काय करावं? करावं का असं? - - - काय हरकत आहे? - - - आपला असा अवतार कोणी ओळखणार नाही - - - पैसे मिळतील - - - सकाळचे जेवण-सिगारेट - - - त्याची नजर पुन्हा पुन्हा त्या थोटकांकडे जात होती - - - त्यानं आता ठरवलं होतं, सुपर एक्सप्रेस आली की हमाली मिळवायची - - - आई भेटेपर्यंत असंच काहीतरी करत राहायचं - - - गाडीची शिट्टी झाली. हमाल पटापट उठले. तोही उभा होता - - - कोणत्या बाजूने जावे, असा विचार मनात घोळत होता-

गाडी स्टेशनला लागली. हमालांची धावाधाव झाली. तोही एका डब्याच्या दाराशी गेला आणि त्याच्या खांद्यावर घट्ट पकड पडली. त्याने मागे पाहिलं. गावचा रंगाशेठ होता. त्याला मेल्याहून मेल्यासारखं झालं तो त्याला काहीतरी म्हणाला व गर्दीतून बाजूला घेऊन आला. सखाराम अगदीच गांगरला होता.

'मला खरंच वाटलं नाही गड्या! म्हणलं, म्हातारी इकडं कशी?'

'कोण?'

'आता आणिक कोण? तुझी आई रं, मागल्या ठेशनावर दिसली, पण गाडी हालली हुती. म्हणलं, सखाची आई नसलं माणसावाणी माणसं आसत्याती रग्गड - - -'

'गाडीच हालली तर खात्री कशी करुन घेणार? हाक तरी कशी मारणार? बाकी काय बी म्हण गड्या, पण माझ्या मनाला, जीवाला लई दुःख झालं. तुला इथं पायलं नि माझ्या मनाची खात्रीच झाली. उतरलो खाली, म्हणलं इचारावं तरी, सखा, काय असं तकदीर पालट-

लं नि अशी येळ आली रं?'

'तुम्हाला माझी आई दिसली?'

'व्हयं तर. खोटं सांगतो की काय? मागल्या ठेसनावरच दिसली सखा, येवढी खराब येळ का आली रं तुम्हावर?'

सखारामला उत्तर सुचलं नाही. तो गांगरुन म्हणाला,

'जाणारी गाडी कितीला सुटते शेठ?'

'का रं? तुझा धंदा बुडाला म्हणून इचारतोस? - - -'

बोलत बोलत त्यानं पाकिट काढून सखारामाच्या हातावर वीस रुपये ठेवले. सखाचे डोळे आसवांनी डबडबले. तो म्हणाला,

'शेठ, मी आईला शोधत हिंडतोय. मला आता जायला हवं.'

'आक्रितच हाय सखा. तुमचा एकमेकास्नी पत्ताच नाही म्हणा की, आर मी तर येगळंच समजत हुतो.'

त्यांवर काही न बोलता सखा गडवडीनं दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर गेला. जाणाऱ्या गाडीच्या वेळा तो पहात होता.

- . - रंगाशेठला सारं आक्रितच वाटत होतं!

("गृहिणी-कामिनी-संसार" आंतर महाविद्यालयीन कथास्पर्धा प्रथम क्रमांक १९७६)

# ४. व्हॉट मम्मी?

वस्तीवरच्या बंगल्यात दोन भाडेकरु कुटुंबे रहात होती. एक शाळामास्तरचे कुटुंब, शांत नि शिस्तीचे तर दुसरे भांडखोर, ख्रिश्चन जोडपे. मर्सी आणि डॅनी त्यामुळे चांगलेच प्रसिध्द झाले होते. आसपास-च्या मराठी लोकांना या ख्रिश्चन जोडप्याचे रीती-रिवाज माहिती नव्हते; पण त्यांची भांडणे मात्र सर्वांना करमणुकीचा कार्यक्रम वाटे. मर्सी डॅनीचे भांडण सुरु झाले की शेजारचे लोक एकमेकाकडे मिस्कील नजरेने एकमेकांना खूणवत, शाब्दिक चकमक थोडयाच वेळात झटापटी-वर-मारामारीवर-फेकाफेकीवर येऊन ठेपत असे, मग मर्सीचे हुंदके डॅनीचे तिला समजावणे चाले. खेळ संपल्याची सूचना मिळाल्याप्रमाणे लोक आपापल्या घरी जात.

'मर्सी, काय ग हे?'

'रातको सब फुट गया मम्मी.'

फुटलेली क्रोकरी मर्सीने फेकली. परत येण्याच्या घाटेवर आक्का उभ्याच होत्या.

'रोज रोज का ग भांडता?'

'देखो मम्मी, मैं तो माँ बननेवाली। मुझसे सारा काम करना मुश्कील होता है, और डॅनी - - -'

'मग काय नवऱ्याला काम कर म्हंतीस व्हय?'

'डॅनी हेल्प करताही नही कुछ।'

'त्यो गडी माणूस काय काम करणार ग? कामाला बाई लावा-यची.'

'हमारी कास्टवाली छोरी अब आनेवाली है।'

'मग बरं झालं. तुमचं रोजचं झंगाट संपंल.'

आणि झालंही तसंच. मर्सीच्या घरीं एक सतरा-अठरा वर्षांची पोरगी कामाला आली. भांडणाऐवजी हसणं-खिदळणं त्या कुटुंबात सुरु झालं. अधून-मधून उद्‌भवणाऱ्या 'त्या' चकमकी संपल्या. ल्यूसी घरकामात चलाख होती. जन्मापासून पोरकी. याच्या-त्याच्या घरी वाढलेली. म्हणून सर्वांची मर्जी राखणारी. आक्कांच्या दोन पुतण्या जेव्हा गप्पागोष्टी करायच्या, तेव्हा ती तेथे येऊन मिसळायची. आता मर्सी फारच जडावली होती. ल्यूसी सारे घर आवरत असे. स्वैपाक, धुणी-भांडी, केरवारा अगदी चोख करीत होती. एक दिवस मर्सीच्या पोटात दुखू लागलं. तिला घेऊन डॅनी व ल्यूसी दवाखान्यात गेले. दवाखान्यातून बाळाला घेऊन आल्यावर डॅनीने साऱ्या वस्तीत पेढे वाटले.

वस्तीवर रात्री अपरात्री बाळाच्या रडण्याचा आवाज क्वचित यायचा, मात्र एका सकाळी पूर्वीसारखे डॅनी-मर्सीचे युद्ध सुरु झाल्याचा आवाज आला; पण लवकरच शांतता झाली. दोन-तीन दिवसांनी आक्का मर्सीला म्हणाल्या,

'आता का ग भांडतीस नवऱ्यासंग? सुख दुखाय लागलं व्हय?'

'मम्मी, मुझे गलत मत समझो।' असे म्हणताना मर्सीचे निळे डोळे भरुन आले आणि तिने आपले दुःख आक्कांना सांगितले. ते ऐकून आक्कासुद्धा चक्रावल्या. साशंक झाल्या. म्हणाल्या,

'कितीवेळा बघितलंस ग तू.'

'चार बार देखा - - - पहला डिब्बा गिरनेका आवाज उसके बाद डॅनीका अंदर जाना - - - आना,'

'पयल्यांदीच नाय का तेला टोलवायचंस'

'क्या?'

'अग पयलं पायलं तवाच का बोलली नाय तू नवऱ्याला?'

'मुझे भरोसा था डॅनीपर। आँखोपर विश्वास नही था।'

'आता बसला व्हयं? कपाळाचा भोग असतो बग ह्यो. आता तुझा डेनी काय म्हंतो?'

'कहता है, ल्यूसी डेंबीस हैं, जान बुझकर डिब्बा गिराती है।'

'आन् ह्यो डबा ठेवायला जातो व्हय? - - - काय बाय तरी नाटक ही, आता रोजच - - -'

'मैने पूछा उसे, 'इतना मालूम है, तो मुझे जगाकर क्यो नही दिखाया?'

'आस्सं - - - मग काय म्हनला?'

'वो तो बाते बनाता है। 'तेरी नींद तोडना मुझे अच्छा नही लगा।' ऐसा बोलता है।'

'मग डेनीला अच्छा काय वाटतं ग? अशी सिंदळकी केल्यावर कोण गप्प बसलं? भांडणाला रोजचं खतपाणी मिळलं, माझे बाई! नि जाशील पागल बनून.'

'पागल तो अब ही बन गयी हूँ, मम्मी - - - क्या करु? मेरा लक खराब निकला, मम्मी - - -'

मर्सी हुंदके देत सांगत होती. आक्कांनी त्यावर विचार करुन तोड काढली.

'मर्सी, माझं ऐक. माझ्या घरात मी आन् माझ्या दोन पुतण्या– तिघीच आसतो. तुझ्या ल्यूसीला आमच्याकडं झोपायला धाडत जा.'

ते ऐकून मर्सीचा चेहरा उजळला. डोळे कोरडे करता करताच तिने मान डोलावली.

त्या रात्री ल्यूसी आक्कासाहेबांकडे झोपायला आली.

सकाळी चहा घेताना आक्कांची कॉलेजात जाणारी पुतणी म्हणाली,

'माई, ती ल्यूसी रात्री रडत होती ग.'

'सपान पडलं आसंल तिला.'

'हुं! तुझं हेच. स्वप्न वगैरे नाही ग. बराच वेळ रडणं, डोळं पुसणं चालू होतं.'

'गावाकडची सय येत आसंल तिला.'

आणि तो विषय तेथेच मिटला.

रात्री गाढ झोपेत असलेल्या आक्कांना तृप्तीनं गदागदा हलवून जागे केले.

'काय ग?'

'बघ ना ती - - - ल्यूसी रडतेय.'

'बया, बया, बया! काय ग ह्यो वणवा! धड झोपू देत नाय.' आक्का आळस देत म्हणाल्या. त्या आधींच जागी असलेली मुग्धा म्हणाली,

'ए ऽ ऽ काय झालं ग. ए ल्यूसी? ऐकतेस ना?'

'गप्प झाली बघ.'

'बरं. झोपा आता तुमी पण.' असं म्हणून आक्कांनी पुन्हा अंथरुणावर अंग टाकले, पण त्यांची झोप लागते न लागते तोच पुन्हा हुंदके!

आक्का आता अंथरुणावर सावधपणे उठून बसल्या. आपल्या करड्या आवाजात त्या तृप्तीला म्हणाल्या,

'मोठी लाईट लाव ग. - - - हां - - - लुसे - - - एऽ लुसे - - - गत्काळी! - - - तिला हलवून उठव ग. ढोंग नग दावूस म्हणावं. काढ चादर अंगावरची. हालव. काय आगाव हाय. मूस्कुटून घेतीया.'

'माई, ती उठत नाही बघ.'

'मानंखाली हात घालून उठवून बशीव. मुग्धा, दोघीजणी उठवा तिला.'

'माई, जाऊ दे ग. घरची आठवण होत असेल. उद्या मला लवकर कॉलेजवर जायचंय. झोपू या आता.'

'मग, मला का उठवून बसीवलीस ग? तिला रडण्याचं कारण तर इचारलं पायजे ना? - - - थांबा - - - मीच उठवते तिला.'

आक्कांनी ल्यूसीच्या मानेखाली हात घालून झटक्यासरशी बसती केली. तिच्या दंडाला धरुन तृप्ती म्हणाली,

'ल्यूसी का रडत होती?'

'ऊं - - - हं - - -'

'पाण्याचा हबका दे तोंडावर मजी बोललं.'

'माई, तुझं काही तरीच. ल्यूसी, साऱ्यांची झोप मोडलीयस तू. सांग तरी का रडत होतीस?'

'- - - अं? '

'थोबाड फोडू का? '

'व्हॉट मम्मी? ' ल्युसी डोळे चोळण्याचा वहाणा करीत म्हणाली आणि आक्का तिच्या ढोंगाने जाम खवळल्या.

'ममीच व्हाट काय म्हणत्यात त्ये तुला चांगलं ठाव हाय! उगं रंग ढंग केल्यालं चालणार नाय, सांगून ठेवते.'

'व्हॉट मम्मी? '

'आता हिचंऽ '

'ल्युसी तू रोती क्यू? ' मुग्धानं मधेच विचारलं.

'नो. गॉड! '

'ग्वॉड तर कायच नाय, पण कळत असूनबी मध्यान्राती गळा का काढतीस? - - - व्हय ग? '

'व्हॉट मम्मी? '

'माझ्या व्हटाशी तुझं काय घेणं-देणं ग? तू रडतीस का ते सांग म्हणतूय आमी, का रडतीस? '

'ल्यूसी, रातको तुम क्यू रोती है? ऐसे मम्मी पूँछती है। '

'नो बाबा! - - - नो बाबा. '

'हो बाबा म्हण! आमी एक सोडून तिघीजणी तुझं रडणं ऐकतुया नि तू नाय म्हणतीस? '

'कुछ नही, मम्मी। '

'मग रडून आमच्या झोपचं खोबरं का करतीस?'

'व्हॉट मम्मी? '

'गप् सटवे! खरं काय ते सांगाय नको, म्हणून माझ्या व्हटाच इचारतीस. '

'अब ना रोऊँगी। '

'ए माई, जाऊ दे गं. झोपू दे, तिला. '

आक्का बडबडत स्वत:च्या अंथरुणाशी आल्या. घरच्या पोरी झोपी गेल्या, पण ल्यूसीची चुळबूळ चालू होती. आक्कांना झोप लागलीच नाही. कोंबडा आरवला. त्यांची नेहमीची उठण्याची वेळ झाली. सकाळ

च्या शांत मंगल वेळी मात्र त्यांच्या मनात ल्युसीबद्दल संशयाचे वादळ उठले होते.

अशाच दोन-तीन रात्री गेल्यावर त्या तृप्ती व मुग्धाला म्हणाल्या-

'आता लुसी रडत नाय, न्हाइ ग?'

'आता ती फक्त हुंदके देऊन रडत नाही. तुला पत्ताच नसतो.'

'दिदी, तिला फार बोअर होतंय. नाही ग?'

'तर काय. आपल्या दारांना आतून कुलुपं! नाहीतरी ती पळून गेली असती, नक्कीच!'

'दुसऱ्याच्या सोन्यासारख्या संसारात इखं कालवायला ती - - -'

'माई तुझं आपलं काहीतरींच, ती तशी भोळी आहे ग. तिला प्रचंड दुःख असावं - - - आमचे सर म्हणतात, अशी माणसं - - -'

'पुरं झालं तुमचं शाळंतलं शानपन. तुमाला माती कळतं'

'माई, तुझ्या कल्पना फारच भन्नाट असतात.'

'मर्सीला इचारा तुमी. तुमच्या त्या लुसीला तो डेनीं पायजे हुता का नायते!'

'छीः छीः! काय तो डॅनी, पितो काय, वागतो काय, वेंधळा नुसता. ल्युसी म्हणजे काय मर्सी वाटते की काय तुला?'

'अशा छिनाल बाया देखणेपणावर दुसऱ्याचं सुख वरबडून घेतात.'

माईपुढं त्या दोन पुतण्या-पोरींचं तुणतुणं चाललं नाही. तो वाद तेथेच थांवला.

स्वैपाक घरात भांडे पडून ठणठणाट झाला. आक्का जाग्या झाल्या. रात्रीचे अडीच वाजले होते. ल्युसी आणि पोरी गाढ झोपेत होत्या. आक्का स्वैपाक घरात जाऊन आल्या. मांजराने कपाटावरची कढई पाडली होती.

त्या परत आल्या आणि झोपलेल्या ल्युसीकडे पाहू लागल्या, नि पाहातच राहिल्या. फुलाची पाकळीन् पाकळी पूर्णपणे उमलावी असे तिचे अवयव टवटवीत आणि लोभस दिसत होते. चेहऱ्यावरुन छाती-वरुन त्यांची नजर तिच्या पोटावर सरकली. स्कर्टचा हुक न लावता

आल्याने तेथे पिन लावलेली दिसत होती.

दुसऱ्या दिवशी आक्कांनी आपली शंका मर्सीला सांगितली. बिचारी मर्सी घाबरली. तिचा घसा सुकला होता. आपल्या मनातील भीती ती आक्कांना बोलून दाखवत होती. तिचे सारे धैर्य संपले होते.

' मम्मी कौन होगा वो? डॅनी तो नही? '

' तू खूळीच ग. लुसीचं प्वॉट चांगलं पाच महिन्याचं वाढलंय. तुझ्यात ती आली त्येला दोन महिनंबी झालं न्हाईत. '

मर्सीच्या जीवात जीव आला. सुरुवातीस ल्यूसीने डवा पाडण्याची नाटके का केली ते आता तिच्या लक्षात आले; पण आता जे संकट तिच्यापुढे उभे राहिले होते, त्यातून कोणता मार्ग काढावा हे ती आक्कांनाच विचारु लागली. मुग्धा-तृप्ती-डॅनी यांच्यापर्यंत ल्यूसीचे रहस्य पोहचले. चार-सहा दिवस त्या दोन घरात चाललेल्या चोरट्या सूचक नजरा नि दबक्या आवाजातील चर्चा यांनी ल्युसी हैराण झाली होती.

※ ※ ※

' लुसेऽ, तिथंउभी राहून काय करणारैस? आमाला पुलीसाची दांडकी खाया लावणार का? जीव देणार हाइस का? '

ल्यूसीच्या पाळतीवर असलेल्या आक्कांनी तिला विहिरीच्या काठावर गाठून धमकावून विचारले, तेव्हा तिने अभावितपणे नेहमीचाच प्रश्न विचारला,

' व्हॉट मम्मी? '

' अऽग, तू पाण्यात जंप घेणार हुतीस ना? '

' नो - - - नो मम्मी, मुझे स्विमिंग-अच्छी तरहसे आता है। '

' चल तर घरांकडं कडुसं पडाय लागलंय. '

गरीब गाईसारखी ल्यूसी आक्कांच्या मागोमाग चालली होती.

' लुसे, तुला किती म्हैनं गेल्यात? '

' व्हॉट मम्मी? '

' कर्म माझं! '

तिच्या पोटाकडे बोट दाखवून आक्कांनी खुणेनं पुन्हा तोच प्रश्न विचारला, आणि ल्यूसी मिटल्या ओठांनी भरल्या नेत्रांनी खाली नजर लावून चालू लागली.

त्या रात्रीच डॅनी–मर्सी आणि आक्कांचा पुढचा बेत पक्का झाला. मर्सीच्या माहेरच्या नात्यातली ल्युसी दूरची नातेवाईक होती त्यामुळे बेत रचताना डॅनी विचाराने पक्का होता पण मर्सीच्या काळजात तुटत होतं. म्हणूनच ल्यूसीला रेल्वेस्टेशनवर पोहचवण्याची जबाबदारी आक्कांनी स्वतःवर घेतली. ल्यूसीला मद्रासला पाठवून डॅनी-मर्सीचे कुटुंब त्या संकटातून मुक्त होणार होते. ल्यूसीचे पुढे काय होणार हा प्रश्न मर्सीला गुदमरुन टाकत होता; पण स्वसुखार्थ ती सावधपणें कठोर झालेली होती. मधूनच ती भावविवश होऊन म्हणाली,

'बचपनसेही ल्यूसी लावारीश जैसी रही। श्रमके बदलेमें उसे जिंदगी मिल गयी। कैसी जिंदगी ये? किसीके गन्दी वासनाकी वो शिकार बन गयी। दुनियामें कोई नही है उसका। सहारा तो मेरा था - - - लेकिन मैं - - - ओ गॉड कैसे मोडपर आये है हम?'

मर्सी रडू लागली. आणि वैतागलेला डॅनी ओरडला,

'नॉन्सेन! स्टॉप इट, मर्सी! मम्मी, उसे अपनी कल्याणकी बात कहो।'

लांब लांब पाऊले टाकीत तो फॅक्टरीवर कामाला गेला.

दुसऱ्या दिवशी आक्का डॅनीच्या घरात गेल्या. ल्यूसी पाळण्यातल्या बाळाला खेळवत होती. पापे घेत होती. प्लॅस्टीकच्या पिशवीत पोळी-भाजी घालून मर्सीने ल्यूसीचे बास्केट भरले. डॅनीने ल्यूसीचे रेल्वे तिकीट आणि तिच्यासाटी पैसे आक्कांजवळ दिले. आपल्या प्रस्थानाचे कारण, दिवस, वेळ ल्युसीला सांगितली होती. तिने तो बेत ऐकून नकार न देऊन मान्य केलेला होता. आतापर्यंतच्या रात्री तिने आक्कांच्या घरी घालविल्या; पण 'त्या' रात्रीपासून तिने हुंदका दिला नाही. तिच्या नजरेत तिचा आक्रोश व दुःख गोठून गेले होते. एवढे होऊनही तिने कोणाकडे दयेची भीक मागितली नव्हती. आक्कांना ते आक्रित वाटत होते आणि ढोंगही; म्हणूनच त्यांना तिची सहानुभूती वाटत नव्हती.

खोताच्या मळचापर्यंत सोबत आलेल्या मर्सीला आक्का म्हणाल्या
'मर्सी, जा माघारी तू. लेकराची आई हाईस, दुखनं आलं तर आता हाताखालीबी कुणी मिळायचं नाय.'

मर्सीने ल्यूसीला जवळ घेतले. तिच्या बॉबवरुन हात फिरवला.

'ल्यूसी, माय डिअर! - - - गॉड ब्लेस यू - - - ल्यूसीऽ'

तिला आणखीही काय बोलायचे होते, पण वेळेचे बंधन होते. आपले प्रेम तिने अश्रूंनी दाखविले; पण ल्यूसीने तिला एका शब्दाने काही विचारले नाही, की सांगितले नाही. जिवंत दगड होऊन ती फक्त पाहात होती. ऐकत होती. तिच्या डोळ्यात आज अश्रूही येत नव्हते. मर्सी माघारी वळली. आपली वास्केट संभाळत ल्यूसी आक्कांसोबत रेल्वेस्टेशनकडे जात होती.

'बाई, लुसे, बाईची जात हारभऱ्यावाणी-पाणी लागलं की फुगणारी! तुला आस सांगणारं कुणी भेटलं नाय, म्हणूनच तू करु नाय ते केलंस नि होऊ नाय ते झालंय.'

'व्हॉट मम्मी?'

'हेच ग. मद्रासला तू जाणार. आवघडल्याली बाई तू. कोण तुला आसरा देणार?'

'कोई आसरा देगा जरुर। कोई रास्ता मिलेगा।'

'तू त्या चंडाळाचं नावपण नाय सांगत. आसरा देणारे आसते तर तिथनं आली नसतीस, इथंन चालली नसतीस. व्हय ना?'

'अं? - - - मम्मी तेरी लँग्वेज - - - भासा मै जानती नही। मेरे लिए दुख मत करना। मै इमानदार हूँ। काम-मेहनत करती हूँ। जरुर कोई मुझे आसरा देगा। जरुर देगा।'

'कोण देणार?'

'गॉड!'

'काय ग्वॉड?'

'अं? - - - याने कीं - - - भगवान'

या कालच्या पोरीनं रंगढंग करुन पोट वाढवलं नि मर्सीच्या संसारात विष कालवलं, असं ठासून सांगणाऱ्या आक्का गप्प झाल्या.

होत्या. त्यांचं अंतःकरण ढवळून निघालं होतं.

बालपणीच आई-बाप हिरावून घेणारा देव, पोटासाठी उष्टी खरकटी काढून लोकांच्या दयेवर जगायला लावणारा देव, पापी भाग्यवंताकडून मातृत्व लादणारा देव! त्या देवाचा ल्यूसीला विसर पडला नव्हता. त्या देवाला ती 'गॉड' म्हणते. आपली मुलगी शोभेल अशा या ल्यूसीला स्वार्थाने, क्रूरतेने आणि वासनेने वरबरटलेल्या जगात उघड्यावर सोडण्यासाठी आपण चार-सहा दिवस खलबत करुन बेत रचला. आपणास त्या देवाची कधीच आठवण झाली नाही. आयुष्यात आपण एकच दुःख आजपर्यंत मिरवलं वांझपणाचं! पण ते दुःखही आक्कांना आज 'वांझच' आहे, हे पटलं!

रेल्वेच्या डब्यात खिडकीजवळ बसलेल्या ल्यूसीला आक्का बजावत होत्या -

' जीवाला जप, दुनिया पाप्यांची हाय. पुन्हा आशी एखांद्या पापी भाडखाऊच्या नादी लागू नकोस. बच्चा कुणाला देता आला नाय तर सोडता आला तर बग - - - सावधपणानं रहा - - -'

' व्हॉट मम्मी? '

' आन् - - - आन् - - - न्हाईच कुठं जमलं तर - - - लुसे, लेकराला घेऊन माझ्याकडं ये तू. ' आपल्या छातीवर हात ठेवून त्या म्हणाल्या; पण गाडीने वेग घेतला होता. ल्यूसीचे अखेरचे शब्द कानी पडले होते,

' व्हॉट मम्मी? '

( ' रणरागिणी ' दिवाळी अंक- १९८७ )

# ५. बारुद

येशीत वऱ्हाड वाजतंय. उद्याच्या तिथीला सावकाराच्या लेकीचं लगीन हाय, खुळी जिजी आत्ताच्च तिकडं पळाली. बारुद उडाय लागलं की आरड-वरडत पळून येईल. सुऽरुंग-सुऽरुंग म्हणून किकळ्या फोडील. नवऱ्याला आपघाती मरण आल्यापास्न ती अशी खुळी झाली. ती भ्याली की 'सुरुंग सुरुंग' म्हणून किकळ्या फोडते. समदा मागला भोगवटा आठवतो वो तिला अशा वक्ताला तिच्या अंगाला कापरं भरतं. आमी तिला धरुन वाकळत दडपून निजवतो. लगीन सराईत रोजची हीच झेंगट. चार सालं झाली. आसंच चाललंय· आमच्या ह्या गायकवाड वाड्यात्लं कुणी येशीत बारुद उडतं, ते बगायं नाय जात. जिजीचं डोस्कं ठिकाण्यावर आस्तं तर तीबी गेली नसती. आज दिसभर तिच्या आंजीची मला लई सय येतीया.

आसंच थाटात लगीन लागलं नि आंजी नांदायला गेली हुती. नव्या नवरीला आणायला दादा गेलं. म्हणलं, हाळदीच्या अंगानं गावच्या देवाला पाया पडायला नवरा-नवरी आली आसंल.; पण गाडीत नुसती आंजीच दिसली. दुसऱ्या दिवशी कानावर आलं आंजीचा नवरा आंगठी -घड्याळ घेतलं तरच येतो म्हणला; म्हणून दादाला नुसतं आंजीला घिऊन येणं भाग पडलं. काय तरी तऱ्हा म्हणावं एका एका जावयाची. अमृतानं पाय धुऊनच जल्माला आल्यावाणी करत्याती.

दोन दिसानं आंजी सासरी निघाली हुती. बुत्तीच्या दुरड्या बांधून गाडीत ठिवल्या हुत्या. आंजी जाताना मायंदाळी रडली. लेकीचा जल्म वंगाळ दोडाचा. आया-बायानीबी डोळ्याला पदर लावलं. गाडी

हालल्यावर जिजीनं सांगितलं,

'आंजीला घरात खाया-पियाची ददात नाय. तिथला सुकाळ वगुन तिला माह्यारची हालाखी डोळ्याम्होरं येती नि घास गॉड लागत नाय. समदं चांगलं हाय. सवतर सासू अल्लाची गाय हाय. सासरा देवगुणी हाय. नवराच जरा आडमुठ वाटतो; पण आंजी सगळं जमवून घेतीया.'

मन भरल्या आडावाणी डबाबलं. लेकीच्या जातीला आणिक काय मागतो आपुन? त्यायळंला माझ्या बच्छीचबी आसंच नसीब उगडु दे रं सिदुवाराया म्हणून मी देवाला हात जोडलं.

जावायाची रजा संपून त्यो जायाच्या वक्ताला आंजीचं दादा त्येला भेटायला गेलं हुतं. पैशाची जुळणी केली. जिजीनं चार लाडू वांधून दिलं संग. तालेवार जावयाला त्यात कसली आप्रूवाय? पण गरीब-नाचारानं रक्तांच्या तेलाचं दिवं ववाळणं भाग पडतं. जावयाला ठेसनावर निरोप दिऊन दादा थेट गावाकडं आलं. मला वाटतंच भेटलं जरा उदास वाटलं. म्हणलं, नव्या जावायाची तऱ्हा नव्या येसनीच्या खोंडावाणी आस्ती येईल ताळ्यावर हळुहळु.

पंचमीला माह्येरला आल्याली आंजी चांगली केळीच्या खांबावाणी झाली हुती. भरल्या शेंगवाणी टच दिसत होती. पोरी-पोरीत चेष्टा-मस्करी चालली हुती. सांची जेवणं झाल्यावर जिजीसंग माझ्या सोप्यात आली. आणखी दोघी-तिघी आया-बाया हुत्या. आंजीच्या सासरचा इषय निघला. ती बडेजावीनं एक-एक सांगीत हुती; पण रजा संपवून जाताना जावयाने आंजीच्या दादा म्होरं चढाकपणा केला हुता. एक-दोन नादबी हुतं त्याला पण पुर्षाच्या जातीला नाद असायचा. हुईल कमी. दादाचा बाकीच्यानी मातूर मान राखला. समजूत काढली. समदं बेस चाललं हुतं. आंजीला सावतर दीर-ननंदबी माया लावून हुती. नवऱ्याची खुशाली कागदानं कळत हुती. सारं ऐकून घेतल्यावर आतापातूर पेंगत बसल्याली बाळकी म्हणली,

'आंजे तरीच बाळसं चढलगं तुझ्यावर!'

आंजी लाजली. तवर लिलीनं शेंडा हाणलाच,

'पण आंजे बाळसं तुझ्या यकलीचंच हाय का?'

'चला ऱ्हाऊं द्या तुमचं. कायतरीच बोलायचं.'

आसं म्हणत आंजी घराकडं पळाली. लई हाका मारल्या पण माघारी कुठली येतीया. आमास्नीं आक्षी भरुन पावल्यावाणी झालं. आंजीच्या लग्नासाठी दादानं काळजाच्या तुकड्यावाणी शेत सावकाराकडं टाकलं, ते कारणी लागल्यावाणी झालं. त्या येळला आंजी जाताना पयल्यावाणी उसनून-उसनून रडली नाय, एवढं खरं. कुणाचंबी चांगलं करता करता, देवानं आपलं चांगलं करावं आसं वाटतं.

म्होरं दिवाळीला आंजीला आणलं हुतं. लग्नाआधी तिला उन्हातान्हात शेतात काम करायला लागायचं. सुगीत रोजानंबी जावं लागायचं; पण नांदायला गेल्यापास्न ती सावलीला आली. वाण उजाळला. गाल वरती आलं व्हटाचं डाळींब पिकलं व्हतं. रुपात पयल्यापरास लांब फेर पडला हुता. गोष्टीतल्या राजाच्या राणीवाणी दिसत हुती. एकदा जिजीला म्हणलं,

'दिष्ट काढ पोरीची. नवं नव्हाळं हाय.'

जिजी सुखावून म्हणली,

'व्हय बाय. माझ्याबीं मनात तेच येतं.'

दिवाळीला पंधरादी ऱ्हाऊन आंजी गेली. जेष्टात तिचा नवरा दोन महिन्याच्या रजेवर येणार हुता. आमी आमच्या उद्योगात हुतो. ह्येच्या-त्येच्या शेतावर कामाला जात हुतो. आंजीच्या धाकली जिजीसंग रंजीबी येत हुती. त्येंच्यावर परसंग हुता. सावकाराकडचं शेत सोडवायचं हुतं. पेरणीच्या दिसापातूर शेत सोडवायचं जिजीचं धोरण हुतं. त्यात आंजीच्या जाण्या-येण्याचा, मा-माह्यरचा खर्च हुताच. मोजू नाय म्हणलं तरी बुडत्याचा पाय खोलात अशी आंजीच्या माह्यरची तऱ्हा झाली हुती.

जावाय सुट्टीवर आल्याचं कळल्यावर लहानगा पांडू गाठ घ्यायला जिजीनं धाडला. दादाला सवड नव्हती. पांडूजवळ फराळाचं काय-वाय धाडलं. मोठ्या हुर्पानं गेल्यालं पॉर चिमणीवाणी त्वांड करुन दुसऱ्या दिशी माघारी आलं. त्येच्यासंग सांगावा आला हुता की,

'आंगठी-घड्याळ आणल्याबिगार तुमी पायरी चढायची नाय

नि तुमची लेकबी तिकडं येणार नाय.'

पोरगं नव्या दाजीच्यां धमक्या दबक्या आवाजात सांगीत हुतं. घटकाभर आमी दुचितच झालो. शेवटाला काकीच म्हणल्या,

'का घोर लावून घेता उगीच्या उगी? नाय धाडत तर ना धाडू द्या. हिथं कुणाच्या कणगी सांडून चालल्याती? तिच्या घरी ती सुखी हाय न्हवं?'

'कुणाला ठावं. माझ्या आंजीला ह्यो बाबा किती छळीत आसंल - - -'

'काय जीवाला लावू नका जिजी. आवो, जावायाची जात काढू. निघलं तेवढं काढायचं! त्येचं ध्यान तेवढ्यावरच. भुवयाचं ध्यान कण्यावर नि बोक्याच ध्यान लोण्यावर.'

'पण ह्यो बाबा भेटायचं नाय म्हंतूया. माझ्या आंजीची खुशाली कशी कळायची? माझी बाय लई अश्राप - - -' जिजीनं डोळ्याला पदर लावला. तशा काकी डाफरुन बोलल्या,

'एऽ शाने, सुट्टी संपली की जाईल निघून त्यो. तिचं सासू-सासरं तुमास्नी आडीवत्याल का?'

'नाय बया. त्येस्नी कशाला दोषं लावू!'

'मग बसा गुमान. त्येची सुट्टी संपस्तवर तिकडं फिरकूच नका मजी झालं.'

'जायाला सवड कुणाला हाय. ते शॅत सोडवून घ्याचं चाललंय.'

जिजीनं म्हणल्यापर्मानं जीवाचा आटापिटा केला; पण वक्ताला शॅत सोडवून घेणं जमलं नाय. समद्यांचा हिरमुस झाला. पेरणीचं दिसं पाखरासारखं निघून गेलं. पावसाची रिप-रिप सुरु झाली, वढ-नालं वाहाया लागलं. घराबाहीर पाऊस तोंड काढू देईना. जरा उघडीप गावली तवा आंजीचं दादा तिला भेटाय गेलं. आतड्याची माया गप कशी बसंल? पण आंजीची गाठ पडलीच नाय. दादा हारकून माघारी आलं. जावयानं आंजीला संग नेली हुती. लांब सिकंदराबाजला आंजी गेली. समद्यास्नी राजा-राणीची गोष्ट ऐकल्यावाणी ग्वॉड वाटलं. गंगा आजी म्हणली,

'आता गेल्यासारखी कूसं उजावली– एखादं मुल-बाळ झालं की भुईला पाय लागत्याली. ह्या जावयाचा सोभाव मला काय सरळ दिसत नाय, म्हणून एवधा घोर, नाय तर कशाला? '

'आता नातीला संग घिऊन गेला तरी जावाय वाकडाच दिसतो व्हय ग आज्जे? '

'माझा जीव नाय थाऱ्यावर बया. आताशी सानंबी वंगाळ पडत्याती '

'हुं! काय तरी आज्जीचं. शिवार हिरवंगार झालं की समद्यास्नी च सप्नं कसलीबी पडत्याती. '

तेवढ्यावर इषय थांबला. त्येच्यावर महिनाबी गेला नसलं. मी चुलीम्होरं हुते. जिजीचं रडणं कानावर आलं काळीजात चर्र झालं माझ्या. दुधाचं भगुलं तसंच चुलीवर ऱ्हायलं. जिजीचा सोपा गाठला. आया-बाया जमल्या हुत्या. काय झालं म्हणून इचारलं तर आंजीच्या सासऱ्याचा कागूद आला म्हणून कळलं. खांबाला पाठ दिऊन वसलेल्या दादास्नी मी इचारलं,

'काय लिवलंय कागदात? '

' आंजीच्या सासऱ्याला सिकंदराबाजस्नं कागूद आलाय की, सातार ठेसनापातूर आल्याला आंजीनं भांडण काढून नवऱ्याला माह्येरला जाते म्हणून सांगितलं. त्येची रजा संपल्यानं त्येला माघारी फिरता आलं नाय. त्यो आपल्या ठिकाण्यावर पोचला. आंजी माह्येरला पोचल्याचा कागूद आजून का आला नाय म्हणून त्येनं आईबाला कागूद धाडलाय. '

सारं ऐकल्यावर साऱ्या आंगाला मुंग्या आल्या. आमी एका–मेकीच्या तोंडाकडं बगाय लागलो. जिजीनं जास्तीच गहिवर मांडला–

'माझी आंजी कशी भांडलं? - - - मला काय खरं वाटत नाय - - - निराळीच भानगड दिसतीया - - - देवा आता मी माझ्या बायला कुठं हुडकू? - - - वाघानं कुठं सोडली कुणास ठावं - - - आतापातूर गावाची शीव बी तिनं वलांडली नव्हती नि तिच्या नशीबाला काय वनवास वाघानं लावला - - - '

'जिजे खुळी का काय ग तू? तू आसी गहिवर घालून बसलीस तर गडीमाणसाला काय करावं ते सुचंल का? आता आशानं आसं म्हणल्यावर चार जाणत्या माणसांचा इचार घ्याला पायजेल का नाय?'

जिजी तेवढ्या बोलण्यानं गप झाली. नुसतं नाक-डोळं पुसीत ऱ्हायली. बाकीच्याच आया-बाया बोलायला म्होरं झाल्या.

'आंजी, अश्राप हाय, भांडण काढून निम्म्या वाटत्नं माघारी फिरणारी आडमुठी नाय. आसं हुईल तरी कसं? मी म्हंते.'

'आवो, दादा, तुमी आसं करा, खाशादादास्नी संग घिऊन आंजीच्या गावाला जावा. कावळा शिवला आसला तरी कागूद धाडत्याली माणसं.'

'व्हय. व्हय. ह्येमातूर वगाय पायजे वरं का! कायतरी आस्संच घडल्यालं आसंल बगा.'

'कुणास ठावं. तसं आस्तं तर कार्ड टाकलं आस्तं. ह्यो पाकीटात हातभर कागूद ठिवलाय.'

'तरीबी पर्त्यक्ष जाऊन खातर करा.'

आंजीच्या दादाला पटलं.. जायाचं ठरलं. लंगुलग खाशादादास्नी बोलावणं बी गेलं. तेबी झपाट्यानं आलं.. कागूद वाचून पायला. आणखी दोघं संगं घिऊन आंजीच्या गावाकडं गाडी चालती झाली.

कायबी म्हणा, माझं मनच मला सांगत हुतं, की आंजी अशी सप्नातबी वागणार नाय. तिनं कधी परवास केल्याचं आठवत नाय. शिवारात सोबती विगर कुठं जायाची नाय. आन् नवऱ्यासंग आप्रूबायनं निघाल्याली सासरवाशीण निम्म्या रस्त्यात भांडण काढून माघारी कशी फिरलं? तशी ढाणकबी नव्हती. जिजीची समदीच पोरं डोळ्याच्या धाकात. त्यात आंजी थोरली, म्हणून लईच धाकात वागिल्याली. काय केल्या मनाची समजूत पटत नव्हती; पण गेल्याली माणसं माघारी आल्याविगर खरं काय त्ये कळणार नव्हतं.

ते भांगलणीचं दिस हुतं. दिसभर शेतात ताटलेल्या आया-बाया जिजीच्या सोप्यात तारवटल्या डोळ्यानं बसून हुत्या. मध्याह्न कलून गेल्यावर माणसं आली. जोतं चढून म्होरं आलेल्या शिवाच्या तोंडावर

टकळाई दिसली नाय. माझ्या काळजात लकाकलं. सारी सोप्यात येऊन बसली. कुणीच बोलंना. एकमेकाच्या तोंडाकडं बगू लागली. गंगा आंजीनंच गुळणी फोडली,

'काय खबर मिळाली? काय बोलाल का नाय - - - आमी तुमच्या वाटंला डोळं लावून बसलूया - - -'

तेवड्यात जिजी मुसमुसाया लागली.

'ए, माझे आये! चढत्या रातीला रडू नगस. माणसं आल्याती. काय सांगत्याती ते ऐकू दे - - -'

खाशादादानी समद्या आया-बायांकडं बगून घेतलं नि बोलाय सुरुवात केली,

'तुमाला आता काय सांगायचं? - - - पावण्यानं आंजाबायच्या नवऱ्याचा कागूद दावला. बाकी त्येस्नी कायबी ठाव नाय आसं म्हंत्याती.'

'घरातन निघताना काय भांडणाचा रंग दिसला हुता का?'

'तसं बी काय नाय दिसलं म्हंत्यात. जाताना आंजाबाय खुशीत हुती. तिचा नवराबी रागात दिसला नाय. आता रातीं जर काय नवरा -बायकूत कुरबुर झाली आसली तर ठावं नाय म्हंत्यात.'

'दोघंबी बांधा-बांध करीत हुती. दोघांच्या बेबनावाचं काय नाय दिसलं त्येस्नी.'

'मग काय घडलं आसंल वो?'

'देवाला डोळं बया!'

'बापू, मला त्या आंजीच्या नवऱ्याचा बनावटपणा वाटतूया. लगीन ठरल्यापास्न त्यो जिथं तिथं कुरबुर करायचा. त्येचं आडमुठं धोरण मला पासच नव्हतं; पण चांगल्या कुळी-ढाळीचं, खातं-पितं घर म्हणून हे धाडस केलं. लग्नातबी त्येच्या तक्रारीला त्वांड दिलं. पुन्नाबी त्येचं तसंच काय तरी. माझा पान उतारा केला, म्हणून पांडूला धाडलं तर त्येच्याजवळ घड्याळ-आंगठीची मागणी केली. तिला कुणी भेटायचं नाही, म्हणून दम भरला.'

'बजादादा हिथंच कायतरी पाणी मुरतंय बगा.'

'साऱ्यास्नी तसंच वाटतंया, पण करायचं काय? आपुन हिथं

त्यो तिकडं आन् पोरीचा पत्त्या नाय! कुणाला गाऱ्हाणं सांगायचं ? तक्राद कुणाकडं करायची? गुन्हा कुणाचा हाय म्हणून सांगायचं? '

'ह्येच तर कोडं हाय. सासू-सासऱ्याला दोषी धरता येत नाय, नवरा तर आसा कागूद धाडतूया. आता त्येला दोष कसा द्याचा? नि निर्दोष तरी कसा म्हणायचं? - - - अं? बोला की खाशादादा - - - ?'

'गड्यानू, दोनी बाजुनी मी कात्रीत आलो. त्यो आंजीचा नवरा माझ्या भनीचं सावतर पोरगं. तुमी-आमी एका भावकीच्या बुडक्यातलं. रोज एकमेकाची तोंडं वगायची. पोरीचा तलास लावण्यासाठी कायबी परेत्न करायला तुमच्या पाठीशी मी हाय. पण करायचं काय, जायाचं कुठं, कुणाला इचारायचं, त्यें तुमी ठरवा. मी लग्नात मध्यस्थी केली तशी यातबी मदत करतो. '

'तुमचं खरं हाय दादा. तुमी येल मांडवावर चढिवला; पण माणूस खराब लागला. खऱ्या-खोट्याचा उलगडा झाला पायजे. उद्या रंजीच्या लग्नाचा परस्न येणार. आंजीचा तलास लागला नाय तर रंजीच्या लग्नात ही गोष्ट नडणार हाय. '

'व्हय, बायकाची आबरु काचच्या भांड्यावाणी. आबरुची कवाच कुंडलं गडीमाणसाला. बायकाचं लई जपणुकीचं जीणं, काय तरी तलास लागला पायजे. '

'आरं, ह्यो बेचा पाढा कुठंवर वाचणार? ह्ये झालं पायजे नि त्ये झालं पायजे. त्येच्यासाठी म्होरंचा इलाज सुचवा की. '

'- - - मला वाटतं चार तोला-मोलाची माणसं बोलवावीती, त्येंचा इचार घ्यावा. कायदं.कानून त्येस्नी ठावं अस्त्याती. मंत्री-पुढाऱ्यात्नी त्येंचा वावर आस्तुया. आशा लोकांच्या कानावर ही गोष्ट जाऊ द्या. '

मग तसं ठरलं. सरपंच सेक्रेटरी आसी गावातली पुढारीं माणसं आली. जिजीच्या सोप्यात बैठक बसली. 'आशानं आसं' चर्चा सुरु झाली. सरपंच म्हणलं,

'जावायाचं पत्र आलं म्हणता. कुठाय ते? '

'त्येच्या बापाला आलंय. '

'हो. पण ते आहे कुठं?'

'त्येच्या बापापशीच की.'

'मग आम्हाला कशाला बोलावलंत? ते पत्र आधी आणा.'

आता झाली का पंच्यात. सारी आचारी का बिचारी होऊन येका-मेकाच्या तोंडाकडं बघू लागली. तेवढ्यात पांडा म्हणला,

'वाचून दावाय घेतलं त्ये माझ्याच खिशात ऱ्हायलंय. ह्ये बगा.'

पत्र समद्या माणसात पुन्ना घडाघडा वाचलं. बयाजवार म्होरं काय करायचं ते ठरलं. पुलीस ठेसनात आर्ज करायचा ठरलं. त्येचं कच्चं टिपान झालं नि माणसं उठायला लागली. जिजीनं पांडाला खुणिवलं. पांडू बापाच्या कानाला लागला. दादानी माणसं थांबीवली.

'च्या पिऊन जावा' म्हणलं.

जिजीनं माझ्यात्न च्याचं सामान नेलं. कांताच्यात्न कपबशा नेल्या. सरपंच म्हणालं,

'मी चहा घेत नाही.'

रंजीनं काकीच्या मागच्या दारानं दूध नेलं. तापवून सरपंचास्नी दूध, बाकीच्यास्नी च्या दिला. बैठक उठली.

दुसऱ्या दिशी सकाळी आर्ज पक्का लिवला. पुलीस ठेसनावर जायाला कुणाची गाडी मोकळी गावना. शेवटाला भाड्याची गाडी ठरली. सरपंच म्हणलं,

'आम्ही फटफटीवरनं येतो.'

त्येंच्या च्या-पान्या आंजीच्या दादानं धा रुपयं दिलं. सरपच नको म्हणलं, पण दादानी खिशात घातलं. आपद्धर्म पाळाय पायजे. आपल्या कामासाठी दुसऱ्याच्या पदराला खार नसावा. माणसं तक्राद गुजरुन आली. तितंबी लई खळखळ झाली. सरपंच हुतं म्हणून वरं, बाकी–च्यांची डाळ शिजली नसती. फौजदार म्हणीत हुता कायनू – दिड महिन्यापूर्वी गुन्हा सातात्यात घडला तिथंच तक्राद द्या.

'आमच्या हद्दीत गुन्हा घडला नाय.'

सरपंचासंग त्येचं तू-मी झालं. पुन्ना कुठल्याशा पुढाऱ्याची वळख निघाली नि मिटलं. आंजीच्या नवऱ्याला वारंट काढून बोलवून घ्याचं

ठरलं. सरपंच हुतं म्हणून तिथं पातूर गाडं गेलं. तेवढ्यावर आमी म्होरं काय तलास लागतूय त्येच्याकडं डोळं लावून बसलो. त्याच वक्ताला गरामपंच्यातीच्या निवडणुका आल्या. सरपंचाचं उपकार नजरेम्होरं धरुन आमी त्येस्नी मतं दिली. आता त्यो गावाचा पैसा खातो का नाय, किती खातो, ह्ये आमास्नी काय कळतंय? कुणीबी आला तरी आमाला सारखाच. नेहमीचीच बोंब ऐकू येतीच. म्हणच हाय 'तळं राखणार त्यो पाणी चाखणार' त्यात नवं काय हाय?

पण निवडणुकीत इस्नु सरपंच पडला. दुसऱ्या पार्टीचा म्हादू इनामदार सरपंच झाला. त्येंची पार्टी भारी झाली. पयला सरपंच गावात फिरकनासा झाला. त्येचं काय चालंल आसंबी वाटना, म्हणून आंजीच्या दादानं नव्या सरपंचाची गाठ घेतली. समदं कानावर घातलं, तर त्येनं कानावर हात ठिवलं. म्हणला,

'मतं देताना इस्न्याच्या कुशीत शिरत हुता. आता माझी सय खिडीत गावल्यावर झाली व्हय? निवडणुकीचा आर्ज भरायला गाड्या जुपून, फटफट्या उडवीत त्येंच्या पार्टीसंग उधाळला, तवा गमजा वाटली. आता ही गमजा बगा पचतीय का?'

आंजीच्या तलासासाठी इस्नु सरपंच तालुक्याला नेला हुता जावा त्यो निवडणुकीचा अर्ज भरायला निघाला ह्ये कुणाला ठावं आता उलगडा झाला. मस्तं गयावया केलं, पण त्येला पाना नायच फुटला. शेवटाला. हुती तीच आमच्यातली गरीब लायकीची माणसं पुलीस ठेसनावर गेली. आंजीचा नवरा आला हुता. त्येंचं जाब-जबाब झालं. फौजदार नवा हुता. त्येनं,

'तपासाची चक्रं आता फिरु लागली. आता तुमी हेलपाटं घालू नका. काळजी करु नका.' आसं आमच्या माणसास्नी सांगितलं.

तिथं आंजीच्या दादासंग जावाय आपणहून बोलला. लई नरमला हुता. त्येंचा गुन्हा आसलं आसं आमच्या माणसास्नी वाटलं नाय. त्यो लगीच त्येच्या ठाण्यावर हाजर हुयाला गेला.

आमी शेतीच्या कामा-धंद्यातली माणसं. मोकळादिवस रोजगार घालणारी. फौजदारानं सांगितल्यापर्मानं वाट बगीत हुतो. बाकी लिव-

णारासारखं काय नव्हतं. आंजीच्या आई-बाचा जीव उडाला हुता. आमी मराठी जातीची माणसं. जीवापरास आबरु थोर मानणारी! लेकीच्या बाबतीत आसं घडल्यानं काळीज कुरतडल्यावाणी झालं हुतं; पण आशा लई लोचाट आसती. आंजीची आई दिसाला साताटदां डोळं गाळायची. बानं पारावरची बैठक सोडली हुती. दोघंबी नवरा-बायकू सैरभैर झाल्ती. आमी शेजारी-पाजारी एका जीवानं न्हाणारी. आमालाबी घास ग्वॉड लागत नव्हता.

आसंच हळहळ करीत, काळजी करीत आठ-धा महिनं गेलं आसत्याली. दोन-तीन डाव दादा फौजदार कचेरीत हेलपाटा घालून मुकाटचानं आलं. जसं दिवस जात्याल तसं मनात कायबी येत हुतं; पण आमी जात-कुळीची कुळवान माणसं. जातीसाठी माती खात हुतो! लई बोभाटा करत नव्हतो. रक्तपितीची बोटं झाकून आसवं गाळावीती तसं चाललं हुतं.

आन् असाच जेवण येळला माझा देगावचा भाचा अचानात आला. त्येनं मला दबक्या आवाजात बातमी दिली. माझं काळीज धकाधका उडायला लागलं. तेवढ्यातनबी डोस्कं चालवून जिजीला बोलावून घेतली. कुजबुज वाढायला लागली. आंजीचं नाव कानावर पडलं तसं एक-एक शेजारी गोळा झालं. तेवढ्यात आंजीचं दादाबी बिगीबिगी आलं. त्येनी पुन्ना माझ्या भाच्याला इचारलं. त्यो म्हणला,

'म्हाऊलीच्या ठेसनापास्न मी मुंबैपरेंत त्यास्नी पायलं. मागल्या डब्यातच मी हुतो. मुंबैत उतरल्यावर ती दोघं कुठं गेली ते मला ठावं नव्हतं; पण काल संब्या रंगारी भेटला. मला त्येनं सांगितलं. आंजीला तिच्या नवऱ्यानं गोलपिठ्यात नेलं.'

'कुणाचा ह्यो गोलपिटचा? त्यो कुठं आसतो? काय करतो - - -'

'तसं नव्हं दादा, गोलपिठा भाग हाय मुंबैचा.'

'तिथं ठेवलीय व्हय तिला. मग हारकत नाय. आंजी हुडकून काडायला येळ लागायचा नाय.'

'कोंबड्याच्या खुराड्यागत चाळी हायत्या.'

'आसंनात का पर आंजीचा तलास लागला मजी झालं.'

'काय तलास लावून करता? तितं नुसत्या वाया आसत्यात्या.'

'आसंना का! मग तर लई सल्प.'

'सल्प? दादा, तिथं बाया धंदा करत्याती.'

'धंदा? कशाचा?'

'ते आमी सांगू नाय, तुमी ऐकू नाय.'

'मजी रं मर्दा?'

'तिथं रांडा ऱ्हात्यात. तुमच्या जावायानं तुमची लेक तिथं इकलीया.'

त्या शब्दावरुवर एकूच कोयाळ उठला. गंगा आजी हाणू बडवून घ्याला लागली. बसल्या जागी हात-पाय खुडून शिव्या-शाप द्याला लागली.

'जित्याजीवी नरकात घालीवली की वाद्यानं. गौरीवाणी नात माजी कसाबानं पैसा केला. त्वांड काळ केलं ग वया ऽऽ आता तलास लागून तरी काय उपेग?'

'बट्टा लागला ग कुळाला. कुलवंताची लेक नरकात घातली भाड्यानं - - - त्या परीस आंजीला त्येनं हीरीत ढकलली आसती तरी बरं झालं आसतं.'

गंगा आजीनं बसल्या जागंवर गहिवर घातला. हात-पाय चोळायला लागली. जिजी धरणीवर आंग टाकून गडबडा लोळत हुती. मयता भोवतच्या गहिवरालाबी रया आसती. हा गहिवरच इटाळल्यासारखा आपीशी वाटत हुता. आया-बायांनी एक नवच आक्रित ऐकलं हुतं. आंजीचा दादा खांबासारखा उभा हुता. एक चकार शबुद न बोलता तो घराकडं गेला. त्याची नजर काय निराळंच बोलत हुती.

दुसऱ्या दिशी रोजच्या रोजगारी कामावर आंजीचा दादा आला हुता. सुरुंगाला वत्ती लावायचं काम त्येचं हुतं. हीरीवर कामाला पाच पन्नास माणसं हुती. आमीबी हुतो. रोजच्यापेक्षा मुका-मुकाट्याचं समद्यांची कामं चालली हुती. रातीचं कुणाच्या मनात्त गेल्यालं नव्हतं. दिवस कलला. सुरुंग लावायचा हुता. ह्या खेपंला पाण्याचा नळ घावंल असा समद्यांचा होरा हुता. आंजीचा दादा खाली उतरला. बाया-बाप्ये

आडोशाला पळाली. हीरीच्या वर उभ्या असलेल्या पांडानं वासरु हंबारल्यावाणी दादा ऽ ऽ म्हणून हाळी दिली. काय झालं कळलंच नाय. धुडूमऽधाड सुरुंग उडाला! हादरा झाला. आभाळभर दगडं भिरभिरली आणि पांडानं काळजाचा ठाव घेणारी हाळी दिली. धावाधाव झाली. हीरीच्या काठावर आमी गेलो. दगडाच्या खिळकांडात, रक्ताच्या चिखलात हाड ना हाड मोडून आंजीचा दादा मरुन पडला हुता. पाण्याचा पांढराधोट फवारा उडत होता. त्यातच रक्ताच्या चिळकांडचा!

त्यो अपघात नव्हता. घातपातबी नव्हता. आंजीच्या आब्रुदार बापानं भर्मिष्ट होऊन जीव दिला हुता; आमच्या मनाला पटलं तरी गुमान ऱ्हाणं भाग पडलं.

आज येशीत वऱ्हाड वाजतय. आंजीचा नवरा पुन्ना आमच्याच गावात वाजत गाजत येतोय. सावकाराचा जावाय होऊन. येशीत बारुद जोषात उडतंय. आन् जिजी आरडत-वरडत आलीय बगा,

'सुरुंऽऽग! सुरंऽऽग!!'

( दिवाळी अंक 'रणरागिणी' १९८४ )

# ६. लागीर

वाटोबाच्या फाट्यावर एस्. टी. थांबली. भीमा खाली उतरला रात्र खूपच झाली होती. भीमाने किल्लीच्या साखळीत अडकविलेल्या मिनी बॅटरीच्या प्रकाशात घड्याळ पाहिले. दीड वाजून गेला होता.

एस्. टी निघून गेली तेव्हा भीमा आपल्या आजोळच्या वाटेने चालू लागला. काळोख खूपच होता. मिनी बॅटरीच्या प्रकाशात जेमतेम पायाखालचा रस्ता दिसत होता. प्रकाशसुद्धा फारच मंद वाटत होता. पण बॅटरी होती म्हणून निदान चालता तरी येत होते. एरवी डोळ्यात बोट घातले तरी दिसणार नाही इतका अंधार दाटला होता.

'नागठाण्याच्या कुस्तीच्या फडावर आलास तर माझ्याकडे वाकडी वाट करुन ये.' असे आजीने सांगितले होते. म्हणून भीमा आज फड जिंकून आजोळी चालला होता. किती तरी दिवसांनी तो आजोळी चालला होता. त्याचे माध्यमिक शिक्षण आजोळीच झाले होते. तेथूनच तो कोल्हापूरला तालमीत सरावाला गेला. तेव्हापासून त्याला आजोळी जाता आले नाही. आजी अशा अपरात्री आपणास पाहून काय म्हणेल? आपण या दोन महिन्यात चारपाच मोठ्या कुस्त्या जिंकल्या, ते ऐकून आजोबांना किती आनंद होईल? याची कल्पना तो मनात रंगवत चालला होता.

वागजाईचा ओढा जवळ आला होता. तेथे किर्र ऽऽ झाडी होती. रातकिडे किरकिरत होते. ओढ्याच्या पाण्याचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. इतक्यात 'कडाड् काड् ऽऽ काड्' असा आवाज झाला व त्या पाठोपाठ 'धप्प' असा उडी घेतल्याचा आवाज झाला. वारा वादळ

काही नसता इतक्या रात्री फांदी कशी मोडली? भीमाच्या मनात शंका घर करु लागली; पण तो तसाच चालत होता, मात्र त्याला आता तो हायस्कूलमध्ये असतानाच्या गोष्टी आठवू लागल्या. या वागजाईच्या ओढ्यापासून कड्याच्या ओढ्यापर्यंत म्हणे कोणी झुटिंग अमावस्या-पौर्णिमेला फिरतो नि - - - आज अमावस्या आहे! भीमाने ते विचार मनातून काढण्याचा प्रयत्न केला; पण ते त्यास जमेना.

कड्याच्या ओढ्याच्या उंच कपारीवरुन खोल खडकात पूर्वी एका पैलवानाने उडी घेऊन आत्महत्या केली होती. त्याचा झुटिंग झाला. तो झुटिंग शड्डू ठोकायचा, विहिरीत उड्या घ्यायचा, झाडावरुन उड्या घ्यायचा आणि दिवस मावळल्यानंतर कोणी तडाख्यात सापडला तर त्याच्याशी कुस्ती खेळायचा. भीमा त्या विचाराबरोबरच स्वतःच्या ताकदीचा व मेहनतीचा विचार त्याच्या मनात आला व थोडेसे अस्वस्थ झालेले मन पुन्हा निर्भय झाले. आज आपण तालुक्याला भारी असा पैलवान म्हणून मिरवतो. आपल्या अंगात हत्तीचे बळ असता तो झुटिंग काय करणार आपणास? तो म्हणे पैलवान होता, तर आपण आहोतच की! आलाच अंगावर तर होऊन जाईल दोघांची! बघूया त्याच्यात किती दम आहे तो! असे विचार मनात रुंगू लागताच भीमाची छाती फुगली. तो डौलाने व धीम्या गतीने चालू लागला. वागजाईच्या ओढ्यातून तो वरच्या रस्त्याला आला. तेथून इनामदाराच्या मळ्याची हद्द सुरु झाली होती. ऊसाचा मळा, पेरु-मोसंबीच्या बागा यामुळे तो परीसर एक वेगळेच वातावरण निर्माण करीत होता. येथे रातकिडे किरकिरत नव्हते; पण जवळच्याच लिंबावर घुबड भेसूर घुमत होते. आंब्याच्या मोहराचा सुगंध वातावरणात भरुन राहिला होता.

इनामदारांच्या डेरेदार आंब्याखालून भीमा जात होता - - - - आणि - - - आणि - - -

एक अगडबंब देहाची व्यक्ती त्याच्याकडे विचित्र नजरेने पाहात हसत उभी होती. पुढील दोन जाडसर दातातील फट त्या भयानक चेहऱ्याला अधिकच भेसूरता आणीत होती - - -

भीमा प्रथम दोन पाऊले मागे सरकला; पण नंतर धैर्य एकवटून

म्हणाला,

'ए, काय पाहिजे तुला?'

त्यावर काहीच उत्तर मिळाले नाही; पण राकट थोराड हात भीमापुढं पसरला गेला. भीमाच्या मनात क्षणार्धात विचार चमकून गेला. तो झुटिंग होता आणि तो नेहमीच्या त्याच्या पद्धतीने त्यास चुना मागत होत! एका क्षणाचा विलंब न लावता भीमाने त्याचा पुढें झाले ला हात जोराने खेचला. अगडबंब देहाचा झुटिंगपण या अनपेक्षित हिसक्याने कोलमडला भीमाला साधारण त्याच्या ताकदीचा अंदाज मिळाला; पण झुटिंग तर आता त्याच्या अंगाशी झोंबाझोंबी करु पहात होता. तेव्हा भीमाने शड्डू ठोकून पवित्रा घेतला. त्याला शड्डूनेच प्रत्युत्तर मिळाले. भयंकर विचित्र नजरेचा तो अगडबंब झुटिंग भीमावर चाल करुन आला आणि त्या भीषण काळोखात त्यांची झटापट चालू झाली.

अर्धा तास कोणच कोणास मागे हटत नव्हता; पण नंतर मात्र तो झुटिंग तोंडातून विचित्र आवाज काढू लागला.भीमाने त्याला एकेरी पट काढून आस्मान दाखवायचे ठरवून त्याची घट्ट पकड घेतली; परंतु त्याने तर प्रथमपासून कोणताही कुस्तीचा नियम पाळला नव्हताच; पण भीमाच्या या निर्णायक पवित्र्याच्यावेळी झुटिंगाने भीमाच्या हाताचा कडकडून चावा घेतला. संतापाच्या भरात भीमाने एक जबरदस्त फटका त्याच्या तोंडावर हाणला. त्याबरोबर एक विलक्षण चित्कार काढून तो झुटिंग जमिनीवर कोसळला. रागाने बेभान झालेला भीमा काही विचार न करता आपल्या रस्त्याने चालू लागला. मात्र चार पाऊले पुढे गेल्यानंतर त्याने बॅटरीच्या फोकसात त्या झुटिंगास पाहिले.

- - - - - -

तो उठून उभा राहिला होता. रागांने त्याच्या डोळ्याची बुबुळे गरागर फिरत होती. त्यामुळे त्याची ती नजर काळराक्षसासारखी वाटली. तो आपले दात-ओठ खात भीमाकडे पहात होता.

भीमाने त्याला एकवार पाहून घेतले व तो पुढे चालू लागला, पण त्याच्या मनातून त्या झुटिंगाची नजर काही केल्या जात नव्हती. आप-

त्या त्या कृत्याबद्दल त्याच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता. वाग-जाईच्या ओढ्यातून जाताना त्याने आपल्या वहाणा काढून हातात घेतल्या. ओढ्याळील थंडगार पाण्याच्या स्पर्शाने त्याच्या अंगावर थंडीने काटा आला.

ओढ्याची डगर चढून तो वरच्या रस्त्याला लागला, तरी त्याच्या अंगावर मघा थंडीने काटा उभा राहिलेला जाईना. उलट आता त्याला थंडी वाजण्याची तीव्र जाणीव होऊ लागली. त्याचे मन साशंक झाले; पण पौष महिन्यात चावरी थंडी असतेच. हे लक्षात येऊन त्याच्या मनात दिलासा आला.

भीमाचे दात थंडीने एकमेकावर आपटू लागले होते. त्या आवाजाने त्याला त्या झुटिंगाच्या दात करकरा खाण्याची आठवण झाली. - - - त्याची नजर आपला पाठलाग करतेय, अशी त्याला जाणीव होऊ लागली आणि त्याला चांगलीच हुडहुडी भरल्यासारखे झाले. तो झपाट्याने पाऊले उचलू लागला; पण ती पाऊले कोणीतरी अदृश्य शक्तीने ओढल्याप्रमाणे जड वाटू लागली होती. अंगात थोडा ताप असल्याची त्याला जाणीव झाली. भीमाला आंता मात्र कळून चुकले की,

'आपणास झुटिंग लागला!' आता ही गोष्ट मात्र आपण कोणास सांगण्यात आपली नाचक्की होण्याचा संभव आहे, असा विचार करुन आपण आपल्या ताकदीच्या कैफात ही गोष्ट कोणास सांगू नये म्हणून मनातल्या मनात त्याने बजरंगबलीची शपथ घेतली. त्याला आता मनापासून असे वाटू लागले की, आपण त्या झुटिंगाशी कुस्ती खेळायला नको होती. तो काही कुस्तीचे नियम पाळायला माणसातला पैलवान नव्हता. बोलून चालून ते पिशाश्च नुसती मानवी शक्ती काढून घेण्याच्या मागे लागलेले. आपण जर आणखी कुस्ती खेळत राहिलो असतो, तर अगदी आपल्या शरीरातील शक्तीचा शेवटचा स्रोत संपेपर्यंत तो झुटिंग आपल्याशी खेळतच राहिला असता. आताशी आपली खूपशी शक्ती काढून घेतल्यासारखे भीमाला वाटू लागले. त्याच्या अंगातील ताप खूपच चढलेला असावा. त्याचे हाड नि हाड आता ठणकू लागले होते. गावातील वेशीतून तो आत शिरला. तेव्हा कुत्री भुंकू लागली.

तेव्हा कुठे त्यास माणसात आल्याबद्दल धीर आला.

दरवाजा उघडणारी त्याची आजी दारात भीमाला पाहून अगदी आनंदून गेली; पण अशा अवेळी आल्याबद्दल लटकेच रागवली. कारण आपल्या नातवाची शक्ती तिला माहित होती व त्याबद्दल तिला अभिमानही वाटत होता. घरात दुसरे कोणी नव्हते. आजोबा परगावी गेल्याचे समजले. आजीने बिछाना करुन देईपर्यंत भीमाचे शरीर थंडीने थरथरु लागले होते. आपणास दोन दिवसात सर्दी डोकेदुखीचा त्रास आहे असे सांगून त्याने दोन ब्लँकेटस् पांघरण्यास घेतल्या. आजारपणात कशाला यायचे म्हणून आजी त्यास रागावली; पण त्यावर तो काही न बोलता झोप लागल्याचा बहाणा करुन पडून राहिला. त्यामुळे आजीची झोप लागली. मात्र भीमाचे एवढे बोजड अंग पण थंडीने उडत होते. तापपण खूप चढला होता; पण संयमपूर्वक त्याने आजीस हाकसुद्धा मारण्याचे टाळले.

सकाळी आजीने उठल्या उठल्या भीमास कॉफी करुन दिली. त्याच्या कपाळावर तिने हात ठेवून पाहिले. ताप बराच होता. त्यामुळे ती घाबरली. रात्रभर आपण झोपून राहिलो. भीमाला ताप आहे की नाही हे पाहिले नांही, म्हणून ती स्वत:स दुषणे देऊ लागली. आपल्या पुतण्यास डॉक्टरला बोलावून आणण्यास सांगून ती भीमाजवळ बसून राहिली; परंतु आपला आजार डॉक्टरकडून बरा होणारच नाही. हे एकटा भीमाच समजून होता.

डॉक्टरकडे गेलेला पुतण्या थोड्याच वेळात परत येऊन म्हणला, ' डॉक्टर आर्जंट केस बघायला गेलेत. '

' दुसऱ्याची आर्जंट आणि आपली आर्जंट न्हाय का? ' आजी त्यास डाफरुन बोलली.

' पण काकू, डॉक्टर घरात नव्हतं. मी निरोप देऊन आलोय, आपल्या आर्जंट केसीचा! ' पुतण्यानं खुलासा केला.

' कधी येत्यात काय की बाय! माझा जीव काळजीनं खाल्लाय निसता. ' असं म्हणून आजी भीमाजवळ बसून राहिली. शेजारच्या बायका बातमी कानावर जाईल तशा एक एक येऊन भीमाला पाहून

जात होत्या. आजोळी येऊन आजारी पडला, म्हणून हळहळत होत्या. भीमा आपल्या आजाराच्या मुळाशी एकटाच बिलगून होता.

फटफटीचा आवाज येताच आजी सावरुन बसली. डॉक्टरांची फटफटी दारात उभी राहिली. गडबडीने डॉक्टर आत आले. भीमाला त्यांनी तपासले. पातळ औषध व गोळ्या देऊन त्याच्या वेळा त्यांनी आजीला सांगितल्या. ताप उतरल्यानंतर इंजेक्शन देऊन जाईन असे त्यांनी सांगितले. निघतेवेळी आजीने त्यांना दूध दिले व विचारले,

'आर्जंट केस कुणाची बघाय गेला होता? '

'अहो! इनामदारांच्याकडे - - - त्यांचा नोकर अगदी सुजून धप्प झालाय बिचारा - - - मुका मार बसला आहे त्याला. '

'मुका मार? त्याला कोण गेलं मारायला? '

'कुठे ऽ मळ्यात रात्री होता. तिथे मारले असावे कोणीतरी. तो तर काही सांगतच नाही. अगदी झोपूनच आहे. '

'मळ्यात व्हय? मग त्या झुटिंगानंच झपाटलं असेल त्याला. आन् तो काय वो बोलणार डाक्टर? मुकाबी हाय नि येडसर बी हाय. निसता रानदांडगा! '

हे सारं संभाषण कान देऊन ऐकणाऱ्या भीमाला आता त्या 'झुटिंगाची दया आली होती! '

(पोदार असोशियन, विलेपार्ले, मुंबई.
अंतर महाविद्यालयीन कथास्पर्धा १९७८ द्वितीय क्रमांक)

# ७. वस्ती

मावळतीकडून काळ्याकुट्ट ढगांची फळी वर सरकली. ऊन माणसाला पलित्यासारखं चटकं देत होतं. रस्त्यावरचा फुफाटा भट्टी-सारखा तापला होता. गाडीवाटेनं राजाक्का झपाट्यानं चालली होती. कुणीतरी पाठलाग करत असल्यासारखी ती घाई-घाईनं चालली होती. लुगड्याचा ओचा पदर तिनं खोवला होता. ऊसतोडीचं दिवस होते, अर्ध्या-अर्ध्या मैलावर शिवारात वस्त्या पडलेल्या दिसत होत्या. रस्त्या-वर जरी कोणी नव्हतं तरी वस्त्यांवरील माणसांचा वावर राजाक्काच्या जीवाला आधार वाटत होता. ती नेटानं पावलं टाकीत होती.

अंगातून घामाचं पाझर फुटलं होतं. नाकाच्या शेंड्यावरुन, हन-वटीवरुन घामाचं थेंब ठिबकत होतं. भुवईतील घाम डोळ्यात उतरु नये म्हणून ती बोटाने अलगद निरपीत चालली होती. कुंकवाच्या टिकलीत घाम मिसळून त्याचा ओघळ नाकाच्या शेंड्यावर आला होता. कानशिलावरच्या काळ्याभोर केसांचे आकडे घामाने चिप्प होऊन बसले होते. तिला तिच्या बापाची वस्ती गाठायची घाई होती. बाबांच्या काळजीनं तिचं काळीज कुरतडत होतं. त्याच एका धास्तीनं ती लगा-लगा चालली होती.

तिच्या बाबांनी नारु पोतराजाजवळ निरोप धाडला होता. देवा-चा भंडारा कपाळावर टेकवीत नारु तिला म्हणाला होता,

'तुझ्या बाबानं भेटून जाया सांगितलंय. एकदा जाऊन येतीस का? '

'कसं जाऊ देवा? हिथं रोजानं ऊसतोड ठरलीया, खाडं टाकून

निभल का? '

'एखाद्या दिसाचं करावं खाडं. सांगावं मालकाला अशानं असं म्हणून.'

'लाख आपुन सांगू. मालकानं मनावर घेतल्या शिवाय कसं? मागल्या पंधरवड्यात बैलानं मारलं तवा बाबास्नी बगाया गेले. दोन खाडं झालं. आता आणिक खाडं करायचे म्हटलं तर - - -!'

'तर-फर करीत बसू नकोस. राजे, कसंबी कर पण त्या म्हाताऱ्याल बगून ये. हात मोडलाय ते तू बगितलंयास. आता कायबी ऱ्या नाय राहिली. पाक वाया गेलाय म्हातारा. ऐक माझं, भेटून ये म्हाताऱ्याला.'

'बगते खटपट करुन - - - इचारते.'

'आता इचारते नि बगते काय? म्हाताऱ्याचं काय आता लई दिस नाय ऱ्हायले. आभाळाखाली तुम्हा दोन लेकी बिगर कोन हाय? त्याबी आपापल्या संसाराच्या मागं. पण मायाजाळ कुणाला सुटलाय का? हाताऱ्याला एकुदा ल्योक आसता तर अशा लोकांच्या वस्तीवर त्यो पडला आसता का? आणि लेकीची वाट बगायची येळ त्येच्यावर आलीबी नसती.'

'आता कुणाच्या वस्तीवर हाईत बापू?'

'हायती जाधवाच्या वस्तीवर. मागं तू भेटलीस ती कुणाच्या वस्तीवर?'

'बेंदतल्या रावबाच्या वस्तीवर.'

'हां ऽऽऽ! रावबाच्याच वस्तीवर बैलानं घोळसलं होतं म्हाताऱ्याला. उचलून न्याचं अवघड झालं म्हणून तिथंच खोपीत ठेवलंत म्हाताऱ्याला. तवा जाधवाच्याच कामावर हुता म्हातारा. आता त्यानंच आपल्या वस्तीवर नेऊन ठेवलाय. पण काय खरं नाय बग - - - सांगायचं काम मी केलं. तू भेटून ये राजाक्का.'

सांगावा सांगून पोतराज गेला नि राजाक्काचं हळवं मन सैरभैर झालं. पंधरा दिवसापूर्वी ती म्हाताऱ्याला बघून आली होती. बैलानं घोळसलेला म्हातारा मरता मरता वाचला होता. मोडका हात आणि

मुका मार घेऊन म्हातारा हालबडला होता. हालत खराब झाली होती. दुखणं वाईटच, पण गरीब-लाचारांचं दुखणं लई वाईट.

राजाक्काचा बाप गरीब लाचार होता. दोन पोरी मागं ठेवून देवाघरी गेलेल्या बायकोनंतर त्यानं दुसरा घरोबा केला नाही. एखाद्या विधवा बाईनं जगाला दादा-अप्पा करीत दिवस काढावेत, तसं दोन पोरींना संभाळत त्यानं दिवस काढलं. थोरल्या पोरीच्या लग्नासाठी थोडी शेती होती ती विकावी लागली. राजक्का लग्नाची झाली तेव्हा दोन आखणी घराशिवाय तिच्या बापाकडं काही नव्हतं. घरावर कर्जाचा बोजा ठेऊन राजाक्काचं लग्न केलं आणि आळा सुटलेल्या पेंढीसारखा राजाक्काचा बाप काबाडकष्ट करण्यासाठी मुलुखभर फिरू लागला. दोन गाडग्या-मडक्याशिवाय घरात काही नव्हतं. दोन-दोन महिने घराकडं न फिरकताच राजाक्काचा बाबा याच्या शिवारातून त्याच्या मळ्यात घाम गाळत राहिला.

घराला झाड-लोट नाही, सारवण-पोतेरा नाही, शाखारणी नाही, डागडुजी नाही.कुत्र्यांनी वस्ती केली, घुशींनी बीळं पाडली. आडं-पाखाडं कोसळू लागलं नि एका जत्रेला घराची दशा बघून मागितल्या किमतीला राजाक्काच्या बाबानं घर फुकून टाकलं. आता गावाकडं फिरकायचं त्याला कारणच उरलं नव्हतं. दोघा-तिघाचं देणं होतं ते दिलं. स्वतःला पैरण-धोतर घेतलं. दोघी लेकींना दोन लुगडी घेऊन दिली. देताना भरल्या गळ्यानं म्हणाला,

'पोरीनु, आता मन घालायला या बापाजवळं कायबी ऱ्हायलं नाय. मी साम्रतवान नाय ह्ये ध्येनात ठिवून आपापल्या परपंचात समाधानानं जगा.'

त्यानंतर बाबा जिथं काम करायचे तिथंच वस्तीला रहायचे असा नियम झाला. मालक देईल त्या भाजी भाकरीवर दिवस जात होते. कसली कटकट नव्हती, काम नाही, असा दिवस मिळाला तर कधी थोरल्या राधीला तर कधी धाकटच्या राजाक्काला म्हातारा येऊन भेटायचा. पोरी आपापल्या संसारात सुखी होत्या. म्हाताऱ्याचं पण बरं चाललं होतं, पण म्हाताऱ्याला बैलानं मारलं नि काहीच्या-बाहीच होऊन

बसलं! दोन्ही पोरींचा जीव दडपून गेला. एकटचा जीवाच्या मागं ही बला लागली. नांगरटीसाठी पैऱ्यानं बैल मागायला म्हातारा रावबाच्या वस्तीवर गेला नि एका उमद्या खोंडानं म्हाताऱ्याला अच्चाद उचलून फेकला. खाली पडलेल्या म्हाताऱ्याला घोळसला. उठूबी दिलं नाही. रावबाच्या गड्यानं खोंडाला आवरलं. दाव्याचं तिढं टाकून चारी पाय आळपून भुईला पाडलं तेव्हा खोंडाची रग हटली, नशीब बऱ्यावर नाही तर म्हातारा जगला नसता. हात मोडला, खोक पडली. मुकामार बसला बरगडीन् बरगडी सोलून निघाली होती. साऱ्या पाठीचं पापुद्रं निघालं होतं. दोन लेकी असून म्हातारा जीव वनवासी झाला होता.

ऊसाच्या ट्रक ड्रायव्हरनं राजाक्काला खबर दिली. कडूसं पडायच्या वेळेला राजाक्का रावबाच्या वस्तीवर पोचली. राधाक्का तिच्या आधी आली होती. तिच्या घरची गाडी होती. ती भरल्या घरची मालकीन होती. खटाला मोठा होता. चार जावा-भावांची मनं राखून रहावं लागत होतं; तरी पण राजाक्कासारखं हातावर पोट नव्हतं. दुसऱ्याच्या बांधावरचं कष्ट नव्हतं. राधाक्काचं पोरगं तिच्या सोबत आलं होतं. दोघी बहिणी उरी भेटल्या. मन भरुन आलं. ते पापण्यातून पाझरत राहिलं. ख्याली-खुशाली इचारीत म्हाताऱ्याच्या उशा-पायशाला दोघी बसून राहिल्या. राधाक्काला शेतातल्या कामाची काळजी होती. दोन पोरातील एक तिथंच ठेवलं होतं. त्याची काळजी होती. संगं आणलेलं दोन अडीच वर्षाचं पोर सारखं हटून बसत होतं. त्याला गमत नव्हतं. आत्या, काकू, दादा असं म्हणून सारखं फुंदत होतं. हे दे, ते दे, असा हट्ट करीत होतं. राधाक्कानं लई घुटकून घेतलं. शेवटी आस्सी तरासली की त्याच्या पाठीत धपाटा घालून म्हणाली,

'लई जहागिरदार हाइस तर तुझ्या घरी! हे घर नव्हं तुझं, कायबी मागत सुटलास ते!'

तिच्या हातातून राजाक्कानं पोराला सोडवून घेतलं. आंजारलं-गोंजारलं. कनवटीला पन्नास पैशाचं नाणं हुतं. ते त्याच्या हातावर ठेवलं. त्यानं रडं आवरलं. उसासं टाकत-टाकत झोपून गेलं; पण हातातलं नाणं गच्च मुठीत धरुनच झोपलं होतं. मध्यान रातीपर्यंत बहिणी बहि-

णींच गुज संपलं नाही. तांबडं फुटायच्या वेळेला दोघींनं आवर-सावर केली. चहापाणी झालं. म्हाताऱ्याला तब्येतीला जपायला सांगितलं. रावदाजींना म्हाताऱ्याकडं लक्ष ठेवायला सांगितलं. राधाक्काने निघताना म्हाताऱ्याच्या हातावर पंचवीस एक रुपये ठेवले. राजाक्काला ओशाळल्यागत झालं. रात्री पोराच्या हातावर दिले, तीच तिची सारी ठेव, कसं कुणाला सांगावं? सांगण्यासारखं आहे का हे? म्हाताऱ्याचा निरोप घेताना दोघींचं हृदय भरुन आलं होतं; पण म्हाताऱ्यासमोर त्यांनी डोळ्यातून टिपूस काढलं नाही. येताळबाच्या फाट्यापर्यंत दोघीं आल्या. तिथून राधाक्का एस्. टी. नं रहिमतपूरला गेली. राजाक्काचं गाव आडवळणी. त्यात सध्या ऊसतोडीसाठी शिवारात वस्ती. राधाक्का एस्. टी. नं गेल्यावर राजाक्का पायवाटेनं आपल्या मार्गाला वळली.

वस्ती गांठायला राजाक्काला जेवण वेळ झाली. तिच्या नवऱ्यानं सत्त्याप्पानं शेजारच्या बनीकडनं दोनच स्वतःपुरत्या भाकरी करुन घेतल्या होत्या. त्याच ताटात घेऊन तो खात होता. कामाची वेळ झाली होती. आत्ता भाकरी करत बसलं तर आजचा रोजगार बुडणार होता. म्हणून राजाक्कानं ढसा ढसा पाणी पिऊन ऊसाच्या फडाचा रस्ता धरला. नवरा घुश्शातच होता. सासऱ्याचं कमीजास्त विचारण्याची साधी माणुसकीपण त्यानं दाखवली नव्हती. शेजारच्या कुडाच्या खोपीतून आया-बायांनी विचारलं. राजाक्कानं सांगितलं, त्यावर तिच्या नवऱ्याचा मनातलं प्रश्न सुटलं होतं. त्यानं ज्यादा विचारण्याचा हुरुप दाखवला नाही. राजाक्का पण जितक्यास तितकं वागण्या-बोलण्यात सरावली होती. लई पाघळून लोणीं लावायचा तिचा स्वभाव नव्हता. मनात म्हणाली,

'ह्या माणसाच्या मनात माया नाय तर आपुन पाणी लावून पान्हा फुटायची वाट का बघावी? '

बाबाला बघून आलेल्या राजाक्काच्या मनात त्याच्या दुखण्याचा घोर होता. उघड कोणाला बोलून दाखवता येत नव्हता; पण मनाला वाळवी लागल्यावाणी ती झुरत होती, नि काल पोतराजानं सांगावा आणला होता. पोटात कालवाकालव उसळली. दोन लेकींचा बाप

आभाळाखाली पोरकाच होता. जिवाभावाचं जवळ कुणी नव्हतं. हातावर पोट भरणाराचं हातपाय थकलं, की तुटलेल्या वावडीसारखी मुलुखमैदान दैना!

पंधरा दिवस होऊन गेलं. मोडका बाप परस्वाधीन जीणं जगत होता. दुसऱ्याच्या दये-मायेवर जगत होता. दुखलं-खुपलं तर सेवा करायला नाहीच; पण जवळ बसायलासुद्धा कुणी नाही. काही बरं-वाईट झालं तर कुणाला लवकर दाद मिळायची नाही. काय देवा एखाद्याचं नशीब घडीवतोस? विचारा-विचारानं राजक्काच्या जीवाला कळा लागल्या. डोळ्यातल्या आसवात चुलीचा जाळ तांवडा लाल दिसू लागला.

दिवस मावळला. रोजगारी कामावरुन सुटलं. राजाक्का खोपीत आली. तिचा नवरा तिच्या आधीच येऊन वाकळंवर उताणा पसरुन खोपीच्या वाश्यांकडं बघत पडला होता.

चहापाणी झालं. चुलीवर डेचक्यात चवळ्या शिजत टाकून राजाक्का बसून राहिली. नवऱ्यापुढं बाबाला भेटायला जाण्याचा विषय कसा काढावा असा तिला प्रश्न पडला होता. नवरा तसा दिसायला बावळा पण बोलायला खवाट. दुसऱ्याचं अंतःकरण जाणणारा नव्हता. राजाक्काच्या मनात शब्दाची जुळवा जुळव चालली होती चुलीतली चिपाडं ती उगींच मागं-पुढं सारत हुती. मनात तगमग चालली हुती.

'आज पोतराज भेटला हुता.'

'दिसला.'

'बाबास्नी जरा जास्तीच हाय म्हणत हुता.'

'हुं'

'बाबानी भेटायला बोलावलंय मला.'

'तू डाक्टरीन हाईस का?'

'मंजी?'

'तू भेटून तुजं बाबा बरं हुणार हाईत का?'

'- - - पण भेटून यावं म्हंते.'

'तू मनाची मालकीनं कधीपास्न झालीस?'

'मनानंच नाय चाल्ले. तुमाला इचारुन तर जाते. पळून नाय चाल्ले.'

'ह्यात मला काय इचारलंस?'

'-- -- - -'

'सांगावा आला म्हणून जात्ये. तुमाला इचारुन चाल्लेय. यात माझं काय चुकलं?'

'काय चुकलं म्हणून वर त्वांड करुन मला इचारतीस ते. चार दिसाला तुझं माह्येर उधळायला लागलं तर त्यो कंत्राटदार लाथ मारुन हाकलून काढील.'

'येवढी माणूसकी सोडली का त्येनं? एका दिवसाच्या खाड्यानं त्येचं काय मोठ्ठ नुकसान हुणार हाय?'

'लई शानपण हाय तुला! परतेकजण आसंच म्हणील तर ऊस कारखान्याचं कोटकल्याण!'

'सारीजण खाडं उगीचच्या उगीच कशी टाकतील? माझ्यावाणी नडल्याल एकांदंच खाडं टाकील ना?'

'उलट जबाब करु नकोस. मलाच शानपन शिकवाय बगतीस की.'

'मी तुमाला शिकवायला मला कुठं अक्कल हाय? फकस्त बाबास्नी बघून येत्ये म्हणंतीय मी.'

'जायाऽचं नाऽऽय!'

'मंजी?'

निजल्या जाग्यावर तो उठून वसला आणि त्यानं तिच्या गालावर खाडकन् चापट मारली आणि म्हणाला,

'मजी ह्येऽ! कळलं का?'

'खऽऽन्नऽऽ असा आवाज मस्तकात घुमत राहिला; पण चापटीपेक्षा तिला नवऱ्यानं तिच्या जाण्याला मोडता घातला त्याच्याच फार राग आला. ती हट्टाला पेटल्यावाणी बोलू लागली. वादळात बुचाड पेटल्यासारखं त्याचं डोकं भनानलं उठून गुराला बडवावं तसं राजाक्काला बडवलं. शेजारच्या खोपटात्न माणसांनी येऊन सोडवासोडव केली.

गुळमुळ शब्दात त्याला शांत केला. नवरा-बायकोच्या भांडणात शहाणी माणसं पडत नाहींत म्हणतात. ती सारी शहाणी होती. चार शब्द उपदेशाचं बोलून आपापल्या खोपटात सारीजण निघून गेली. राजाक्काच्या नवऱ्यानं निर्वाणीचं सांगितलं,

'तू जाऊन बघ. मी तुला पुन्ना या खोपटात पाय ठेवू देणार नाय. कर मनाचा कारभार. जाच तू!'

रातीला एवढं रामायण घडूनसुद्धा राजाक्का तांबडं फुटायच्या आत माहेरच्या रस्त्याला लागली होती.

चहुबाजूंनी काळचाकभिन्न घटींगण ढगांनी धरणीवर वाकून बघायची घाई केली होती. ढगामुळे अंधारुन आलं होतं, घाईघाईनं चालणाऱ्या राजाक्काचं पाय ढेपाळल्यासारखं जड झालं होतं.

नागठाण्याचं शिवार लागलं. आता नागठाण्याचं म्हणून काय ते आखून दिलं नव्हतं. अर्धा मैलाच्या शिवारात मागं-पुढं नागठाणकरांची शेती होती, तशी पाडळकरांची होती नि बोरगावकराचीपण होतीच की. पोतराजानं जाधवाच्या वस्तीवर बाबा आहेत म्हणून सांगितलं होतं; पण कोणत्या जाधवाच्या हे विचारलंच नव्हतं. जाधवाच्या दोन-तीन वस्त्या होत्या. नदीकडं एक, डोंगराकडंची एक नि वाघझऱ्याकडंची एक- जाधवाची वस्ती.

राजाक्कानं डोंगराकडंच्या वस्तीची वाट धरली. आता माणूस लई व्यवहारीं बनलंय. बागायती जित्राब काढू लागलंय, हातात पैसा खेळता राहतोय. समाजात रुबाब वाढतोय, कुणाला हे नको वाटतं का? ज्यानं त्यानं आपल्या शेताभवती कुंपण घातल्यालं दिसतं. पूर्वी असं नव्हतं. जिरायती पिक काढलं की, कोस दोन कोस शेतं घोंगडी अंथरल्यासारखी दिसायची.

डोंगराकडच्या वस्तीवर कळलं की, तिचा बाबा वरच्या वस्तीवर आहे म्हणून. तिचा जीव तर चिमटीत आलेला. त्यात हे काखंला कळसा नि गावाला वळसा. ती तशीच वरच्या वस्तीची वाट काढीत शेतातून बांधातून आडवाटनं निघाली. उन्हाचा तर कहार झाला होता. उन्हानं अंग धगधगून निघत होतं. काहीलींत टाकल्यासारखंच झालं होतं तिला.

अंगावरचं पोलकं घामानं चिप्प झालं होतं. आतल्या अंगानं घामाचं पाझर सुटलं होतं. मांड्यांना ओलं पातळ चिकटून पायाची गती रोखत होतं.

वस्तीवर गेल्यावर आंब्याच्या झाडाखालच्या खोपीत तिचं बाबा पडून आहेत, असं कळलं. काळीज अगदी सुपाएवढं झालं. हरिणीवाणी राजक्का खोपीकडं धावली. आत गेली. बाबा जागंच होतं. राजक्काला बघून त्यांचा चेहरा टवटवीत झाला; पण हालता येत नव्हतं. राजाक्काला तर काय नि किती विचारु झालेलं. ऊर धपापत होता तरी विचारीत राहिली. चेहऱ्यावर घामाचं उपळं फुटलं होतं. बाबा डोळ्यानं आपल्या लेकीची माया पहात होतं. होय-नाही एवढ्याच शब्दात बोलत होतं. जादा बोलवत नव्हतं,

'लई वाट बघावी लागली ना बाबा?' तोंडावर उसन हसू आणून तिनं विचारलं.

'छच : आता वाट बघावी लागणारच. तुमचं मिळवायचं सुगीचं दिवस, येणं-जाणं तुझ्या येकलीच्या मर्जीवर हाय का?'

बाबाच्या अंगावरचीं चादर बाजूला करुन राजक्कानं पाहिलं. मोडका हात फडक्यानं बांधला होता. वरती कळकाच्या कांबी लावून आधार दिला होता. हात इथून-तिथून सुजला होता. एखाद्या पट्टीच्या पैलवानासारखा सम्धम् दिसत होता. हाताचा पंजा आपल्या हातात घेऊन राजाक्कानं कुरवाळला. तेवढंसुद्धाबाबांना सोसलं नाही. माश्यावाणी तळमळलं. हाताची बोटं रताळीसारखी सुजली होती. डावा हात धडसा होता, तो हातात घेऊन राजक्कानं आपल्या गालाला लावला. तिला भरुन आलं. आईच्या माघारी आईची माया देणारा तिचा बाप धरणीवर पडला होता; पण एक दिवस भेटायचीही तिला चोरी झाली होती. शिवीगाळ, मारहाण खाऊन ती बाबांना भेटायला आली होती. अंत:करणाच्या यातना एकमेकाला बोलल्याशिवाय कळत नव्हत्या, तेच तिला कितीतरी चांगलं वाटलं.

दाढीचं रुपेरी खुंट वाढलं होतं. खोल खोल गेलेल्या डोळ्यात पाणी तरारलं होतं. गालाची हाडं वर आली होती. दोघांच्या अंतरीच्या

भावना उमाळून आल्या होत्या. शद्व कुचकामी ठरले होते. राजाक्कानं आपल्या पदरानं बाबांचं डोळं पुसलं. गालाच्या हाडावरुन तिचा हात न कळत फिरत राहिला. काय बोलावं तेच उमगत नव्हतं तरी म्हणाली,

'बाबा, काय हुतं तुमास्नी? '

'काय न्हाइ बाळा, कनकनी येती अंगात. खावत न्हाइ - . -'

'हात दुखायचा कमी झालाय का? '

बाबा खिन्न हसून म्हणालं,

'कमी कसं येणार? पिकलं पान फांदीला जोडायचा शानपना खरा नव्हं! '

'कनकनीवर औषध-पाणी घेता का? '

'दोन तीन येळा कडुलिंबाचा रस घेतला. अनासीलची गोळी बी घेतो - - - लई तरास पडला तर. '

'अशा दुखण्याला ती गोळी कायवो कामाची? त्या परास तुमी सरकारी दवाखान्यात आडमीट झाला असता तर - - - ? '

'ते खूळ नगं डोस्क्यात सारुस. बरं हाय हिथंच. मला ठावं हाय सरकारी दवाखान्यात काळाबाजार चालतो ते. आपला सोपानकाका हुता की सरकारी दवाखान्यात. तिथं ह्येची-त्येची मूठ दाबावी लागती. आपल्यासारख्याचं तिथं काय जमत न्हाइ. '

'तरीपण खाजगी दवाखान्यापरास कमी पैसा लागतो. बीनघोरी रहाता येतं. '

'माझे बये, खुळीच तू. पुलीसखातं बदनाम झालंय; पण तसाच कित्ता समदीकडं. मोठया डाक्टरपासून ते झाडूवाल्यापातूर साऱ्यास्नी लायकीपर्मानं पैसा द्यावा लागतो. '

'देणाऱ्यापास्न घेतबी अस्त्याली. आपल्याकडं न्हाइच तर काय घेत्याली? '

'मग ध्यानचं देत न्हाइत. औषदाच्या वासात कुढत इव्हळत रातन् दिस पडून रहाणं सोपं हाय का? दुखणं कमी होण्याऐवजी वाढायचं. आपला जीव गुतलेला असतो. पैसा काय का होईना दिल्या-बिगर सत ना गत. '

'काय बाई तरी दुनिया! जिथं जावं तिथं काळचाच कर्माला आग लागलीया. गाऱ्हाणं तरी न्यावं कुणाकडं?'

'वरच्या देवाकडं न्यावं. तवर गरीबानं सारं ऐकायचं, बगायचं, वा ऽऽस्स!'

'मग तुमी हिथं वस्तीवर दुखणं रेटणार व्हय?'

'मग कसं तर?'

'दवा-पाणी, सेवा-चाकरी करायला कुणी नाय, कसं निभायचं? राधाक्का पुन्ना आली हुतीं का?'

'व्हय, उभयता येऊन गेली. गाडी जुपून पावणा आला हुता. वागायती वाढवलीया. त्येच्या माग ढीगभर कामं. आली नि गेली, पाखरावाणी. तुझं लालासाव कसं हायती?'

'बेस हायती की.'

'संग का आलं न्हाइत?'

'मस्त विच्छा हुती त्येंची, पर मालक खाडं करु देत नाय. समदा परस्वाध्यान मामला.'

'व्हय, त्येबी खरंच. अजून तुमचा संसार मार्गी लागायचा हाय.'

'हां, तेवढी दोन वावरं सोडली की घोर मिटंल. तवर जीवाला काढण्या लागल्यावाणी हाय.'

'सुटत्याली वावरं. समदं चांगलं हुईल. उगं जीव कुरतडू नका. लई वढावढी जीवाला बरी नसती.'

'व्हय, जमलं तसंच चाल्लंय.'

'बेस, हाय तेच.'

तेवढ्यात जाधवाच्या शेतातलं रोजगारी गडी आलं. राजाक्काला बघून त्यांना समाधान वाटलं. म्हातारबाबाच्या दुखण्याचं त्यांनी राजक्काला कळवळा येऊन सांगितलं. रोजगाऱ्यांनी दशम्या सोडल्या. तात्यारावनं म्हाताऱ्यासाठी भात आणला होता. तो म्हातारबाबापुढं ठेवला. राजाक्कानं बाबांना बसतं केलं. चूळ भरुन त्यांनी दोन घास भात घशाखाली घातला नि 'पुरं' म्हणून हात आखडला. राहिलेला भात राजाक्कानं खाऊन भुकेला गप्प केलं. काल सकाळी ती जेवली

होती. रात्री तो तसा प्रकार घडला. उपाशीच रात्र काढली. आता दादाआप्पानं पुढं केलेल्या घासावर पोटाची आग शांत केली; पण घासागणिक डोळं भरुन येत होतं. जीवाच्या कळा कुणाला सांगता येत नव्हत्या.

दशम्याची फडकी झाडून, पाणी पिऊन, रोजगारी कामासाठी शेतावर गेलं. राजाक्का बाबाजवळ बसून होती. त्यांचा डोळा लागल्यासारखा दिसला. बसून तरी काय करावं? तिनं कमरेची मिश्रीची डबी काढून दात घासायला सुरुवात केली. डोळ्यापुढं रात्रीचं रामायण येत होतं. उदास वाटत होतं. एकमेकांच दुःख समजून घेतल्याबिगर नातीगोती काय कामाची? नवरा तर दम देऊन बसला होता.

'पुन्ना आसऱ्याला घेणार नाय.' म्हणाला होता. ह्या धरणीवर पडलेल्या दुखणकरी बापास काय सांगावं? कसं सांगावं? नि तो काय मार्ग काढील? वणव्यात सापडलेल्या अश्राप गाईसारखा तिचा जीव आतल्या आत हंबरत होता. इथं आड तिथं विहीर, काय करावं? रात्रीचं नवऱ्याचं रुप आठवलं, तर तो पुन्ना खोपटात आसरा देईल, याचा शपथेवर भरवसा नव्हता! दोन दिवस आल्यासारखे इथं काढावेत. पण कसं? आपल्या पोटाचा दुसऱ्याला भार? जग काय म्हणेल? येताना एक भाकरीसुद्धा बांधून आणण्याची हिंमत झाली नाही. परत जावं तर तो भला माणूस आग्यातयोळासारखा वडवत सुटेल. तिचा जीव सशासारखा थरारला. हात-पाय मोडून ठेवील खवीस. मरणापेक्षा आंधळं-पांगळं होऊन जगणं वाईट. बाईचा जन्म!

फटफटीचा आवाज आला. म्हाताऱ्याला जाग आली. शेजारीच राजाक्का कलंडली होती. तिला तो म्हणाला,

'बये राजाक्काऽ, ऊठ मालक आलं.'

चटकन् उठून राजाक्का पदर सावरुन बसली. कुडाला पाठ लावून अंग चोरुन ती बसली होती. ढग गडगडल्यासारखं हसत उभ्या आडव्या अंगाचा गडी झोपडीच्या तोंडास उभा राहिला. त्याला पाहून राजाक्काचा जीव दडपून गेला होता.

'कोण पावणीबाय? राजाक्का आलीय व्हय?'

'व्हय, जेवणयेळंला आलीं.'

'तांबडं फुटायला निघाली आसंल. त्या परास यस्टीनं झोकात येता आलं आसतं.' राजाक्काकडं रोख लावून बघत मालक बोलला.

वसल्याजागी राजाक्का चुळबुळ करत होती. फुलवेलीवर काठी मारल्यावाणी त्याचं धुसमुसळं बोलणं तिचा जीव घावरुन सोडत होतं.

'काय जेवण खाणं झालं का?'

'व्हय.'

'मजी वरं; नायतर आमच्या वस्तीवर पावणी उपाशी राह्याची नि आम्हाला खबर ना वात.' पुन्हा तो हासला. खालतीकडं बघून त्यानं,

'कुशावा ऽऽ आरं ए कुशाबा ऽ सुक्काळीच्या कुठं हैस रं?' असं म्हणून हाक दिली. तेवढ्यात घाईघाईनं कुशाबानं शेंगाचं बाचकं आणून मालकाच्या हाती दिलं.

'कुशा लेकाऽऽ पाण्यात पडल्यावाणी जाईल तिकडंच गुल होतोस न्हवं का? - - - बरं आता जा तू. तेवढं कोशा खोंडाचं बघ जरा काळजीनं.'

कुशाबा गेला आणि घळीत वाघ शिरावा तसा मालक खोपटात शिरला. राजाक्काच्या अगदी पुढ्यातच येऊन गभा राहिला. म्हातारा झोपल्या जागेवरुन टुकुटुकु बघत होता. मालकानं शेंगाचं बोचकं राजाक्कापुढं मोहरा ओताव्या तसं ओतलं. पुन्हा तसंच घमेंडीचं हसू आणून शेंगा खळाळल्यासारखा म्हणाला,

'खा, भाजक्या शेंगा नि गूळ आणलाय. घरचं हाय समदं.'

'आत्ताच जेवणं झालं, नव्हं का! भूक न्हाय. न्या जावा परत.'

'ह्यो काय न्याय झाला? तुमी आल्याचं ऐकून आलों. लाजता काय आमास्नी? आमी खातो. आमच्यासंग तरी खा. का आनमान करता?'

'भाकरी खाल्यावर मला काइ खाणं जमत नाय.'

'आस्सं का? - - - मग ऱ्हायलं. किती दिसाचा मुक्काम - - - आमच्या वस्तीवर?'

'कसला मुक्काम? येळ कुणाला हाय? जायाचन्.'

'न्हायाला कोण येत वो? पण आल्यासारख्या दोन राती काढाव्यात कऽऽसं?' त्यानं वेगळ्याचं नजरेनं पाहून विचारलं. राजाक्काचं काळीज लखकन् हाललं. तोडून बोलावं तसं ती बोलली,

'सवड नाय. कामाचं खाडं नाय परवडत आमाला.'

'हुइना का. खाडा झाला तर जीवाला इसावा तरी घडलं. आला तसं दोन राती रहा. सांच्याला कोंबडा कापतो. म्हाताऱ्याच्याबी पोटात दोन घास जात्याली. तुमीच करा सैपाक. इथं होऊ द्या बेत. काय बाबा?'

'तसं नाय मालक. तिच्या तिकडंच लई आडून पडतं. म्हणं तिला नाय जमायचं.'

'एका रातीनं काय हुणार हाय? त्यांच्या हातचं आजला मटण खावंच म्हंतो मी. कसं?'

राजाक्का गप झाली. म्हातारासुद्धा काय बोलला नाही. किती दिवस झालं. चटणी मीठाचं फळकपाणी खावून जीभ बेचव झाली होती. आपल्या निमित्तानं बाबाला दोन घास चवीचं जेवण मिळतंय तर आपल्या अभिमानीपणानं आपण मोडता घालतोय. गरीबाला अभिमान फायद्याचा नसतो.

'काय म्हणतो मी?'

पुढ्यात पडलेला शेंगेचा दाणा न कळत तोंडात टाकून राजाक्का लाचार हासली. पसाभर शेंगदाणं सोलून तिनं दगडाच्या चिप्पीवर ठेवून ठेचून बारीक केलं नि बापापुढं केलं. तिच्या साऱ्या हालचाली मालक टक लावून बघत होता. लग्नाआधी पासून मनात भरलेली ही रामबाबाची राजाक्का अशी अवचित वस्तीवर माहेराला आली होती. दुखणेकरी बापाला बघायला. देवसुद्धा एखाद्याच्या मनची इच्छा पुरी करायला निमित्त घडवीत असेल, असं त्याला मनापासून वाटलं आणि तो आपल्या नशीबावर खूष झाला. म्हातारा गुळाबरोबर कूट मुळुमुळु खात होता. मालकाचं तोंड जात्याच्या तोंडावाणी राजाक्काला न्याहाळत गूळ-शेंगदाण्याचं घास हपापल्यासारखं घेत होतं.

शेंगा संपल्यावरहीं फालतू गप्पा काढून मालक तिथंच रुतून बसल्यासारखा बसला. तेवढ्यात खालतीकडून हाका ऐकू आल्या, तेव्हा झपाट्यानं उठून तो खोपटाबाहेर रेड्यासारखं अंग झुलवीत खालतीकडं गेला. ही बला माघारी येणार याची खात्री या बापलेकीस होती. मोठ्या तिढ्यात पडल्यासारखी त्यांच्या मनात घालमेल चालली होती. राजाक्कानं म्हाताऱ्याला विचारलं,

'परसुअण्णाचा थोरला ना ह्यो?'

'व्हय, थाकटा कराडात शिकतुया.'

'पैल्यांदी तर लई माजुऱ्यावाणी करायचा. आताबी लक्षाण तसंच दिसतंय. मी काय करु वो बाबा? मालकाचा आग्रेव तर आसा हाय, काय करु?'

'ऱ्हाण्याबद्दल म्हणतीस व्हय?'

'हं'

'नगं, माझे बये, मला दोन घास सागुती मिळण्यासाठी ही बला नग घीऊस.'

'मी म्हंते ऱ्हावं, खाडं झालं तरी तुमास्नी - - - जीवाला ग्वॉड वाटंल.'

'माझ्या जीवाची काय काळजीं? माणुसकी पोटी कुणीबी दोन घास मला देतं. मीबी माणसं जोडून आयुष्य काढलंया. ऱ्हाण्याच्या फंदात पडू नको.'

'बाबा, माझ्या जीवाला आपलं वाटतं काय का निमतानं म्हणा माझ्या हातचं दोन घास तुमाला - - -'

'पोरी ऽऽ - - -' म्हातारा पुढे झुकला. खोल गेलेला त्याचा आवाज अधिकच बारीक झाला होता. राजाक्का पुढं सरकली. म्हाताऱ्याचा स्वर कापरा झाला होता, तरी काळजीनं तो म्हणाला,

'पोरी, आभाळ उठलंय लवकर निघायचं बघ. आता येऊन गेलेल्या मालकाची नियत खराब हाय. त्येचा बाप संतावाणी पण पोरगं लई इब्लीस, कवडका नाग हाय! तू निघायचं बघ.'

राजाक्का धास्तावली. निघणं भागच होतं. जन्मदाता बाप या-

पेक्षा उघडपणानं आणखी काय सांगणार होता? ती सारं उमगली. तान्ह्या लेकराला चाचपावं तसं म्हाताऱ्याचं रोड झालेलं शरीर मायेच्या हातानं चाचपलं. दाटून आलेल्या कंठाने तिने निरोप घेतला. ती झोपडीबाहेर पडली तेव्हा बापानं आपलं डोळं पुसलं, तरी पुन्हा पाझरत राहिलं; पण उरावरचा दगड खाली ठेवावा तसा जीव हलका झाला होता.

वारा दडला होता. गदमदायला लागलं होतं. पावसाची लक्षणं होती. घटका दोन घटकानं वळवाचा पाऊस येणार, गाराचा पाऊस पडू लागला तर मोठंच संकट होईल. म्हाताऱ्याचं मन त्याला खाऊ लागलं. उगीच मालकाच्या भितीनं आपल्या पोरीला अशा ऐनवेळेला पिटाळलं. आता वाटेत काय होतंय देव जाणे! राजाक्का पावसाआधी तिच्या वस्तीवर पोचेल का? उगाच पिटाळलं. तिचा नवरा काय म्हणेल? म्हाताऱ्याचा जीव तळमळत राहिला.

दडी मारुन बसलेला वारा सैराट धावू लागला. शिवारातील मातीच्या गदळ घेऊन लाटा उसळू लागल्या. झाडाखालचा पाचोळा उडू लागला. झाडाच्या वाळल्या-कुजल्या फांद्या 'कडा ऽऽ का ऽऽड' आवाज करुन मोडू लागल्या. पाखरं मोठ्या झाडाच्या निवाऱ्याला दडी मारुन वसली. बांधणीत ढिलाई झालेलं एखादं बुचाड साऱ्या शिवारभर विस्कटू लागलं. राजाक्काच्या मनात विचाराची वावटळ उधळली होती. ती झपाट्यानं चालत होती. वाऱ्यानं डोकीवरचा पदर रहात नव्हता. केस विस्कटून गेले होते.

साळव्याच्या वस्तीवरुन राजाक्का जात असताना वीज कडाडली. त्या गगनभेदी कडकडाटानं ती जागीच हादरली. शिवार दणाणलं. कुठं तरी वीज पडली होती, अतिशय भयानंच ती जवळच्या घरात शिरली. दाराच्या तोंडशीच उभी राहिली. घरातले लोक तिला दिसत नव्हते; पण भांडण ऐकू येत होतं.

'काकी, थोरल्या वैनीला तू तुझी वजरटीक दिलीस. माझ्यात खाती-पितीस नि तुझं इमानं आसं!'

'तिला येळपरसंग आला म्हणून दिली.'

' तिला येळपरसंग पडतो. आमाला आवादी-आवाद हाय नव्हं? '

' तसं नव्हं, पण नवऱ्याचं दिस घालायला तिच्याजवळ काय नव्हतं.. म्हणून वजरटीक मोड जा म्हणलं. '

' मग आता तिच्यात जाऊन ऱ्हा जा. आमच्यावर भार नको. '

' कसला भार? माझी शेतं-शिवारं तर मी तुझ्या नावानं केली.'

' माझ्या एकटयाच्या नावानं केली नायती. '

' दिली दोघास्नीबी; पण त्यो बिचारा अर्ध्या आयुष्यात्नं उठला, तिचा संसार उघडा पडला! '

' मजी माझा संसार उघडा पडला तर तू काय तरी देशील. '

' आसं का वाईट-वंगाळ बोलतोस रं? '

' मग कसा बोलू? माझ्या घरात खायाला अन्न ऱ्हाइ, तू माझ्यात राहातीस नि एक एक दागिना थोरलीला देतीस. दुस्काळानं आमी जेर झालो तरीं तुला पाझर फुटत नाय. पोरं-बाळं उपाशी मरायची वेळ आली. तू थोरलीच्या घरात जाऊन रहा. '

' तिची बी पोरं हायती. ती तरी दुस्काळात काय करील? रंडकी -मुंडकी बाई ती! '

' काके, अशा येळलाच तिच्यासंग तू ऱ्हाया पायजेस. दुस्काळानं लाचार झाल्याला बाईवर कायबी परसंग पडतो. '

' मी थकलीया घरात बसून खाण्याशिवाय मी तिची काय राखण करणार? माझाच भार तिला. '

' रातची सोबत तर तुझी हुईल का ऱ्हाय? '

' दिग्याऽ! हे मला तू ह्ये शिकवू बगतोस का? मला समदं कळतं. आजपातूर तू मला आसं बोलला ऱ्हाइस. वायकूचं बाळंतपण माझ्या जीवावर पार पडलं. पोरगं हासू-खेळू लागलं. तू नदी उतरुन पार झालास म्हणून गरज सरली. मी जड झाली नि तुला भावजंयची काळजी पडली. देण्या-घेण्याचं हिशेब आठवलं. ह्येच्यापरास सरळ थोरलीकडं जा म्हण. ताकाला येऊन भांडं लपवायचं काय कारण हाय? '

' तुझं तुला एवढं कळतं तर आजपातूर मी बोलायची वाट बगत हुतीस व्हय? '

'खरं हाय बाबा. हातात माल पडस्तोवर 'काकी' देवासारखी वाटली. आता दारातल्या कुत्र्यावाणी लागला हाड हाड करायला. मी थोरलीकडं जाते. अगदी आत्ताच निघते; पण ध्यानात ठेव मला म्हातारपण आलं. तुलाबी एकदा येईल. आठवंल तवा कळंल चुलतीच्या काळजातली कळ. तुमी अगदी रामराज्य करा. माझी आडगळ हिथं रहात नाय. चला!'

आतील भांडण संपलं होतं कोण ती 'काकी' पुतण्याचं घर सोडून थोरलीच्या घरी निघाली होती. राजाक्कानं उंबऱ्याबाहेर पाऊल टाकून घाईनं रस्ता धरला. आपला पायगुण काही चांगला नाही. जाईल तिथं वणवा. तिला तिच्या भणंग नशीबाची पुन्हा एकदा खात्री पटली.

'ए, पोरी कुठं चाललीस?'

राजाक्कानं मागं पाहिलं. त्या घरातून बाहेर पडलेली ती 'काकी' होती. कमरेवर कपडयाचं बाचकं. कमरेत वाकलेली.

'माझ्या घरला चालले.'

'कुठ तुझं घर? - - - गाव कुठलं ग?'

'पाडळी'

'एकलीच चाल्लीस. येळतरी बगायचीस. संगतरीं कुणाला आणाचंस.'

'येण्यासारखं कुणी नव्हतं. जरुरीचं काम हुतं म्हणून आले.'

'पाय उचल पोरे, अजून लई पल्ला गाठायचा.'

या म्हातारीला स्वत:चं दु:ख नसल्यासारखं दुसऱ्याचं दळण घेऊन दळायची केवढी हौस? पुतण्यानं हाकलून दिलं तरी वाटेच्या मला जल्दी जाण्यासाठी सांगत बसलीय. राजाक्काला नवल वाटलं. संकट सोसून सोसून अंगवळणी पडली, की माणूस असंच वागत असेल का? मीपण अशीच होईन का? आणि म्हातारीचं वैधव्य तिच्या मनात डोकावल्या बरोबर तिच्या जीवाला चरका बसल्यासारखं झालं. मन फार पापी! काहीपण वाईट विचार करतं!!

म्हातारी आता खूप मागं राहिली होती. पाऊस कधी कोसळेल

याचा नेम नव्हता.

म्हसोबाचा माळ ओलांडून राजाक्का शिंदेवाडीजवळ आली. वस्तीलाच आता वाडी म्हणू लागली होती माणसं. वाडीत शुकशुकाट वाटत होता. चार-पाय घरं नि सात-आठ छपरं दिसत होती. कौलारातून धूर चोरपावलानं निघावं तसा निघत होता. माणसाच्या अस्तित्वाचा तेवढाच एक पुरावा होता. गुरांच्या गोठ्यात गुरांबरोबर कोंबडी कुत्रीसुद्धा पावसाला भिऊन उभी असल्याचे दिसत होते.

अजून मैलभर जायचं होतं. तोच टपोऱ्या बोरासारखे थेंब पडू लागले. गारा पडू लागल्या. पुढं जाणं काही खरं नव्हतं. पायातल्या पायताणाला माती चिकटून ते जडशीळ झालं होतं. राजाक्कानं पायताण काढून हातात घेतलं नि जवळच्याच खोपटात ती जावे की न जावे या विचारात डुचमळली. तेवढ्यात डोळे दिपवून टाकणारा वीजचा लोळच लोळ कडाडून खाली आला. दुसऱ्या क्षणाला भेदरलेली राजाक्का छपराच्या आडोशाला झाली. पावसाची सर ओसरु द्यावी म्हणून ती उभी राहिली. कुडाच्या आड पेटलेल्या स्टोव्हजवळ एक दाढी वाढलेला मळकट माणूस बसला होता. स्टोव्हवर छोटं पिप होतं. त्याला नळ्या-नळकांड्या जोडल्या होत्या. सर्वत्र तो पर्प दाटून होता. राजाक्काच्या मनाला खटकलं. थोडा वेळच तिला तिथं थांबायचं होतं. तिला काय घेणं होतं?

तो माणूस तिच्या बाबांच्या वयाचा होता. ती आल्याची दखल त्याला होती; पण त्यानं फारसं तिकडं लक्ष दिलं नाही. तो आपल्याच तंद्रीत वसून होता. पावसाचा जोर वाढला होता. आता हा बाबा कधी थांबणार? राजाक्का मनातल्या मनात प्रार्थना करीत होती.

बाहेर भिजल्या मातीचा चिखल-रबडा झाला होता. गढूळ-गदळ पाणी उताराकडं वाहू लागलं होतं. चिखलात पाऊस नाचत होता. राजाक्काचं लुगडं गुडघ्यापर्यंत चिखलपाण्यानं भिजून राड झालं होतं. पावसाचा जोर आणखी वाढला. तेव्हा ती कुडाच्या आणखी आतल्या अंगाला सरकून उभी राहिली. स्टोव्हच्या भरारणाऱ्या जाळाकडं एकटक पहात तिच्या मनात विचारांचं थैमान चालू होतं. तिला तिच्या

खोपटातलं सारं डोळ्यापुढं येत होतं. चुलीवर गळत असेल. नवऱ्याला चहा तरी करुन घेता आला असेल का? आपल्याला बगितल्यावर तो काय करील? मारुन तरी घरात घेईल का? खोपटात दार लावून मारील की चार-चौघात बडवील? अंधार पडायच्या आत तिथंपर्यंत जाईन का? 'नवऱ्यानं मारलं नि पावसानं झोडपलं सांगायचं कुणाला? तिला त्या म्हणीचा नव्यानं उलगडा झाला. दया ना माया निव्वळ दगड; पण त्यालाच देव मानायला लागतं! तिला तिच्या नशीबाचा नेहमीसारखा राग आला.

अजूनही स्टोव्हच्या निळ्या ज्योतींकडं ती पहात होती. पावसाचा जोर कमी नव्हता. तिचं अंग गारठलं होतं. छपरातून गळणारं पाणी तिच्या केसावरुन ओघळत होतं.

तो बापासारखा माणूस आता उठला होता. त्याची नजर तिच्या पाठीमागे होती. तो काय पहात होता? तिनं मागे वळून पाहिलं तेव्हा त्या बापासारख्याचे हात तिच्या कमरेभोवती पडले आणि ती घाबरुन ओरडली,

'बाबा, सोडाऽ वो, सोडा मला ऽऽ- - -'

तो कसनुसा हसला. ती धडपडत म्हणाली,

'पाया पडते तुमच्या पण मला - - -'

'पाया कशाला पडायचं? बाब किती मामुली इथं कोणबी नाय - - -'

तिनं सारी ताकद पणाला लावून उसळी मारली. एखादी बांब हातातून सुटावी तसे तिचे ओले हात त्याच्या हातातून सटकले आणि ती धावत सुटली.

पळत ठेचकाळत-भेलकांडत ती खूप दूरवर आली. तरी तिच्या काळजातील भीती गेली नव्हती.

आता तिच्या वस्तीचा मळा जवळ आला होता. तिला धीर आला होता. एका अनोळखी सैतानाच्या हातून ती सुटली होती. आता - - - तिला रडू येत होतं नि ती ते दाबून धरत होती. तरीही डोळ्यातील पाणी हळु हळु गालावर ओघळत होतं. ठेचकाळल्या पायांच्या

वेदना आता तिला जाणवू लागल्या होत्या. उजव्या पायाच्या अंगठ्याचं नख मुळापासून उखडलं होतं. बारा महिने दुःखाचा भोगवटा. काय नशीब म्हणावं? त्या बापासारख्याच्या खोपटात पायताणं राहून गेल्याची जिव्हारी चुटपुट लागली. अजून चार-सहा महिने कशीही टिकली असती. आता तो खवीस विचारील त्याला काय सांगणार? खरं सांगितलं तर - - - ठेवील का विश्वास? तिचा गळा दाटून आला.

जांभळडोहाच्या वरतीकडून कोणीतरी येत असल्याचं दिसलं. तिच्या नवऱ्यासारखं. असायचा दुसराच कोण! दैव हात धुऊन पाठीशी लागलंय म्हटल्यावर - - - तिनं वाट वाकडी केली. अशांच्या वाटेवर चुकून जाऊ नये. ती मनाला बजावत होती. विपरीत बुद्धीच्या माणसाचा भरवसा देता येत नाही! तेवढ्यात तिच्या कानावर हाक आली.

'राजे ऽऽ, राजे हो ऽऽ !'

तिचा नवराच होता. मघाशी खात्री वाटली नव्हती. आता कळ दाबल्यासारखी ती वाटेवर उभी राहिली. आता नव्या मरणाला सामोरं जायचं म्हणून! राजाक्का मनाला धीर देऊ लागली.

तो तिच्याजवळ येऊन उभा राहिला. नव्यानं पाहिल्यासारखं त्याने तिला उभीच्या उभी न्याहाळली. ती रडल्याचे हेरलं आणि कुत्सितपणानं हसून म्हणाला,

'एवढा येळ केला. काय शानपण म्हणावं? म्हाताऱ्यानं धाडली तरी कशी तुला? - - - बारं काय सुटलंय - - - वळवाचा पाऊस, इजवादळ उठलंय - - - म्हातारपण आलं - - - केस पिकलं ते वयानं का उन्हानं? - - - आयला ऽऽ काय तरी डोस्कं चालवू नाय माणसानं - - - - तरणीं ताठी पोरगी - - - धाडली एकटी-दुकटी - - - अशा वक्ताला कायबी जाणीव नसावी? - - -'

तो बडबडत होता. अजून तरी त्यानं तिच्यावर हात टाकला नव्हता. उलट तिचा कळवळा येऊन तो तिच्या बापाला दोष देत होता. तिला एका बाजूने दुःख वाटत होतं; पण एक मन सुखावत होतं. बहुतेक आज तो तिला मारणार नव्हता. या अंदाजाने ती सुखावली होती.

त्याची बडबड चालूच होती.

'बापाचा पुळका आला म्हणून तू गेलीस. नवऱ्याची किंमत वाटली नाय - - - अशा बापानं मोकळी माया काय म्हणून दाखवावी? - - - नसंल सोताचं घर - - - लोकाच्या वस्तीवर असला म्हणून काय झालं? - - - एक रात आसरा द्याचंबी जड झालं? - - - ह्येला बाप म्हंत्यात? वानराच्या काळजाचा! - - - दया माया नाय माणुसकी नाय - - - असल्या बापासाठी जीव टाकायला गेली - - - तू पण काय ग बुंदाट बुद्धीची? - - - मार खाल्लास नि गेलीस - - - एक रात तरी मिळाला का आसरा? - - - आयला ह्येंच्या ऽऽ - - - वैऱ्यालाबी दया आली असती - - - एक रात रहा म्हणला आसता. अन् ह्यो जन्म दिल्याला बाप - - - थू: ह्येंच्या जिनगानीवर - - -'

त्याच्या जीभेला उसंत नव्हता. खोपटाच्या आत शिरल्यावर बरं वाटलं. तो म्हणत होता,

'बाईच्या जातीला फक्त आसरा लागतो - - - येवढं बी म्हाताऱ्याला कसं कळलं नाय? - - -'

ती मुकी बहिरी होऊन स्वैपाकाला लागली होती.

( 'महारथी' दिवाळी अंक १९८६ )

# ८. वळख

'शांतु, थोडं थांब, दोन गिऱ्हाईकं वाटंला लावून येतो.' असं म्हणून शकऱ्या पळाला. शांतीच्या हातात सीताफळाचं दोन तुकडं तसंच राहिलं. शकऱ्या तिथून भुंग्यासारखा पळाला. त्याचा तिला राग आला. कपाळावर आठ्या पाडून ती सुन्न बसून राहिली.

आज बाजारचा दिवस. शाळेला दुपारची सुट्टी. नुकत्याच व्यालेल्या म्हशीच्या रेडकावर लक्ष ठेवण्यासाठी शांतीच्या आईने तिला रानात नेलं नव्हतं. सपराच्या कळकाला फडक्यात बांधलेली भाकरी अडकवून ठेवली होती. सीताफळीच्या झाडावरची पाडाची सीताफळं तिनं काढली होती.

नोटा मोजून चड्डीच्या खिशांत घालीत दुडक्या चालीनं शकऱ्या परत आला.

'तू खाल्लं न्हाईस? तशीच बसलीस?'

'तू तसाच पळालास तर मी कशी खाणार?'

'गिऱ्हाईक हुकलं आसतं ना!'

'हुकलं तर हुकलं! दुष्काळातनं उठल्यावाणी पळत गेलास त्ये - - -'

'तसं करावचं लागतं, नायतर धंदा मार खातो. सदबानं नवी भट्टी चालावलीया. गिऱ्हाईक तिकडं पळालं आसतं. दादा रागाला आलं असतं.'

'काय पण धंदा! मला नाय आवडत तुमचा धंदा.'

'आवडतो म्हणून करतो व्हय आमी?'

'मग कसा पळतोस धंद्यासाठी?'

'दुसरं काय करणार - - - पोट कसं भरणार?'

'आमच्या घरात कुठं तुमच्यासारखा धंदा हाय?'

'तुमची शेती हाय बक्कळ - - - आमच्या एका तुकड्यावर कात बी होत नाय.'

'मग दुसरं काय तरी करावं - - -'

'काय करावं? भांडवल पायजे. गाय-म्हशीचा दुधाचा धंदा करायचा तर पैसा पायजे, वैरण पायजे. मी दादास्नी मोप बोलून बसलोय; पण या धंद्याइतका कमी भांडवलात रोकडा पैसा देणारा धंदाच नाय, आसं पटवून दिलंय त्यांनी मला.'

'रोख पैसं दिऊनबी गरीब गरीब माणसं दारु का पित्यात रं?'

'कुणाला ठावं! दादा म्हंत्यात डोस्क्यात इचाय लई झाला मजी दारु पेत्यात माणसं; पण शांतु, यकदा प्याला शिकल्याला माणूस कसंबी करुन प्यायला येतोच.'

'पण दारुत पैसा लई जातो ह्ये कसं कळत नाय रं त्येस्नी?'

'तल्लफ झाली कीं दारुबिगर काईच सुचत नाय. लई लाचार हुतो बघ माणूस– कुत्र्यावाणी.'

'दारु कशी आसती रं?'

'कशी मजी?'

'अं - - - रंगानं? - - - चवीनं?'

'तू खऽऽरंच बगितली न्हाईस?'

'उं, हुं'

'चल, माझ्या घरातच दावतो तुला.'

'घरात?'

'हो, हो घरात. चल.' शांतुला घेऊन तो फुशारकीने पुढं चालला होता.

'शंकऱ्या दारु कशाची करत्यात रं?'

'गुळ, नवसागर - - - मळी, बराच मालमसाला वापरत्यात.'

'तुला म्हाईत हाय सगळं?'

'म्हाईत? - - - मी भट्टीसुद्धा लावतो.' दादा म्हंत्यात,

'तू ट्रेन झालास, मी मेलो तरी तू उपाशी मरणार न्हाईस.'

'शंकऱ्या, तुला तुझ्या आईची सय येती?'

'व्हय, ती हुती तवा मी शाळेत जात हुतो. आता सातवीत आसतो बघ. भट्टीचं काम, गिऱ्हाईकं बघता बघता जीव कावून जातो. अशा वक्ताला आईची लई सय येती बघ. रडू येत मला. वाटतं आपल्या मनात पेटल्याला वणवा कुणाला तरी सांगावा.'

'तू दादास्नी का सांगत न्हाइस?'

'पयलं, पयलं सांगायचो. थोडं थोडं - - - जमलं तसं; पण त्यांनी मला समजावलं. आई हुती तवा दोघं रोजगार करीत हुती. मी शाळत हुतो. काय काळजी नव्हती. आई मरुन गेली. दादाच्या काळजाला पलिदा लागला. मला सोडून त्ये कुठ्ठ जाईनासं झालं. मला पोटाशी धरुन त्ये रातभर रडायचं. कधी कधी पिऊन याचं. पोटाचं हाल झालं तवा घरातच भट्टी सुरु केली. आता आमचं पोट तरी भरतंय.'

'पण लोकं नावं ठेवत्याती. दारुड्याच्या बायका शिव्या देत्यात.'

'त्याला इलाजच नाय.'

'थू: कसली घाण घाण · शिवराळ माणसं तुमच्याकडं येत्यात. तुमाला कसं रं काय वाटत नाय?'

'पुन्ना पुन्ना तसं का म्हणतीस ग? मला राग येतो.'

ती दोघं शंकऱ्याच्या दारात आली. चार खणाच्या त्या घराला कुलूप होतं शंकऱ्या खोडकर नजरेनं शांतीकडं बघून हसत होता.

'का रं फसिवलंस? कुलूप हुतं तर घुलवून घुलवून मला हितपत्तूर का आणलंस?'

'गंमत दाखवायला.'

'खोटारडा - - -'

'थांब, इथंच. बघ तरी - - -'

त्यानं दाराची एक फळी नेटानं उचलून सरकवली आणि त्या फटीतून तो आत गेला. शांती अचंब्यानं बघत राहिली.

'हाय का नाय गंमत? - - - आत ये की.'

'नाय बाबा. भ्या वाटतंय मला.'

'घरात कसलं भ्या? - - - ये - - -ये तर येना!' त्यानं तिचं मनगट धरुन तिला आत घेतलं.

'घाण कसली रं सुटलीय?'

'ह्याच मालाची! दुसरी कसली सुटणार?'

चुलीवर पेटलेली चिमणी होती. मोठ्या बाटलीतून कपात दारु ओतून शंकऱ्या म्हणाला,

'बघ कशी हाय? - - - अं, हं, कप दिव्याजवळ नेऊ नको.'

'का बरं?'

'ह्यो आस्सल माल हाय. झटक्यासरशी पेट घेतो.'

'वळचणीच्या पाण्यावाणी तर दिसतंय.'

'हां ऽऽ - - - पण कडक एकदम - - - चव बघ की.'

'छट्! म्हणं चव बघ. वा ऽऽ रं'

'का ग?'

'मी नावं ठेवते म्हणून उलटा डोस देतोस काय रं?'

'तसं न्हवं. दारु कशी आसती, तिची वळख हुईल.'

'नको रं बाबा. दारुड्यावाणी मीबी लागंन झुलायला.'

'छट्! घोटभर घेतल्यानं नशा चढत नाय.'

'नकोच पण.'

'अॅ ऽ हॅऽ ऽ भागुबाई! - - - मी घिऊन दाखवू? - - - बघ, आऽग घोटभरानं काइच होत नाय. घे - - - मी घिऊन दावली ना - - - घे.'

'पण मला भ्या वाटतं रं.'

'मी हाय ना - - - धर - - -'

घाई घाईनं शांतीनं घोट घेतला. तिला ठसका लागला.

'वर बघ - - - आढ्याकडं बघ - - - हं. भ्या मनात घिऊन घावऱ्या घावऱ्या घेतलीस तू, म्हणून ठसकलीस.'

'व्याऽक! किती घाण रं. घशात जळाळतंय रं.'

'पापडी खातीस? गिऱ्हाईकासाठी आणून ठिवलीया.' पापडी खाण्यात ती दोघं दंग असतानाच बाहेरुन गिऱ्हाईकाची हाक आली. शंकऱ्या घावरा होऊन उभा राहिला. कावरा-बावरा झाला.

'शंकऱ्या हऽऽय - - - आरं घरात हाइस न्हवं?' असं म्हणत दोन गिऱ्हाईकं आत शिरली.

'गिऱ्हाईक हाय का - - - कोन? - - - कोन रं पोरगी हाय ही - - - ऑऽऽ? बरं, शंकऱ्या झटदिशी माल दे.'

'मागचं पैसं काढ आधी.'

'आरं होऽऽ! लई बेनवाड बनलाईसन.'

'हांऽऽ! नीट बोला सांगून ठेवतो - - -'

'हात्तीच्याऽऽ अगदी तीन कांड्यावरच आलास की आऽऽ? हं. घे बत्तीस रुपये मागचं नि आत्ताचं.'

'आठराशे सत्तावन सालचा भाव देता काय? - - - पंचेचाळीस कटेक्ट झालंय बील.'

'बरं बरं. मास्तरा, म्होरल्या यळंला चुकतं करीन. चल जल्दी.'

त्या दोन गिऱ्हाईकांचं पिणं-खाणं. पुन्हा शांती तिथंच भेदरुन उभी राहून बघत होती.

पापडी चघळत ते दोघेही उठले. त्यांचा तोल जात होता. तिच्याकडं बारीक डोळं करुन बघत त्यातला एकजण म्हणाला,

'लेका, शंकऱ्या हिच्या बरुबर संसार मांडून खेळत बसला हुतास काय रं? - - - टुमी दोघं शसॅर लई झॅक करॅल.'

'पैलं निघा बाहिर! रस्ता धरा - - - निघा, चला.'

शंकऱ्यानं जवळजवळ ढकलतच त्यांना बाहेर काढलं. खरोखर मेल्या कुत्र्यासारखं तो मागोमाग निघून गेलं; पण रस्त्यानं ते भेलकांडत पडत, बडबडत जात होते. शांतीच्या चेहऱ्यावर त्यांच्याबद्दल शिसारी भरुन राहिली होती.

'शंकऱ्या, किती घाण घाण बोलत हुते रं त्ये डोंबले! तू दाराला भाइरनं कुलुप का घालून ठेवलंस?'

'ती न्हेमीची आयडीया हाय. पोलिसांच्या बंदोबस्ताची.'

'मंजी रं?'

'आऽऽग, कायद्याच्या आडचणीनं कुलुपबंद घरावर छापा घालता येत नाय. धंदा तेजीत चालतो. आवशी बिनघोर—ऱ्हाता येतं.'

'मला नाय कळत.'

'तुला नाय कळणार. ह्या धंद्याची अजून तुला वळख नाय. पोलिसास्नी हाप्तं भराय लागत्याती. बाजारादिशी धंदा चौपट!'

'तू कायबी म्हण, पण शंकऱ्या मला नाय आसलं आवडत. आसल्या - - - आसल्या नवऱ्यासंगं मी लगीन नाय करणार.'

'कसल्या?'

'तुझ्यासारख्या! शाळा शिकत नाय. दारु इकतोस.'

'मला - - - मी - - - मला तू नवरा म्हणतीस - - -'

'ती माणसं म्हणली, - - - मी नाय - - - मला तू - - - तुझा धंदा नाय आवडत.'

'शांतु - - - मी कायमच ह्यो धंदा करणार नाय. मला शाळा शिकायचीय.'

'आसं नुसतं म्हन्नार तू - - - म्होरं इलाज चालत नाय म्हन्शील.'

'तसं खऽरंच नाय करणार - - - बघ शप्पत!'

'पैज!'

'हो, हो पैज.'

'काय पैज?'

'तूच सांग.'

'सांगू, त्या डब्यातली दारु वत जा- म्हाणीत.'

'पण - - - शांतु - - - बाजार मोडायचा टाईम झालाय. आता नागठाण्यावरनं गिऱ्हाईक धावत सुटलं - - - लाईन लागलं - - - आज भाऊसाहेबांचा हप्ता द्याचा हाय - - -'

'शंकऱ्या, तुला मघाची घोटभर चढलीया. काय बोलतूस त्ये कळतंय का तुला? - - - कळलं? - - - म्हणं पैज!'

शंकऱ्याचं ओठ निःशब्दपणे वेडंवाकडं हाललं. तसतरा जाऊन त्यानं डबा मोरीत ओतून दिला. आंबट उग्र वासाचा भपकारा घरभर पसरला. बाहेरच्या गटारात तो लोट रिचला गेला.

शंकऱ्याची नवी ओळख झाल्यासारखी शांती त्याच्याकडं कौतु-

कानं पाहत होती. तो ताठ मानेनं तिच्यापुढं उभा होता. कितीतरी वेळ ते दोघं आपली भाषा विसरुन निःशब्द उभे होते.

'शंकऱ्या, मी जाऊ?'

'मी पण येतो की, आता गिऱ्हाईकाचं झंगाट संपलयं.'

परड्यात येऊन त्यांनी वैरणीच्या ताटांच्या बंदुका, गाड्या आणि दिवे तयार करुन गंमत केली. शंकऱ्यानं हंडी, झुंबरं, हत्ती, नाग असे कितीतरी नवीन प्रकार शांतीला करुन दाखविले. तिला तो गोष्टीतल्या राजपुत्रासारखा गुणी वाटत होता.

'शंकऱ्या, तू उद्या माझ्यासंग शाळंत येशील?'

'अं? - - - उद्या? - - - उद्याच आलो आसतो; पण - - -'

'बघ, कसा हाइस! तू चालीं पालटतोस.'

'पालटत नाय ग, पण शाळंत जायाला पुस्तकं, वह्या पायजेत ना! मास्तर तरी नाव घातल्याबिगर शाळंत घील का?'

'हं, - - - पण मास्तरला सांगायला उद्या शाळंत तरी येशील ना?'

'हो तर! आपुन दोघं संगंच जाऊ की - - - मी दादास्नी - - -'

'शंकऱ्या ऽऽ'

शंकरवर दादाची झडप बसली. लांडग्याने कोकराला हिसडावं तसं झालं. शंकऱ्या बुक्क्याचा मार खात बापाबरोबर फरफटत गेला. शांती डोळ्यात पाणी आणून पाहत होती. कितीतरी वेळ शंकऱ्याच्या घरातून त्याला मारल्याचा आवाज येत होता. शांती त्या घराच्या कोपऱ्यावर उभी राहून उसासे टाकीत होती. तिला शंकऱ्याच्या बापाचा राग आला होता. शंकऱ्या किती चांगला होता. - - - हुशार पण - - - उद्या तो शाळेत येणार होता. त्या मनोराज्यातच ती आपल्या घराकडं वळली. तिच्या गालावरची आसवं सुकली होती. उद्याचं आठवून ती गालात हसत होती.

सकाळी नेहमीपेक्षा लवकरच शांती शाळेत निघाली. दगडी गचपान चढून ती शंकऱ्याच्या दारात आली.

'शंकऱ्या ऽऽ ए शंकर - - - शंकऱ्या ऽऽ!' हाका मारीत ती

मागीलदारी आली आणि तो दिसला. उकिरड्याजवळ तो उभा होता. त्याच्या डोळ्याजवळ माराची काळीनिळी जखम होती. पायावर माराचं वळ होतं. पाठीमागं हात घेऊन तो मेल्यानजरेनं तिच्याकडं पाहत होता.

'शंकऱ्या, काय रं ह्ये? तू कायबी तयारी केली न्हाइस. कवा–धरनं मी तुला हाका मारत फिरतीया. चल की आवर - - -'

त्यानं घट्ट ओठ मिटून पाठीमागचं हात पुढे घेतलं. - - -

उकिरड्यातून नुकत्याच काढलेल्या दारुच्या बाटल्या त्याच्या हातात होत्या नि डोळ्यात पाणी!

( साप्ताहिक सकाळ – २५ जून १९८८ )

# १. झुटींग

दाराची कडी वाजली. - - -

आणि गाढ झोपेतून वृंदा धडपडून उठली. उठताना भिंतीवर तोल गेला. सासरी असल्याची जाणीव होताच तिचा अवघडलेला देह नको तेवढ्या चलाखीनं दारापर्यंत गेला. दार उघडताच आत्याबाई ठसक्यात म्हणाल्या,

' कवाधरनं कडी वाजवायची ग? झॉप हाय का झोपचं सॉंग म्हणायचं तुझं! घरच्या लक्ष्मीला अशी अवखळ झॉप असू ने. '

' ऐकू आलं नाही आत्या. '

' किवंडीच हाइस. '

असं म्हणत आत्याबाईनी कोनाड्यातील ज्वारीची पाटी ओढून खाली ओतली.

' हं, ही बघ अडीशिरी हाय. आजच्याला एवढंच दळा. त्ये थोरलं म्हसरु उठलं न्हाय का अजून? '

' मी, जागीच हाय जी. '

मधल्या खोलीतून वृंदाच्या मोठ्या जावेचा आवाज आला. त्या बाजूस रागा-रागाने बघत आत्याबाई म्हणाल्या,

' मग सासूनं शिंग वाजवावं काय? मजी तू बाहीर येशील! '

गावंढळ अवतारातील थोरल्याबाई बाहेर आल्या आणि आत्याबाई तोंडातल्या तोंडात कुचकुचत, तरातरा जाऊन सोप्यातल्या माचावर जाऊन झोपल्या.

आपल्या थोरल्या जावेला जवळकीच्या सूरात वंदा हलक्यानं म्हणाली,

'आक्का, आज पंधरा दिवस झाले. मला हे काही सोसवत नाही. मी कधी जात्यावर दळले नाही हो!'

'त्ये कायबी असू. मला सांगून काय उपेग नाय आन् दुसऱ्याला सांगायची धडगत नाय. गुमान म्होरं ठेवल्याली तीं कामं करायची. दिवसात असलेल्या बाईनं जात्यावर दळलं मजी बाळतपण सोप्पं जातं आसं म्हन्त्यात आत्याबाई.'

'अग आईऽऽ ग! मला तर मरण आठवतंय वो. कसलं सोप्पं नि अवघड - - - मला यांनी इकडं पाठविली नसती तर - - -'

'कुणी? - - - गुलाबरावांनी? हुं! ते तर आईच्या अर्ध्या वचनातलं. ह्या घरात कुणाचा इलाज चालत नाय. ह्या घरात लेक दिली की, तिच्या बापानं खुशाल समजावं– फाळ चुलीत घातलीं. - - - राख होईसतवर तिथंच.'

'तुम्हाला हे सगळं कसं चालतं?'

'ना चालून जगायचं कसं? आई-बाच्या नावाला बट्टा लावायचा? - - - जवर हात चालंल तवर करायचं - - - चल् घे ते दळाप - - - साळुता कुठाय? - - - पोरांनी कसा क्योरवारा करुन ठेवलाय बघ जात्याभवती - - - घे झाडून - - - हं - - - हा. अंगाऽऽसी बस आता.'

दोघी दळू लागल्या. जात्याची घरघर सुरु झाली. वृंदाचं मन माहेरी माजघरातल्या दुलईवर डोकं टेकून पहाटेच्या साखर झोपेत आईचं गीत ऐकू लागलं. त्या गीतांच्या फेसाळ लाटांच्या उशीवर मन आनंदानं पहुडलं.

'पहिली माझी ओवी रामराजाला गाइली
सेवा तत्पर सीतामाई त्याच्या मागून पाहिली'

त्या प्रभू रामचंद्रावर आईची केवढी भक्ती! त्याच्या रुपाचं, त्याच्या महानतेचं वर्णन तिच्या शब्दाशब्दातून उचंबळत राहायचं.

'पहिल्या ओवीला आधी गाईला रामराजा
पंचवटीच्या सीतामाई अभंग चुडा तुझा'

बाईच्या जीवापेक्षा तिचं सौभाग्यच जपण्याची धडपड तिच्या

गीतातून ही चालायची. सौभाग्य जपायचं म्हणजे पुढल्या जन्माची तरतूद केल्याची भावना! वृंदाला मायेनं न्हाऊ-माखू घालताना ती कधीच सोमवारी घालायची नाही. जाणीवपूर्वक सोमवार टाळायची. विचारलं तर तिच्या ओव्या साक्षीदारासारख्या तत्परतेने पुढे यायच्या—

'सोमवारी न्हाली नार पाणी लागलं पिंडीला
कुण्या नारीला नाही बंधु गिरजा विचारी शंकराला.'

नाहीतर—

'सोमवारी नार न्हाली पाणी बेलाच्या झाडाला
कुण्या नारीला नाही पुत्र कोडं पडलं शंकराला'

देवाधर्माच्या गोष्टींचा तिच्यावर जबरदस्त प्रभाव. कसलीच शंका काढायची कुणाचीही आईसमोर बडगत नसायती. साऱ्या पुराण कथांचे संदर्भ ती जात्याच्या घरघरीत संगीतमय करायची,

'अंबिकेला गेली राजा भिमकाची बाळ
द्वारकेच्या नारायणा रथा चढूनी धाली माळ'

वाणी तर अशी चित्रवती की एकेका अलौकीक प्रसंगाचा सोहळा मनःचक्षूंना धन्य करायचा.

'गांजली दुरपती कृष्णदेवाला कळलं
पोथी ग वाचताना पान हातचं गळलं'

'का ग, जाऊबाई, ध्यान कुठंय तुझं? आज गुलाबराव येणार म्हणून सप्नात जाया लागलीस का?'

'छट्! काहीतरीच काय- - -'

'अग, तसं नव्हं. फिरत्या जात्याच्या पाळीवर बसलूया. तू कायबी बोलंनास. आसं मुकामूकाट्यानं जातं वढू नाय सवाष्णीनं. काय तरी ओवी गा की.'

'माझी चेष्टा करता की काय तुम्ही! आहो, मी कधी जातं ओढलं नव्हतं. ओवी गाणं तर दूरच. तुम्हाला सवय आहे. तुम्ही म्हणा मागून म्हणते— साथ देते.'

'म्हणले आसते ग. पण मला जी गीतं येत्याती—गाविशी वाटत्याती ती आत्याबाईस्नी ऐकवत न्हाइत.'

'अस्सं! का बरं?'

'माहेरच्या माणसावर गाईलेल्या ओव्या त्यास्नी कशा ऐकुशा वाटत्याल?'

'मग सासरच्या माणसावर गीत गा की.'

'तिथं का भाकरी थापायच्या हाईत? घेतला पीठाचा गोळा की थापला! ह्या घरातल्या हुबलाक माणसावर कुणाला गीत सुचंल का?'

'व्वा! बाईसाहेब, म्हणून का तुम्ही मला तोफेच्या तोंडी देता?'

'तसं नाय ग. तू नवी हाइस, पोटुशी हाइस. नव्यापणी नवऱ्याच्या मागं गेलीस. आता आठ-नऊ महिन्यांनी आलीस. नवंपण मोडलं नाय अजून तुझं. त्यात तुझं गीत खपून जाईल.'

'तेवढ्यासाठी मी गावं?'

'तसं नव्हं ग. तू गाईलस तर माझ्याबी जीवाला बरं वाटंल. मुकाट्यानं जातं वढलं आसं आत्याबाई म्हणणार न्हाइत.'

'म्हणजे आत्याबाई खूष होतील अशी गीतं तुम्ही आळेबळेच गाता तर - - -'

'आता गाशील की, माझाच पंचनामा मांडशील?'

हो ना करता वृंदा गायला तयार झाली. हलक्या सुरावटीत ती गाऊ लागली–

'उगवत्या सूर्यदेवा ऽऽ साऱ्या दुनियेचं बरं करं - - -'

थोरल्याबाईंनीं तिच्या सूरावर साथ केली. वृंदाने दुसऱ्या ओळीची तान घेतली–

'तान्हुली माझी बाळं त्याच्या मागून हाती धर'

त्याबरोबर थोरलीनं हातातला खुंटा सोडला, नि खोऽऽ खो हसायला सुरुवात केली. वृंदानं जातं थांबवलं. ती भांबावून थोरल्या बाईकडं पाहत राहिली. थोरली पोट धरुन हसतच राहिली. धाकटीनं ओवी गाईली. तिचं काय चुकलं? भाबडेपणानं ती आवाक् होऊन पहात होती. शेवटी आपलं हसू दाबून थोरलीबाई म्हणाली–

'खुळी काय ग तू? अजून तुझी कूसबी उजवली न्हाय नि तुझी तान्हुली बाळं देवाजीनं कुठं शोधावी ग?'

'जाऊ द्या हो, बाई! मला सुचलं ते म्हणलं नि - - -'

आता तिलाच जोराचं हसू आलं आणि त्या दोघी हसत सुटल्या. पहाटेच्या निरव शांततेत घुंगरु वाजल्याप्रमाणे तो आवाज निनादत होता नि धाडकन् जडशीळ दरवाजा उघडला. दारात आत्यावाई उभ्या होत्या!

हास्य लोपले. श्वास रोखले. जीव कानात गोळा झाले.

'काय दात काढाय घडलं? सासूची टिंगल टवाळी गमतीची वाटली? - - - करा निंदा सासूची नि हसा. मराठ्याच्या सुना तुम्ही. गोषातल्या वाया. खुशाल घोड्या खिकाळल्यावाणी हासताय. फाटंच्या रामपाऱ्यात गावाला म्हाजूर करताय तमाशा. गरती बाया आशा हासत्यात का? आईबानं माह्यारी हे शिकवलं व्हय?'

दोघी आचाऱ्या-विचाऱ्या होऊन चिडीचूप झालेल्या.

'माझ्या मराठमोळ्या घरात उंडग्या आवदसा शिरल्या. बघ रे देवा पांडुरंगा - - नवऱ्याच्या मागं आसा आबरुचा पंचनामा बघायला देवानं मला जित्ती ठेवलीया - - - आमच्या घरात आसला आगो-चरपणा नव्हता. - - - आजपतूर काय दिवस काढलं नि - - -'

आत्याबाई वडबडत पुन्हा सोप्यात झोपायला गेल्या, चोरट्या आवाजात वृंदाने थोरलीला विचारले,

'आई जेऊ देत नाही नि बाप भीक मागू देत नाही - - - असंच झालंय हे.'

'पण या घरात आई-बा दोन्ही आत्याबाईच! लई पावरबाज!'

'पण ही काय तऱ्हा झाली? गप्प राहू नये. माहेरचं गाऊ नये. सासरचं दावू नये. कष्ट तर करावेत. - - -'

'तुला खायाला लागतं नव्हं? - - - मग ऐक, या घरात घाम आणि आसवं गाळावी लागत्यात. घरच्या सुना हासल्या-खुलल्या की या घराचा पाया डळमळतो नि वासं फिरत्यात.'

'तुम्ही काय म्हणता ते मला कळत नाही; पण मला हे रोज रोज पहाटं दळण दळणं फार त्रासाचं होतंय हो. कधी पाठीत चमक भरतेय, कधी कमरेत लचक भरतेय, कधी कुशीत दुखतंय, तर कधी

छातीत कळ - - - इथं डॉक्टर - - -'

'अं हं ऽऽ हं! डाक्तरचं नाव काढायचं नाय. त्यो औशीद देऊन दुखणं वाढावतो नि माणसास्नी पैसं देऊन खेटं घालणं भाग पाडतो - - - - खरं नाय वाटत? - - - आत्याबाईच म्हन्त्यात! '

'पण मी कशी गप्प बसणार - - -'

'बघ बाई, आज पुण्यास्नं गुलाबराव आलं की सांगशीलबिंगशील. समदं पालथ्या घडयावर पाणी! फुकट शिव्या खाशील त्या मायलेकरांच्या. '

'देवा ऽऽ रे! मग - - - मी मरणार असल्या घोळात - - -' तिच्या कंठाशी हुंदका दाटला.

'एऽऽ गप्प! आसं डोळं गाळूने, भरल्या रामपाऱ्यात. उगी, आत्याबाई ऐकून येत्याली - - - वणवा पेटलं. उगी गप्प! - - - जा चूळ भरुन ये. उरल्यालं दळून घेऊ. ऊठ - - -'

कठपुतळीसारखी वृंदा उठली. चूळ भरुन जात्याच्या पाळीजवळ पाय पसरुन बसली. जात्याची घरघर सुरु झाली. जीवाच्या करारानं ती जातं ओढत होती. हत्तीच्या पायाला हरीण बांधून ओढावं तसंच चाललं होतं.

संध्याकाळी वृंदाचा पती पुण्याहून आला होता. विझत्या दिव्यात तेल ओतल्याप्रमाणे वृंदाचा चेहरा उजळला. सासूबाईंशी गप्पा मारणाऱ्या आपल्या पतीकडं ती भावभरल्या नजरेनं पाहू लागली; पण त्यानं तिची नजर चुकवली. तो आईकडं पाहून हसत हसत बोलत होता. ते बोलणें बळेबळेचं होतं. ते हसू खोटं खोटं होतं. किती केविलवाणा प्रयत्न तो करीत होता. त्याला आपल्या पत्नीकडं पाहून मोकळं हसण्याची हिंमत असू नये? याला आपण आपली व्यथा काय सांगणार? आणि त्याला कळणार तरी कशी? ती हताश झाली होती. खाल मानेनं कामास लागली होती.

रात्री पहिली पंगत नेहमीप्रमाणे पुरुषांची – तिचे चार दीर व नवरा. दुसरी मुलांची. तिसरी स्त्रियांची. जावाजावा चारजणी, पाचवी सासू. जेवणाच्या वेळीही एक अदृश्य, अनाम तणाव! स्त्री म्हणून

जन्माला येणं मोठं पापच असतं जणु– भाजी संपली होती. भात पुरेसा नव्हता. शिळ्यांना पुरवणी म्हणून काही ताज्या भाकरीही शिल्लक होत्या. सासूबाई सोडून सर्वांच्या ताटात शिळ्या भाकरी विभागल्या गेल्या. पातेल्यात रस्सा तेल-खोबऱ्याविणा तिखटपाणी उरवून होता. थंडगार जेवण. तणावपूर्ण वातावरण. घास बिनगोघाट पोटात ढकलले जात होते.

दोघी जावांनी भांडी घासून शेजारच्या खोलीत अंथरुणावर अंग टाकलं. थोरलीनं झाकपाक केली. वृंदानं झाडलोट केली. उकाडयानं जीव हैराण झाला होता. सारी मंडळी अंगणात झोपली होती. अंगणाच्या कोपऱ्याला वळचणीखाली थोरलीजवळ वृंदा झोपणार होती. वाकळ अंथरली होती. चिंध्याच्या जडशीळ उशा तीवर धोंडयासारख्या मांडल्या होत्या. पहाटेपासून शरीर आंबून गेलं होतं. केव्हा एकदा अंथरुणावर अंग टाकू असं वृंदाला झालं होतं. त्या दोघी अंगणात गेल्या; पण तेवढयात गावातला कोणी गडी माणूस आला नि नाकापर्यंत पदर ओढून त्या दोघी जावा मधल्या माळीत आल्या. वृंदाचा पती, सासू व तो माणूस गप्पात रंगले.

रात्र चढू लागली होती. थोरलीनं पोतं पसरुन त्यावर अंग टाकून दिलं. ती संथ लयीत घोरु लागली. वृंदा शेंगाच्या पोत्यावर बसून भिंतीला टेकली. तिचीही डुलकी लागत होती. अंग अवघडून गेलं होतं. आठवा महिना लागला होता. नववा महिना लागेपर्यंत तिला इथंच दिवस काढावे लागणार होते. इथं आल्यापासून पहाटेपासून मध्याह्म रात्रीपर्यंत तिला उसंत मिळत नेव्हती. जात्यावर दळणे तिला अधिकच त्रासाचे वाटत होते.

अचानक तिच्या ओटीपोटातून छातीकडं एक बारीक कळ सरकली ती सावरुन बसली. अंगणात हळुहळु गप्पा चालल्या होत्या. तिनं पोत्यावसूनच थोडं वाकून अंगणात पाहिलं आणि छातीत जोराने कळ आली. छातीवर हात ठेवून तिने असहाय्यपणे तोंड वासले नि नंतरच्या जीव पिळवटून टाकणाऱ्या कळीने तिने किंकाळी फोडली. काय झाले नि काय नाही, हे कळायच्या आत ती धरणीवर आडवी पडली. अंगणातील

माणसे घरात धावली. पळापळीत लहान मुले तुडवली गेली. एकच गोंगाट झाला. कोणी 'विंचूऽऽ' म्हणून तर कोणी 'साऽऽप! साऽऽप!' म्हणून आरोळ्या ठोकल्या. हलकल्लोळ उसळला. कोणीतरी पेठेत धावले. पिंपळांच्या पारावर गावटग्यांबरोबर गावगप्प मारीत बसणाऱ्या वृंदाच्या दीराला– शिवाप्पाला खबर पोचली. तो भुंग्यासारखा घराकडे धावला.

वाड्याच्या दरवाजातून दोन ढेंगातच शिवाप्पा घरात घुसला. धरणीवर आडव्या पडलेल्या वैनीकडं त्यानं पाहिलं. घराच्या वाशात खोवून ठेवलेला वेत त्यानं ओढला. वृंदाभोवती कोंडाळं करुन उभी राहिलेली माणसं बाजूला झाली.

'मला बघू द्या - - - हं - - - त्येच हाय!' शिवाप्पानं वृंदाभोवती वेतानं रिंगण काढलं.

'माझं पूजेचं साहित्य आणा. - - -'

आत्याबाईनं मधल्या बाईस खुणावलं. ती तत्परतेने आत गेली.

'गंपा, तू मागं जाऊन लिंबाचा ढाळा आण.' आत्याबाईंच्या सांगण्यावरुन गणपा झपाट्याने बाहेर गेला.

पाण्याचे एकदोन हाबके तोंडावर बसताच वृंदाने डोळे उघडले. तिच्या हातास धरुन शिवाप्पानं तिला बसती केली. तो मंत्र पुटपुटत होता. सर्वजण गंभीर झाले होते.

पितराचे दगड मांडले गेले. पाणी शिंपडून त्यावर गुलाल उधळला गेला. घरभर सुगंधी धूप पसरला. दोन लिंबे कापून ठेवली. एक अखंड लिंबू गुलालाने माखून ठेवले. सुया-बिबे मांडले गेले. उदबत्त्या पेटवल्या गेल्या. वृंदाला गुलाल लावला. ती सुन्न बसून होती. लिंबाच्या डहाळीने घरभर धूर पसरवत शिवाप्पा मोठ्याने मंत्र म्हणू लागला. सर्वांचे श्वास रोखले गेले. छातीतील ठोके वाढले. सुन्न बसलेल्या वृंदाकडे शिवाप्पा रोखून पाहू लागला. मंत्राचा वेग वाढला होता. अचानक त्याने मूठभर उडीद घेऊन तिच्या अंगावर मारले आणि तिची नजर आग ओकू लागली.

काल सकाळचाच तर प्रसंग. वृंदाने माहेरी लिहिलेले पत्र शिवा-

प्पा पोष्टात टाकून आला. आपल्या वैनीकडं तो जळजळीत नजरेनं पाहात होता. डोळ्यात रक्त उतरलं होतं. काय झालं होतं? आत्याबाईनी आपल्या लाडक्या लेकाला काही एकाचे दोन करुन सांगितले तर नव्हते?

'आईऽऽ ए, आईऽऽ'

'आल्ये रं बाबा, - - - बोल, बाळा.'

'काय बोलू? बोलायला काय बाकी ठेवलंय?'

'हे बघ, शिवाप्पा तू देवरुसपण शिकलास. मंत्र इद्या जाणतोस. काय वजा नि काय बाकी तुला कळत असून बी मला का इचारतोस? तुला समदं कळतंय. सासू-सासऱ्याची पुण्याई म्हणून तू माझ्या पोटाला आलास. दहा-पाच गावात तुझं नाव झालं. चौकडून माणूस उंबऱ्याला पाय लावाला येतंय. - - - मला आनंद हाय - - - पण सकाळपास्न माझ्या जीवाला चैन नाय-'

'का? काय झालं?'

'सपान पडलं!'

'कुणाला?'

'आता आणिक कुणाला - - - मलाच - - - ही बघ, मी बसली आश्शीच खांबाला पाठ टेकलेली, तेवढ्यात कोनाड्यातली उतरंड धाकल्या बाईनं पाडली. - - -'

'कधी?'

'आरं सप्नात! पाडली पण मधल्या बाईनं पळत जाऊन ती धरली. पडु दिली नाय. एवढंच सपानं; पण जीवाला चैन नाय. आता तुझ्या इद्येपर्मानं सपनाचा उलगडा सांग.'

'त्येचं काय सांगायचं? - - - समदं उघडच हाय की, आणि उलगडा कशाला?'

'तुझ्यावाणी मी इद्या नाय शिकले. मला नीट सांग पोरा.'

'आऽऽगं, आपल्या एकंती परपंचाची उतरंड धाकटीबाय तिच्या करणीनं पाडणार; पण मधली पडू देणार नाय. मधली लक्ष्मी हाय. आपल्या घराला ती यश देणार. धन देणार. लौकीक देणार. भरभराट

करणार.'

'व्हय रं, बावा व्हय! ती या घरात आल्यापास्न लक्ष्मीच आली-या. कायबी कमीं नाय; पण धाकटी पांढऱ्या पायाची. तिच्याच पाय-गुणानं मी आजारी पडले. मिरजंला न्यावं लागलं. दोन-चार हजाराला टोला बसला.'

'मग पटतंय ना? घर भरभराटीला जाया लागलं नि घरातल्या बायकांचं सुख दुखाय लागलं. बसली जागा त्येस्नी टोचाय लागली. गावोगाव नामना करायचा घाट घातलाय. घराण्याची आब्रू पावण्यापैत उघडी करायची हिंमत बांधलीया. सुशिक्षितपणा नडणार हाय.'

त्या वाक्याबरोबर वृंदाच्या तळपायापासून मस्तकापर्यंत मुंग्या आल्या. तिच्याशिवाय घरात कोणी स्त्री सुशिक्षित नाही. तिनेच तर पत्रातून माहेरी आपली त्रासदायक स्थिती कळविली. शिवाप्पाने पत्र फोडून वाचले होते. निश्चितच!

त्यानंतर मायलेकरांची तीन-चार वेळा कुजबुज झाली.

'नाय आद्दल घडवली तर नावाचा शिवाप्पा नाय. तू काळजी करु नकोस. बघतो मी - - - लवकरच'

वृंदानं स्वतः हे वाक्य ऐकलं होतं; पण कोणाबद्दल ते कळाले नव्हते. स्वतःबद्दल असेल याची खात्री नव्हती. 'मन चिंती ते वैरी न चिंती' म्हणून ती आपल्याच मनाला दटावत होती.

'बोऽऽल! - - - बोऽऽल तू कोण हाइस?'

वृंदा त्या शद्बांनी आपल्या स्मृतीतून जागी झाली. हातावर-पाया-वर-पाठीवर वेताचे फटके सपासप बसू लागले. असह्य - - - वेदनामय - - - जिव्हारी!

'मला मारु नका. हेऽऽ हे काय करताय तुम्ही? मला का मार-ताय?'

'तू कोण आहेस? बोल! - - - बोल!!'

सपासप छड्या लागत होत्या.

'तुम्ही छडी हातातून टाका. मी सांगते - - -'

'शिवाप्पा छडी टाक.' वृंदाचा नवरा कळवळून बोलला.

'तुला ह्यातलं कायबी कळत नाय. तू शांत रहा. वैनीला मार लागत नाय ह्यो. तिच्या अंगावरच्या झुटिंगाला लागतो. झाड अशा वक्ती कायबीं बोलंल - - - हं सांग.' वेताचा झमाझम आवाज.

'सांऽऽग - - - सांऽऽग!'

'सांगते. थांबा.'

असे ऐकूनही तो छडया सपासप मारतच होता. आत्याबाई शिवाप्पाच्या कानाला लागल्या,

'शिवाप्पा, जरा जपून रं बाबा. अवघड जागी मारशील. पोटुशी हाय ती.'

'तू काळजी करु नकोस. मी ह्येला बरावर वळखळंय. झाड बोलतं होत नाय तवर मला उडीद मारावं लागार. वेत हाणावा लागणार - - - बोऽऽलं कोण तू?'

'मी - - - मी तुमची भावजय वृंदा - - - मला काहीही झालं नाही.'

'आरं व्वा! तू झाडात संचार केलायस. तू तिकाटण्यावरचं झुटिंग हाइस. झाडाचं हाल करायसाठी तू खोटं बोलतुस; पण मी तुला झाड सोडून जायाला लावीन. - - - चल बोल!'

'हे पहा मला भूतबाधा झालेली नाही. तुम्ही काय बोलताय ते मला समजतेय. वेताचा मार मला लागतोय. मला सोसत नाही.'

'आवाज बंऽऽद! झाडाचं हाल करण्यासाठी तू मला असा तिढा टाकतोस. काय हरकत नाय. तू झाड सोडून जाईसतवर मला हे करावं लागणार. ठीक हाय. जा तू.'

शिवाप्पानं पुन्हा वृंदाच्या तोंडावर पाण्याचे हाबके मारले. लिंबू उचलून तोंडाजवळ धरुन मंत्र पुटपुटला आणि ते वृंदाच्या पदराच्या टोकाला बांधले.

'वैनी, उठा. आत जा. आई, आता वारं तात्पुरतं गेलंय.'

वृंदा, आपले अवघडलेले शरीर सावरुन उठली. साडीचा पदर सारखा करुन ती आत गेली. थोरलीच्या कुशीत शिरुन ती हमसून हमसून रडू लागली. थोरली तिच्या पाठीवरुन मुकाटयाने हात फिरवत

होती. तिचा मूक आक्रोश तिला जणु पाठीतून ऐकू येत होता.

शिवाप्पा आत आला. त्याने डोळे वटारुन थोरलीकडं पाहिले. आणि आईपुढे जाऊन तो मोठ्याने म्हणाला,

'लागीर आपली समद्यांची फसवणूक करतंय. चकवा देतंय. झाडाला चांगल्या माणसावाणी बोलाय लावतंय; पण झाडाला कुणी जवळ घेऊ नका; नाहीतर जवळ घेणाराच्या शरीरात झुटींगाचा संचार होईल. ते लई जड जाईल.'

इतका वेळ संभ्रमीत झालेला, अर्धमेला झालेला वृंदाचा नवरा ते ऐकून नखशिखांत थरकून गेला. उभा राहिलेली जागा सोडून तो दूर जाऊन उभा राहिला. आता थोरलीपण धाकटीपासून सुटका करुन घेऊन चुलीजवळ जाऊन बसली होती. आता तिच्याकडं पाहणाऱ्यांची दृष्टीच बदलली होती. एखाद्या हिंस्त्र प्राण्याकडे पहावे तसे प्रत्येकजण दुरुनच तिच्याकडे निशद्बपणे पहात होता; पण आता विचार करण्याची शक्तीही तिच्यात नव्हती. पोत्यावर तिने अंग टाकले. तिला ग्लानी आली आणि सर्वजण तिला तशीच टाकून आपापल्या सुरक्षित जागी जाऊन झोपी गेले.

वृंदाच्या नवऱ्याची कितीतरी वेळ झोप लागली नव्हती. बाल-पणापासून त्याने भूत-लागीराचे प्रकार त्या आपल्या छोट्या गावात पाहिले होते. पुण्याला शिकायला गेल्यानंतर तो ते विसरला. गावाशी संबंधही पाहुण्यासारखा येऊ लागला होता; पण आता हे फार भयानक झालं. प्रत्यक्ष वृंदा! त्याची बायकोच तिकाटण्यावरच्या झुटींगानं झपा-टली होती. तो मनातून उन्मळला होता. त्यांच्या लग्नालाच घरच्यांचा विरोध होता. तिला पटवून घेण्याची दयाबुद्धी आईकडे नव्हती. म्हणून मुद्दामच त्याने पंधरा दिवस वृंदाला एकटीलाच गावी पाठवले. 'ताण-तणाव कमी व्हावा. मने निवळावीत.' असा त्याचा उद्देश होता; पण हे असं घडलं. आई म्हणते तेच खरं - - - या खेड्यातल्या लोकांना कुणाचं चांगलं झालेलं बघवत नाही. मग देव घाल, भानामती कर, झुटिंग बसव असले प्रकार करतात. आपलंही सुखं कुणाला पाहावलं नसेल. कितीतरी वेळ तो या कुशीवरुन त्या कुशीवर होत होता.

तशी शिवाप्पालाही झोप नव्हती. तो स्वतःवरच बेहद्द खूष होता. वृंदा ही त्याची नवी वहिनी. शिकलेली. आजवर त्या घरात कुणी शिकलेली बाई नांदायला आली नव्हती. बायकाची अक्कल चटणी-मिठापुरतीच; पण त्याच्या या वैनीनं घरात नवंच वारं आणलं. गडी माणसासमोर पेपर वाचू बघायची; पण सासू हुशार. तिला तिथल्या तिथंच दटवायची. चारजणी घरी येऊन बसल्या की, ही वैनी हुशारीनं बोलायची. खेड्यातल्या अडाणीपणाच्या गोष्टींवर बोलायची. आया-बायांना पटायचं. आता ही वरचढ होईल. डोईजड होईल. जड जाईल. आपल्यासारख्याला तर लई जपून रहायला पाहिजे. तिच्या अशा विचारानं शिवाप्पा धास्तावला. तो देवरुसपण करायचा. गंडेदोरे द्यायचा. खेड्यातील श्रद्धाळू लोकांचा विश्वास बसायचा. भूत–पिशाच्च, करणी–भानामती, यासारख्या गोष्टींबद्दल शिवाप्पा आपला दबदबा निर्माण करुन होता. अडाणी लोकांकडून पैसा मिळत होता. दिवसभर गावभर फिरणें. देवरुसपणावर बक्कळ पैसा मिळवणे. घरच्या बाया-माणसांना दम देणे यात त्याचं आयुष्य सुखानं चाललं होतं; पण ही वृंदा वैनी आली. त्याच्या धंद्यावर जणु आफत आली.

शिवाप्पाचा देवरुसकीचा धंदा म्हणजे काचेच भांडं. एकदा विश्वासाला तडा गेला की, संपलं. आजपर्यंत त्याला त्याची फिकीर वाटली नाही; पण नवीं वैनी आली नि तो अस्वस्थ झाला. तिच्या प्रत्येक गोष्टीकडे त्याचं लक्ष असं. त्याच इराद्यानं त्यानं तिच्या माहेरला पाठवायचं पत्र फोडलं. त्यातील मजकूर वाचून त्याचं मस्तक गरगरलं. त्यात खोटं काहीच नव्हतं; पण जे खरं असूनही लिहू नये तेच तिनं केलं होतं. 'सासरी पहाटेपासून कामाच्या रगाड्यात असते. पहाटे जात्यावर दळावे लागते. तो त्रास सोसवत नाही. देवरुसपणाचा फसवा धंदा घरात राजरोस चालतो. लोक असंस्कृत वाटतात. सासूबाई लग्नातील उणी-दुरी काढून टोचून बोलतात.' वगैरे मजकुर त्यात होता. तसं हिला तिथं कायमचं रहायचं नव्हतं. महिना दोन महिने गावी आल्यानंतर काम करण्यात कसला आला आहे त्रास? - - - पण सुशिक्षितपणाची ऐटच रक्तात. तिच्या त्या पत्रामुळे शिवाप्पाच्या आईवर रोष

येणार होता. तो व त्याचा धंदा बदनाम होणार होता आणि हेच त्याला सहन करणे शक्य नव्हते. या घमेंडखोर वैनीला आपण लवकर हिसका दाखवू असा त्याने मनोमन निश्चय केला. त्याच्या विचाराशी त्याची आई सहमत होती. प्रश्न फक्त संधीचा होता. तशी संधी तो निर्माण करणार होता.

आणि आयती संधी चालून आली. वृंदाच्या नवऱ्याचे भय त्याला नव्हतेच. तो शामळू स्वभावाचा व आईचा शब्द न ओलांडणारा. त्याला फिरवायला वेळ लागणार नव्हता. वृंदाला वेताने मारताना तिचा नवराच घायाळ झाला; पण शिवाप्पाच्या सांगण्यावरुन तो एकदम थंड पडला. शिवाप्पा त्याला 'बामणी शिकारी' म्हणायचा, ते खरं होतं. आता कोणाचीच मात्रा शिवाप्पापुढं चालणार नव्हती. 'झुटींगाच्या' नावाखाली तो वैनीवर पुरता सूड उगवणार होता. तिच्यासाठी त्याच्या भावानं मामाची पोरगी नाकारली. पैसेवाली स्थळं नाकारली. आईला दुःखी केलं. ही सुशिक्षित वहिनी आपल्याच तोऱ्यात. दीर-भाऊ म्हणून मर्यादा पाळत नव्हती. चार पुस्तक शिकलेल्या शिवाप्पाला तो मोठा अपमान वाटे.

बाईच्या जातीनं आपल्या पायरीनं असावं. पायरी सोडून वागणाऱ्या वैनीला झुटींगाच्या नावाखाली पुरतं झोडपून काढायचं ती पोटुशी म्हणून आई घाबरते; पण काही होत नाय! या शिकलेल्या वायकांचे नखरे कळायचे नाहीत. तशी दुनिया आंधळीच. दिसतं तसं नसतं म्हणूनच जग फसतं. आता या शिवाप्पाचचं पहा. देवरुसपणाची विद्या वगैरे काही प्रकार नसतो. जादूगारासारखं लोकांना आपल्याकडं आकर्षित करायचे. मंत्रोच्चार करायचे. लिंबू, गुलाल पाहून बोबडी वळणारी माणसं! त्यांना आणखी काही भयावह सजावट दिसली की, ते मनातून गारद! त्यापुढील भाग फारसा अवघड नसतो. जी व्यक्ती आजारी ती मनानेच आजारी असते. क्वचित शरीर पीडा असते; पण आपण म्हणायचं 'लागीर! झपाटलंय. त्याच्या तावडीतून सुटका अवघड.' की पूजेच्या नावाखाली भरपूर पैसा मिळतो. तेथे शंका नाही. घासाघीस नाही. विना तक्रार. बिनबोभाट. सारं मनासारखं घडवता येतं. 'वैनी' आपल्या पेचात आलीय. तिच्या बापाकडून पैसा उकळ-

ण्याची हीच नामी संधी. शिवाय वैनी-भाऊ आयुष्यभर आपल्या उप–काराच्या ओझ्याखाली राहतील. आपण धाकटे असूनही सारे घरदार आपल्या हुकमतीत राहील. अशी सुखस्वप्नाची गूलाबी दुलई उलगडत शिवाप्पा मध्याह्न रात्रीपर्यंत जागा होता.

झुंजूमुंजू झालं. थोरली मधली उठली. त्यांच्या चाहुलीनं वृंदा उठून बसू लागली; पण तिला उठता येईना. सारं अंग ठणकत होतं. ओटीपोटातून असह्य कळा येत होत्या. रात्रीचा प्रकार आठवून तिचे डोळे भरुन आले. झाडलोट करीत असलेली थोरली केरसुनी हातात घेऊन तिच्याकडे दुरुनच पाहत राहिली. मधलीसुद्धा तेथे येऊन उभी राहिली. वृंदाच्या जवळ जाण्याचं धाडस त्यांच्यात नव्हतं. त्यांच्या त्या भित्रट थिजल्या नजरेला नजर देत वृंदा म्हणाली,

'तुम्ही विश्वास ठेवा अगर ठेवू नका; पण तो झुटींग म्हणतात तो काही मला लागलेला नाही. मी तुमच्यासारखीच ठीक आहे. माझ्याजवळ या. अशा दुरुन काय पाहता? माझ्या पोटातून असह्य कळा येतायत. '

'नाय बाय! आमाला त्यातलं काय कळत नाय. तू रात्री वरडलीस. धाकट्या रावसायबांनी मंत्र-तंत्र केल्यावर तू सुद्धीवर आलीस. आमी डोळ्यानं पाहिलंय. शिवाय तुझ्याजवळ येण्यात आमाला धोका हाय. '

'रात्री माझ्या छातीतून कळ आली म्हणून मी ओरडले हे खरं. थोडावेळ वेदनेनं मी गप्प झाले होते. हे पण खर आहे; पण बाकी सारं खोटं. मी भूताचं झाडंबीड काही नाही. मला तसलं काहीही झालं नव्हतं. तुम्ही तरी विश्वास ठेवा. त्या मारानं मात्र मला फार त्रास सुरु झालाय. पोटात दुखतंय माझ्या. माझ्या माहेरच्यांना बोलवा. विश्वास ठेवा. '

'आमी विश्वास ठेवून काय करु? घरच्या माणसांचं ऐकायला होवं. '

'मी पण घरचंच माणूस ना! - - - थोरल्याबाई, विश्वास ठेवा माझ्यावर - - - रात्रीचा प्रकार पुन्हा होऊ देऊ नका - - - माहेरच्यांना बोलवा. त्यांना सांगेन मी. - - - नाहीतर यातच मला मरण येईल.

हो - - - मी - - - मी तुमची बहिण - - - यात मी मरुन जाईन - - -'

ती गदगदून रडू लागली. थोरलीच्या नि मधलीच्या डोळ्यातही पाणी उभं राहिलं. काही का असेना सासूबाई,पुरुष माणसं बघून घेतील. कानावर तरी घालावं म्हणून त्यांनी झाला प्रकार सासूबाईंच्या काना–वर घातला.

शिवाप्पाला आई जागे करीत होती.

'आरं, ए, बाबा, ऊठ! ऊठ, जागा हो. सारं इपरीतच हुया लागलंय. धाकटी बाय कायबाय म्हणतीय बघ.'

'उंऽऽअंऽऽ कोऽऽण? आई, तू? का आलीस ग?'

'आरं, आता बिलामत हुया बघतीया.'

'कसंली?'

'तुझी धाकटी वैनी रं. कायबाय बडबडतीया. मला कायबी झालं नाय म्हणतींया. म्हयेराला पाठवा नायतर तिकडचं कुणी बोलवा म्हणतीया. - - - आता रं?'

'तिच्या म्हायेरची येऊ दे की कुणीबी बाजीराव - - - आप–ल्याला का भ्याचं कारण पडलंय?'

'आरं, ती शिकल्याली माणसं. कोरट-कचेऱ्या हिंडलेली. 'पुलीस कायदा' दावणारीं माणसं. काय का बाय होऊन आलं गळ्याशी तऽर - - - ?'

'काय होत नाय. तू गुमान र्‍हा.'

'नाय बाबा, शिवाप्पा, मला काय चिन्न बरं दिसंना बघ. तिच्या पोटातबी दुखू लागलंय - - -'

'ऑऽऽ - - - ? - - - बरं, मग इकडं ये. ऐक, तिच्या म्हाये-रची कुणी आलीच, काय म्हणू लागलीच तर त्यास्नी म्हणायचं, तुमची लेक झुटींगाने झपाटली हुती. सारा बंदोबस्त मी केला म्हणून ती वाच-ली. आता कसलाच धोका नाय.'

'आरं, पर तिला काइच झालं नसताना तिला मारलंच कसं आसं म्हणल्यावर काय?'

'- - - मग म्हणायचं तुमची पोरगी ढोंग करणारी नि घरादारा-

च्या गळ्याशी आणणारी ढालगज भवानी हाय. आमी तिला शॅप नांदविणार नाय. घिऊन जा आपल्या लाडक्या लेकींला - - - हिच्या भऽन बिन कामाचं झंगाट केलंया नि तू मला भ्या दावतीयास.'

'आता झंगाट कुणी केलं? तू का मी? तूच तर म्हणलास हिसका दावतो म्हणून - - -'

'बरं ते कायबी असू दे. कसं बी बोलू दे. आपल्या आंगी लागून घ्याचं नाय. संमदा दोष तिच्यावर टाकायचा. तिच्या नवऱ्याला मी सांगतोच - - - पण आई, तिच्या पोटच्याचं काय हुणार नाय नव्हं?'

'त्योच तर फास बसल्यावाणी झालंय - - - काय करायचं देवा - - - तरी मी तुला सांगत हुते. बाई आवघाडली-सवघाडली हाय मारताना जपून मार. - - -'

'तिच्या आयची बिलामत तिच्याऽऽ शेवटाला संमदी मलाच फासावर चढवून डोळं गाळणारं आसं दिसतंय.'

'डोस्क्यात राख नको घालूस. एक इगत हाय बघ. कराडला जा. चांगला डाक्तर घरी आण. झालं बेस तर झालं. नायतर डाक्तरला पैसे दिऊन गप करु. - - -'

'त्ये झालं ग, पर साऱ्या गावाच्या डोळ्यावर माझा धंदा आलाय. काही जणांणी बक्कळ पैसा दिऊनबी गुण आला नाय. ती माणसं दात खाऊन हाइत. कालचा दंगा साऱ्या गावाला ठावं झालाय. म्हणलं ह्याचा गावावर वचक बसलं; पण आता काय कमी जास्त झालं तर साऱ्या गावाचं त्वांड कसं गप करणार?'

'आता ते मी काय सांगू? तुझी इद्या काय मला कळत हुती का?'

'तूच शिकवलीस ती इद्या! माझी कसली आलीया दुसरीं इद्या. माझं डोस्कं तू आणखीं खवळू नगस.'

तेवढ्यात मधली धावत आली. धावऱ्या धावऱ्या म्हणाली,

'आत्यावाई, चला, चला. धाकटी डोळं पांढरं करतीया. कस–नुसं कराया लागलीया. चला.'

ते ऐकून आत्यावाई गळा काढून गडगडा लोळू लागल्या. म्हणू

लागल्या,

" शिवाप्पा ऽऽ रे, आता हे झुटींग काय आपल्याला सोडणार नाय रंऽऽऽ------ "

# १०. वांझ मरण

दर शनिवारी सुला साताऱ्यास्न याची. ती येणार म्हणून माझ्या अंगात बळ याचं. आळूस पळून जायाचा कुठल्या कुठं. सुला काइ माझ्या रक्ताची नव्हती. पोटपाणी न्हाइ पिकलं माझं. झालंच तसं, मी शानी हुयाच्या आधीच माझं कपाळ पांढरं झालं. दिसाला खडं मारण्यात तरुणपण खपीवलं. सुला माझ्या पुतणीची पोरगी. सवा वर्साची हुती तवापास्नं माझ्याजवळ ऱ्हायली. तिच्या आईला दुखणं लागलं. दवा-पाणी करायला नवऱ्यानं ममईला न्हेली. तान्ही सुला माझ्याकडं ऱ्हायली. ती माझीच झाली. म्होरं तिच्या आईला पाठूपाठ दोघं पोरगं झालं; पण सुलाला माझा लळा लागला नि रापीटोपी दोन पोरं म्हणून न्हाइच आई-बानं सुलाला लगोलग न्हेलं; पण तीबी बाजिंदी, आई-बाला वळख देईना झाली. मी म्हणलं ऱ्हाऊ द्या सुला माझ्याजवळ. मलाबी तेवडाच इरंगुळा वाटल. त्या उभयतानीबी माझं मन मोडलं न्हाइ. सुला माझ्याजवळ ऱ्हायली नि माझं वांझंचं घर वटक्या झाडाला पालवी फुटल्यासारखं टवटवीत झालं.

सुलाच्या संगतीनं शेजारच्या पोरीबाळी माझ्या पडवीत खेळू लागल्या. वसाडीत केळबाग माजल्यावाणीच झालं. मला सुलाचं अप्रूप वाटू लागलं. ती जरा ती जरा डोळ्याआड झाली तर माझं काळीज खालीवर हुयाचं. त्या आधी मी देवाधर्मात जीव गुतवला हुता; पण सुला आल्यापास्न देवाचाबी मला इसर पडू लागला. तिच्या बोबड्या बोलण्यात माझा जीव खुळावून गेला. बिन वेणाचं बिन पान्ह्याचं मला आईपण मिळालं नि कळालंपण. सुला बाळसंदार हुती. तिचा बांधसूदपणा नजरंत भरायचा. मोठ्यापाणी चांगली दणक्याबाई व्हणार आसं चिन्हं हुतं.

त्या बाळमूर्तीनं माझ्या मावळतीच्या दिसात माझ्यावर म्हवनी घातली.

माझ्या सासू-सासऱ्याचा जमीनजुमला रग्गड हुता. मी नुसत्या देखरेखीवर हुते. धान्याची विक्री हुयाची. दर सुगीला बँकेत एका मुठीनं रक्कम पडायची. दुष्काळातसुद्धा डगमग होत नव्हती. माझ्या येकलीला कितीसा खर्च लागणार? त्यात सुलाला ठेवून घेतली. ती पाच वर्साची झाल्यावर तिला ममईला शाळंला नेण्याबद्दल तिच्या बाचा कागूद आला. नि पायाखालची भूई फाटल्यावाणी मी खुळीबावरी झाले. सुलाला पोटाशी धरुन आसवास्नी वाट दिली. पोरगी मी रडल्याली वघून रडायला लागली; पण मलाच रडूं आवरत नव्हतं. माझं काळीज कुणीतरी कापून नेणार आसंच वाटतं हुतं. आईपण किती चांगलं नि किती वंगाळ? हातपाय गळून गेलं. त्या दिशी जेवले नाय. सुलाला पोटाशी धरुन रात माशावाणी तरमळून काढली. खुळ्यावाणी कायबी मनात येऊ लागलं. घरदार, जमीन-जुमला इकावा नि सुलाला घेऊन परमुलखाला पळून जावं. तिच्या आई-बापाला काइ पत्ताच लागू देऊ नाय; पण शांतपणानं केला इचार. काय तरी म्हणलं आपली इपरीत बुद्धी. सुलाचा बाप हुशार माणूस. कुठं भागीनगरात गेलं तरी काढीलं मला हुडकून. मग काय पत ऱ्हाइल आपली? त्येच्यापरता 'दादाआप्पा' करुन आपल्या जीवाची हालत त्येस्नीच सांगावी. सुलाला तिच्या लग्नापातूर माझ्याजवळ राहू द्या. शाळा शिकू द्या म्हणायचं. त्येस्नीच पाझर फुटंल. पावणा आब राखणारा हुता. बोलण्या-वागण्याला आदबशीर हुता. घेईल म्हणलं समजुतीनं.

झालंबी तसंच. आलं सुलाचं दादा. माझ्या डोळ्याचं झरं झालं. दोनं-चार शद्वात मी माझं म्हणणं मांडलं. सारं मन काइ उलगडून सांगता आलं नाय; पण पावण्यानं घेतलं जाणून 'ऱ्हाऊ द्या' म्हणलं सुलाला. माझ्या म्होरं चार-पाच शंभराच्या नोटा धरल्या. तशी मी सरले मागं म्हणलं, 'सुला मला जड नाय. पैशासाठी संबाळली नाय. काळीज गुतत गेलं. मूळं काळजाला भिडली म्हणून तर देवावाणी तुमाला साकडं घातलं. नि तुमी पैसं म्होरं धरुन परक्षा घेता काय?' मग वरमलं मनात. जातायेळी पोरीसाठी उदास झालं हुतं. त्येंची रक्ताची माया

हुती; पण मला माझ्या गुतल्या जीवाचं कोडं सुटत नव्हतं. मी माझ्या मनाला सांगितलं, सुला आपली मागल्या जन्मातली लेक हाय. माझं मन दुथडचा नदीवाणी भरुन वाहू लागलं. सुलाला कुरवाळून मुकं घेण्यात येळंचं भान न्हाइनासं झालं.

सुला शाळंत जात हुती. वाढत हुती. बघता बघता पोर पातळ नेसू लागली. उफाडचाचं तिचं आंग भलतंच बांदसूद दिसू लागलं. माझं सारं लक्ष तिच्यावर असायचं. तिचा पण माझ्यावर भारी जीव. तिला आई-बापाचंबी येवढं काइ वाटायचं नाय. ममईला सुटीत जा म्हणलं तर मला संगं नेण्यासाठीच हाटून बसायची. मला सोडून कधी ती ममईल गेली नाय. आपल्या आई-बापाच्या घरी ती पावण्यावाणी वागायची. बुजल्यावाणी जुजबी बोलायची. तिथंबी तिचं हिंडणं-फिरणं, खाणं-पिणं, झोपणं सारं माझ्या संग असायचं. तिच्या आई-बापाला आक्रित वाटायचं. दोघं लहानगं भाऊ टवकारुन बघायचं. येवढं करुनबी तिचं भागायचं नाय. परत गावाकडं चलण्याची तिचीच घाई चालायची. सई तिची आई नावालाच. मनातलं सारं ती माझ्याम्होरं बोलून टाकायची. तिच्या मनानं मीच तिची आई हुते. तिला जपता जपता मी मलाबी जपू लागले. वाटायचं माझं काइ वाइट-वंगाळ झालं तर माझी सुला मनच्या गोस्टी कुणाला बोलून दावील? आई-बापाजवळ न्हाइल! पण मनात झुरंल. मना इरुद काइ झालं तर झुरुन मरंल. म्हणून तिचं लगीन होइस्तवर मला जगलं पायजे. त्यासाठी मी मलाबी जपत हुते.

सुला मेट्रीक झाल्यावर कालेज शिकायला सातारला जाणार म्हणू लागली. तिच्या आई-बापाचंबी तसंच मत हुतं. माझं मातर काळीज आतल्या आत तुटत हुतं. माझ्या बोलण्यातून सुलाच्या लक्षात आलं. ती जरा मला तोडूनच बोलली. मी गपच झाल्ये. मग माझी समजूत घालू लागली. तसं मला ती नांदायला निघाल्यावाणी रडू आलं. ती माझी माया जाणून हुती. म्हणली आठवडचाला तुला भेटून जाईन. तेवढंच बरं वाटलं जीवाला. ती जाताना मनाला आवर घातला; पण ती डोळचाआड झाली नि मोकळचा घरात मोकळचापणानं रडून घेतलं. त्या दिसापास्न शनवारची वाट बघायचा मनाला चाळाच जडला.

आठवड्याला ठरल्यापर्मानं सुला येत हुती.. परक्षा-बरक्षा आली की एखादा शनवार चुकायचा. मग आठवडाभर माझ्या जीवाची दैना उडायची. आता शहरचं वारं लागलं हुतं. तिच्या राहणीमानात लांब फरक पडला हुता. सुला दिसली की मनात खळबळ हुयाची. कुणाचंबी चित्त चळण्यासारखा तिचा रुबाब असायचा. अशीच दोन वर्स भिरभिरत गेली.

सुटीत आली की सुला लईच लाडात आल्यावाणीं करायची. मला वाटायचं माझ्यापास्न लांब ऱ्हातीया. आल्यावर माझी माया पांघरुन पडावं वाटतं आसंल माझ्या बाईला. कुशीत शिरुन म्हणायची,

'आता थोडं दिवस ऱ्हायलेत. लगीन झालं की जाईन मी. म्हणून मी तुझी माया अशी पांघरुन घेत्ये.'

माझ्या काळजात कालवाकालव हुयाची. सुरकतल्यालं हात थर-थरत तिच्या साऱ्या अंगाव्रनं मायेनं फिरायचं. वाटायचं माझ्या काळजा-तला ह्यो ठेवा कुणाच्या पदरात पडंल त्यो नशीबवान आसंल; पण ही नांदायला गेल्यावर, आपुन काइ लई दिस तग धरणार नाय.

एका सुटीत सुला जरा जादाच खुशीत हुती. सारं वडाबडा बोलून टाकायचा तिचा सोभाव माझ्या माहितीचा हुता; पण त्या दिसी रात-ची जेवणं झाल्यावर सुला हातरुणावर पडल्या पडल्या माझं हात-पाय चेपू लागली. म्हणलं,

'का ग आज आजीचा लई लाड आला काय?' तर हळूहळु हासत ऱ्हायली. तिला कायतरी बोलायचं हुतं; पण दुसरंच कायतरी बोलून ती घुटमळत होती. मी म्हणलं,

'काय सांगायचं ते सपस्ट सांग. माझी शपथ हाय.' तर म्हणली,

'तू रागाला आलीस तर मी जीव ठेवायची नाय.' माझं काळी-जच हाललं. म्हणलं,

'आसं काय हाय त्ये तरी सांग. मी नाय रागाला येणार. तुझ्या-साठी जीव गहाण ठेवीन.' तर आडपडद्यानंच माझ्या कानावर घातलं की,

'कोणसं पोरगं हाय. त्येच्यावर जीव जडलाय.' माझं काळीज

लागलं धडकायला. सुलाचं आई-बाप डोळ्याम्होरं उभं ऱ्हायलं. म्हणलं काय पोरीनं खूळं घेतलं ह्ये; पण म्हणलं सारं इचारुन तरी घ्यावं. इचारलं,

'पोरगं कंच्या जातीचं?'

'आपल्याच. आपल्यापैकीच कुळी.'

मग आला जरा जीवात जीव. नाव-गाव इचारुन घेतलं. आमच्या येळंला नव्हतं आसं काय. न कळत्या वयातच आई-बाप लग्न उरकायचे. आता शिक्षणासंग आसल्या गोष्टींचं लई पिक पिकायला लागलंय. पोरं आपल्या आपल्यात लगीन जमीवत्याती. घरच्यांनी आडीवलं तर पळून जाऊन लगीन करत्यात; नाय तर जीव देत्याती. सुला कुण्या वसंतावर जीव लावून बसली हुती. तसं जगाआगळं काइ नव्हतं; पण पोरा–पोरीच्या वळखीचा काय भरवसा म्हणलं. सुलाला म्हणलं,

'त्यो कोण वसंता हाय त्येला पुन्ना येशील तवा संग घेऊन ये.'

वसंताला संग घेऊन सुला आली. पोऱ्या चांगला धट हुता. लाजरा-बुजरा नव्हता. बोलघेवडा हुता. पयल्या भेटीत काय गवसतं म्हणा; पण त्येचा बोलका सोभाव मला बरा वाटला. एकमेकावर जीव टाकणारी तरणी पोरं वंगाळ आसतील कशी? बुक शिकून शानी झाल्याती. सुला तशी पारख करण्यात फसणार नाय. जीव लावण्याजोगं काइतरी असल्याशिवाय का तिनं जीव लावलाय? पयल्या भेटीतच वसंताकडं माझंबी मन झुकलं. माझ्या सुलावाणीच त्योबी वाटला. मी त्येला सारं समजून सांगितलं. हासत हासत त्यो ऐकून घ्याचा. दोन दिवस दोघं आनंदात ऱ्हायली. जाताना जोडीनं गेली. त्याला 'येत जा' म्हणलं. त्योबी 'वरं' म्हणला. ती दोघं गेल्यावर शेजारच्या आयाबा–यांनी चौकशी केली. मी म्हणलं,

'हाय आमचा लांबचा पावणा. त्येच्यासंगच सुलाच्या दादांनी लगीन ठरीवलया.' आणखीबी काइबाय दिलं सांगून. पटलं त्येन्लाबी. बसल्या गप. नाय तर लागल्या असत्या पालीवाणी कुचकुचायला.

सुलासंग आधनं-मधनं वसंता येत-जात हुता. मला दोघाचंबी कौतुक हुतं. वसंताला नोकरी नव्हती; पण त्यो नोकरीच्या तलासात

हुता. मी म्हणायचे,

'नोकरी लागलं तवा लागलं. काळजीनं खंगू नका.' सुलाचं नि त्येचंबी नोकरी लागली की लगीन करायचं आसं धोरण दिसत हुतं. एकदा मी सुलाला म्हणलं,

'देवानं लवकर नोकरी लावून द्यावी.' ती खो खो हासत ऱ्हायली. म्हणली,

'तुझा देव कुठल्या कारखान्याचा मालक?'

पोरास्नी काय कळतंय. समदा खेळ देवाचाच तर आसतो. लागंल नोकरी. तवर सुलाचंबी कालेज पुरं हुइल.

ह्या दोन-तीन म्हैन्यात सुलासंग वसंता आला नाय. सुलाला मी एकदा बोलून दावलं तर म्हणली,

'माझी परीक्षा जवळ आलीय. त्येच्या नोकरीचं त्याला व्याप. मीच सांगितलंय वारंवार येणं बरं नाही म्हणून. बाकी आम्ही भेटतोच की.' आसं ऐकल्यावर मलाच इरमल्यावाणी झालं. मनाला म्हणलं,

'आपुनच पोराटोरापेक्षा जास्त उतावळपणा करतुया. तरणीताठी पोरं आसून ती किती समजुतीनं वागत्याती. नि आपुन आसं पागल-पणानं बोलायचं ह्ये काय बरं नाय.

त्या दिशी सुलाची परक्षा संपणार हुती. येताना संग वसंताला आण आसं वजावून सांगितलं मी. माझं डोळं सारखं वाटंकडं लागलं हुतं. आखिरीस सुला कोपऱ्यावर दिसली. मोरानं पिसारा फुलवावा तसं झालं माझं. उठून बिगी बिगी दारात जाऊन उभी ऱ्हायले. वसंता काय दिसला नाय संग. आसंल मागं म्हणलं; पण दारात शिरताना सुला म्हणली,

'दारात कशाला उभी ऱ्हायल्येस?'

रागात हुती जणु. वसंतावरचा राग आसंल म्हणलं; पण आत येताच तिनं खाटंवर आंग टाकून ढसाढसा रडायलाच केलं सुरु. सर्र-दिशी काटा आला माझ्या अंगावर, काय झालं की म्हणलं, सुलाला पोटाशी धरलं. लाख इनवण्या केल्या; पण बोलायचं नाव घेईना. रडू-च आवरत नव्हतं तिला. मग मीबी कावलेच. म्हणलं,

'मी मेल्यावर रड. अजून जित्ती हाय. सांग काय झालंय. - - - शप्पत हाय माझी.' तर म्हणली,

'वसंतानं घात केला. लग्न केलं त्यानं.'

'आसा कसा दावा सादला तरी. केलं तरी कसं?'

'नोकरी लागली त्याला. नोकरीवाली पोरगीपण मिळाली मग - - - - - -'

'पण आतापातूर एवढं थेर - - -'

'माझं नशीब फुटकं - - - मी आता काय करु? - - -'

'हे बग, रडू नगस. दुनिया कुडली नाय त्या एकावाचून.'

'तुला नाय कळायचं.'

'समदं कळतं मला. तुझं आई-बाप त्येच्यापरता चांगली जागा बघत्याली.'

'पण मी त्याच्यावाचून जगणार नाही. त्याच्यावर जीव जडला नि त्यानं - - -'

'समदं इसरायचं. लाख मोलाचं आयुस्य पडलंय - - -'

'आता मरण येतं तर. हे आयुष्य - - -'

'शप्पत हाय माझी. वाईट वंगाळ बोलू नगस.'

'तुझ्या शपथीवर माझं जिवंत मढं जगण्यापेक्षा - - -'

'लगीन करुन त्यो मजा मारायला रिकामा झाला. तू करतीस मरणाच्या गोष्टी. अगं, आता त्यो तुला मेल्यापर्मानं. मेलेल्याचा मागं कोण जात नाय!'

'तुला नाय कळायचं.'

'मला चांगलं कळतं. तो कसाब झाला. आपुन मांगावाणी निगरगट्ट हुयाचं.'

'काही राखून ठेवलं असतं तर - - -'

'काय गेलं त्येला तुझं?'

'सारं सर्वस्व त्याच्या पायाखाली - - -'

'मजी पोरी - - - तूऽ - - -? तूऽऽ - - -?'

'हं. त्याच्यापुढं मला कशाचीच मातब्बरी वाटली नाही ग - - -'

वाचा गेल्यावाणी झालं मला. सुला रडत हुती. किती वेळ गेला काइ कळलं नाय. डोस्कं सुन्न झालं हुतं. इरागतीला भाईर जाऊन आल्ये मी. सुला कसल्याशा गोळ्या खात हुती. म्हणलं,

'कसल्या ग गोळ्या?', तर म्हणली,

'डोक्यावरच्या.'

मग हातरुणावर आली. माझ्या कुशीत तोड खुपसलं. तिच्या जीवाच्या कळा तिचं अंग गदगदून बाहेर पडत हुत्या. माझ्याबी डोळ्याचं झरं झालं. तोंडात बोळा देऊन पेटवून द्यावं तशी तिची त्या भाड्यानं गत केली हुती. तिच्या सुखासाठी जीव द्यालाबी मी तयार हाय. ती माझ्या काळजाचा तुकडा हाय. जीवच जडलाय माझा तिच्यावर. जीव जडणं वाईट. कशाचीच पर्वा वाटत नाय. सुलाम्होरं मला दुनियाबी कवडीमोलाची. त्यो भाड्या दिसला तर पायताणानं हाणीन मी.

रातभर मन सैरभैर झालं हुतं. सुला लगोलग झोपली. माझा झुंझुर्काचा डोळा लागला. सकाळी जागी झाले. सुला झोपल्याली हुती. माझ्या हातावरच डोस्कं ठेवलं हुतं. हात काढून घेताना आपटलंच तिचं डोस्कं. तरी जागी झाली नाय. तिचा चेरा नीट दिसत नव्हता. नजर कमी आली हुती माझी. मला का बुद्धी झाली कुणाला ठावं. चुलीवरची चिमणी आनून तिला मी बघितलं नि काळीज फाटलं माझं. रातचा कधी जीव गेला हुता काय की. तिला मांडीवर घेऊन हांबरडा फोडला मी.

माणसं जमली हुती. डाक्तरनं सुलाला तपासलं. झोपेच्या गोळ्या खाऊन तिनं सोत्ताचा घात केला हुता. तिचा वसंतावर जीव जडला हुता. मीबी माझं सारं आयुस्य तिला वाह्यलं हुतं. तिला धोका दिला नव्हता. तरीबी तिला माझं काइच कसं वाटलं नाय? वांझंची माया नि वाझंचं कष्ट वांझच असतात का? जित्ती आसती तर इचारलं तरी आसतं की,

'तुमी तरणीताटी पोरं वांझ पीर्तीसाठी आशी वांझ मरणं का भोगता?'

('नारायण आतीवाडकर' पारितोषिक विजेती कथा
बेळगाव १९८७)